नागपुर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# चंद्रपूर महासागर

Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com

* वर्ष ४६ * अंक २५ * * चंद्रपूर * शुक्रवार, दिनांक २५ जुलै २०२५ ८ पाने ● किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.) * विशेष ऑफर : महासागर + नागपूर पोस्ट = ४ रु. फक्त

## विमान अपघातानंतर ११२ वैमानिकांनी घेतली सुट्टी

■ वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. २४ :
अहमदाबाद विमान अपघाताच्या चार दिवसांनंतर, एअर इंडियाच्या ११२ वैमानिकांनी आजारी रजा घेतली. नागरी उड्डाण मंत्री राम मोहन नायडू यांनी गुरुवारी संसदेत ही माहिती दिली. त्यांनी सांगितले की, १६ जून रोजी ६१ वरिष्ठ वैमानिक आणि ५१ उड्डाण अधिकाऱ्यांनी रजेसाठी अर्ज केले होते.

राम मोहन नायडू म्हणाले, अशा अपघातानंतर वैमानिकांचे मानसिक आरोग्य ओळखणे आणि त्यांचे व्यवस्थापन करणे खूप महत्वाचे आहे. मंत्री म्हणाले की, आता विमान कंपन्यांना वैमानिकांसाठी मदत गट तयार करण्याचा सल्ला देण्यात आला आहे. दरम्यान, डीजीसीएने एअर इंडियाला ४ कारणे दाखवा नोटीस बजावल्या आहेत.

अग्राग्रलेख

## खरीखरी..

## मस्तानभाई : मोठा माणूस

आपल्या देशात सध्या धर्माधर्मात सख्य आणि सौख्य कसे नांदणार नाही हे जातीने पाहणारे काही लोक आहेत. अशा परिस्थितीत संपूर्ण देशाला एक चांगला संदेश देणारा एखादा व्यक्ती लहान गावातील असला तरी त्याची दखल घेणे हे आमचे परमकर्तव्य आहे. सध्या दोन-चार गुंठे शेतीसाठी, राहत्या घरासाठी किंवा लहान मोठ्या जागांसाठी सख्खे भाऊ पक्के वैरी बनतात. भाऊ बहिणीचे नाते तुटते, बहीण-बहिणीमध्ये वाद होतात, सहोदरांसोबत वैऱ्यासारखे नाते बनते. ह्या सर्व गोष्टी करण्यात आपण सारेच आघाडीवर असतो. या अशा प्रकरणांमध्ये मारामारी आणि खून सुद्धा होतात. हे पाहणे आणि वाचणे सध्या तरी नित्याचेच झालेले आहे. त्या पलीकडे जाऊन जाती-जातीमध्ये वाद लावले जातात आणि त्यातून राजकीय पोळी भाजली जाते. या जातीय राजकारणाच्या उकिरड्यात अनेक ठिकाणी दंगली होतात. छांगुरबाबा सारखे अनेक धर्मवेडे दुसऱ्यांचा धर्म बदलण्यासाठी लाखो करोड रुपये खर्च करतात. अशा वातावरणामध्ये सर्वसामान्य कुटुंबातील एका मुस्लिम व्यक्तीने हिंदूंच्या मंदिरा करीता आपल्या मालकीची एक एकर जमीन दान दिलेली आहे. हे वाचून तुम्हाला कदाचित खरे वाटणार नाही. पण ही गोष्ट शंभर टक्के सत्य म्हणजे खरी आहे आणि त्यामुळेच या 'खरीखरी' मध्ये आम्ही ती मांडत आहोत. यवतमाळ जिल्ह्यात एक आटपाट नगर आहे. त्या गावाचा तालुका माळकिन्ही आहे आणि मंदिरासाठी स्वतःची जमीन देणाऱ्या आमच्या साध्या किंवा सच्चा नागरिकाचे नाव आहे शेख मस्तान शेख रोशन. या मुस्लिम समाजातील माणसाने आपले नाव रोशन करण्यासारखी कामगिरी केलेली आहे. या शेतकरी असलेल्या मस्तानभाई यांनी जातीयवादाचे विष पसरवणाऱ्या सर्वांना सामाजिक सलोख्याचा धडा अगदी धडधडीतपणे दिलेला आहे. धर्मासाठी आपसात भांडणाऱ्या जाती-जातीत देश पेरून भांडण लावणाऱ्या अधर्मी धर्मकुडळांना यातून काही बोध मिळेल का हाच प्रश्न आहे. मात्र या सर्वातील गंमत अशी आहे की हे शेख मस्तान काही फार मोठे शेतकरी नाहीत. त्यांच्याजवळ वंशपरंपरागत आलेली पाच ते सहा एकर शेती आहे, त्यांच्या कुटुंबात त्यांचा २५ वर्षांचा मुलगा आहे. त्यांच्या चारही मुलींची लग्न त्यांनी करून टाकलेली आहेत, घरात चांगले सौख्याचे आणि सलोख्याचे वातावरण आहे. अशा या मस्तान भाईंना २०१४ साली एक अपघात झाला आणि त्यामध्ये त्यांनी आपला एक पाय गमावला म्हणजे घरातील कर्ता पुरुष अपंग झाला. पण असे संकट आल्यानंतरही त्यांनी कोणत्याही प्रकारे रडारडीची भाषा केली नाही. कर्म हाच धर्म म्हणून ते आपले काम करत राहिले. तिथेच म्हणजे त्याच परिसरात त्यांचे लक्ष्मण माहुरे नामक एक मित्र होते. ते एका मंदिरात व्यवस्थापक होते. लक्ष्मण माहुरे यांना महादेव मंदिराची उभारणी करायची होती. त्यासाठी माहुरे महोदय जागेची शोधाशोध करत होते. मात्र एक अत्यंत मोक्याच्या ठिकाणी आणि नदीजवळ असलेली जागा त्यांना पसंत पडली. ही अत्यंत मोक्याच्या असलेल्या जागेची मालकी शेख मस्तानभाई यांची होती. मग माहूरे यांनी मस्तान भाईंना ती जागा विकत देण्यासाठी विचारणा केली आणि मस्तान भाई यांनी त्यांना ती जागा विकत देण्यास नकार दिला. त्यावेळी माहुरे यांच्या मनात मंदिराचे स्वप्न पूर्ण होते की नाही असा विचार सुरू असतानाच शेख मस्तान भाईंनी असे काही वाक्य उच्चारले की, त्यामुळे पुजारी माहुरे यांना आश्चर्याचा तीव्र धक्काच बसला. कारण मस्तानभाई म्हणाले की मंदिराची जागा आम्ही विकत नाही. याचा अर्थ इथे मंदिर होणार नाही असे अजिबात नाही. अशा धार्मिक आणि सामाजिक कामासाठी माझी एक एकर जमीन विनामूल्य देणार आहे, म्हणजेच ही माझी जागा मी नम्रपणे महादेव मंदिरासाठी दान करणार आहे. मस्तान भाईंनी हे उद्गार काढल्यावर त्यावेळी त्या ठिकाणी उपस्थित असलेल्या सगळ्यांनाच हर्षवायू झाला असेल. कारण सर्वसाधारण परिस्थिती असणाऱ्या मुस्लिम समाजातील एक व्यक्ती इतका मोठा निर्णय घेतो. हे सामाजिक ऐक्याचे कितीतरी मोठे पाऊल आहे असेच उपस्थितांना वाटले असेल. कितीही इच्छा असली तरी मस्तान भाईंच्या या निर्णयाला त्यांच्या समाजातून विरोध झाला नसता तरच नवल. त्यावरही त्यांनी सर्वांना समजावून तोडगा काढलाच. त्यांनी आपल्या जमातीला आणि जातभाईंना स्वच्छ सांगितले की, ही माझी वडिलोपार्जित जमीन आहे आणि ती मी दान देणारच देणार आहे. विशेष म्हणजे त्यांनी सांगितल्याप्रमाणे सर्वच्या सर्व बाबी कागदोपत्री आणि कायदेशीररित्या पूर्ण केल्या. हे काम करणारे मस्तानभाई शेख रोशन किती उदात्त विचार करतात ते सुद्धा आपण आत्मसात केले पाहिजे. आपला मानवी जन्म कोणत्या धर्मात किंवा कोणत्या जातीत होतो हे कोणाच्याही हातात नसते. जन्म झाल्यावर सर्वांनी माणूस म्हणून जगणे इतकेच फक्त आपल्या हातात असते. हे सर्वांनी समजून घ्यावे, आपल्या भारत देशातील प्रत्येक नागरिकाने प्रामाणिकपणाने एवढे करावी हीच आमची सर्व मानव जातीला प्रार्थना आहे. माणसाने माणसाशी माणसासारखे वागावे, असा संदेश देणाऱ्या शेख मस्तान भाईंना त्यांच्या माणुसकीबद्दल, त्यांच्या दिलदारपणा बद्दल तसेच आजकाल दुर्मिळ होत असलेल्या सर्व धर्म समभावाबद्दल कुर्निसात करीत आहोत, सलाम आणि त्रिवार वंदन आम्ही करीत आहोत. प्रत्येक भारतीयाच्या मनात ही भावना निर्माण झाली. तर लहान-सहान बाबींवरून होणारी भांडणे थांबतील, घातपात थांबतील, जातीजातींमधील भेदाभेद थांबेल. भेदाभेद कर्म अमंगळ असे म्हणणाऱ्या संत तुकारामांची विश्वबंधुत्ववादी तळमळ सर्वांपर्यंत नक्कीच पोहोचेल. आपल्या देशात अशाच प्रकारच्या सर्व धर्म समभावाची सुगंधी हवा सर्वत्र पसरेल. या लहानशा गावातील उत्तुंग मनाच्या मोठ्या माणसाचा आदर्श नागरिक म्हणून चहुकडे डंका निश्चितपणे वाजला पाहिजे.

nagpurpost@gmail.com
Mob. No. 9922970023

### तीन वर्षाच्या दीर्घ चर्चेनंतर भारत आणि ब्रिटनमध्ये

# मुक्त व्यापार करारावर स्वाक्षरी

■ वृत्तसंस्था, लंडन, दि. २४ :
भारत आणि ब्रिटनमध्ये मुक्त व्यापार करार (एफटीए) झाला आहे. गुरुवारी लंडनमध्ये पंतप्रधान मोदी आणि ब्रिटिश पंतप्रधान केयर स्टार्मर यांच्या उपस्थितीत या करारावर स्वाक्षरी करण्यात आली. दोन्ही देशांमध्ये याबाबत ३ वर्षांपासून चर्चा सुरू होती.

करारानंतर, नेत्यांनी संयुक्त पत्रकार परिषद घेतली. यावेळी पंतप्रधान मोदींनी या कराराला ऐतिहासिक म्हणत आनंद व्यक्त केला. मोदी म्हणाले, यूकेमध्ये राहणारे भारतीय वंशाचे लोक आपल्या संबंधांमध्ये एक जिवंत पूल म्हणून काम करतात.

यापूर्वी, स्टार्मर यांनी असेही म्हटले होते की, ७० हजार कोटी रुपयांच्या नवीन गुंतवणूक आणि व्यवसाय करारांना मान्यता देण्यात आली आहे. स्टार्मर पंतप्रधान झाल्यानंतर मोदींचा हा पहिलाच ब्रिटन दौरा आहे.

या करारामुळे भारतातून ब्रिटनला होणाऱ्या ९९% निर्यातीवरील आयात शुल्कात सवलत मिळेल. याचा अर्थ असा की भारतातून ब्रिटनला पाठवल्या जाणाऱ्या वस्तूंवरील कर एकतर लक्षणीयरीत्या कमी केला जाईल किंवा पूर्णपणे काढून टाकला जाईल.

त्याचबरोबर, हा करार ब्रिटिश कंपन्यांसाठी देखील फायदेशीर ठरेल. आता त्यांना भारतात व्हिस्की, कार आणि इतर उत्पादने विकणे सोपे होईल. भारत या उत्पादनांवरील कर १५% वरून ३% पर्यंत कमी करेल. या करारामुळे दोन्ही देशांमधील व्यापार दरवर्षी सुमारे ३ लाख कोटी रुपयांनी वाढू शकतो.

एफटीए म्हणजे मुक्त व्यापार करार. हा दोन किंवा अधिक देशांमधील करार आहे, जेणेकरून ते सहजपणे वस्तू आणि सेवांचा व्यापार करू शकतील आणि त्यावर कमी कर (शुल्क) लादू शकतील किंवा अजिबात कर लावू शकणार नाहीत.

**मंत्रिमंडळाची मंजुरी**

भारत आणि ब्रिटनमधील या एफटीएला भारतीय मंत्रिमंडळाने मान्यता दिली आहे. आता तो ब्रिटिश संसदेकडून मंजुरीसाठी प्रलंबित आहे. यासाठी ६ महिने ते १ वर्ष लागू शकते.

पंतप्रधान मोदींसोबत वाणिज्य आणि उद्योग मंत्री पीयूष गोयल हे देखील युके दौऱ्यावर आहेत. एफटीएशी संबंधित वाटाघाटींमध्ये त्यांची प्रमुख भूमिका आहे. यापूर्वी, दोन्ही देशांमध्ये ६ मे रोजी हा करार अंतिम झाला होता.

२०३० पर्यंत द्विपक्षीय व्यापार दुप्पट करून १२० अब्ज डॉलर्सपर्यंत पोहोचवण्याचे उद्दिष्ट एफटीएचे आहे. करारावर स्वाक्षरी झाल्यानंतर, भारतातून युकेमध्ये होणारे लेदर, पादत्राणे, कापड, खेळणी, रत्ने आणि दागिने यासारख्या श्रम-केंद्रित उत्पादनांवरील निर्यात कर रद्द केले जातील.

भारत आणि ब्रिटनमधील कराराबद्दल वाटाघाटी १३ जानेवारी २०२२ रोजी सुरू झाल्या, ज्या आता सुमारे ३.५ वर्षांनी पूर्ण झाल्या आहेत. २०१४ पासून, भारताने मॉरिशस, युएई, ऑस्ट्रेलिया आणि ईएफटीए (युरोपियन मुक्त व्यापार संघटना) सोबत अशा ३ मुक्त व्यापार करारांवर स्वाक्षरी केली आहे. भारत युरोपियन युनियन (ईयू) सोबत अशाच प्रकारच्या करारांवर सक्रियपणे वाटाघाटी करत आहे.

दोन्ही देशांमधील करारामुळे युकेतून येणाऱ्या वस्तू स्वस्त होतील.

### ९९% भारतीय वस्तूंसाठी आयात शुल्कात सवलत



## बस दरीत कोसळली

## ७ ठार, २३ जखमी



बस अपघातात बलवीर (६०), अंतरीक्ष (१७), बर्फी देवी (८०), गीता देवी (६५), डोमा देवी (७०), कलासी देवी (६०), आणि सुमन कुमार (३३) यांचा मृत्यू झाला. सरकाघाटचे आमदार दलिप ठाकूर सरकाघाट येथील रुग्णालयात पोहोचले. त्यांनी सांगितले की, रुग्णालयात अल्ट्रासाऊंड किंवा रुग्णवाहिकेची सुविधा नाही. ते हा मुद्दा विधानसभेत उपस्थित करतील.

■ वृत्तसंस्था, मंडी, दि. २४ :
हिमाचल प्रदेशातील मंडी येथे गुरुवारी सकाळी हिमाचल रोड ट्रान्सपोर्ट कॉर्पोरेशन ची बस १५० फूट खोल दरीत कोसळली. या अपघातात ७ जणांचा मृत्यू झाला. २० ते २३ प्रवासी जखमी झाल्याचे वृत्त आहे.

मृतांमध्ये ४ महिला आणि ३ पुरुषांचा समावेश आहे. स्थानिक पोलिस आणि ग्रामस्थांच्या मदतीने जखमींना दरीतून बाहेर काढून सरकाघाट रुग्णालयात नेण्यात आले. गंभीर जखमी झालेल्या ३ जणांना एम्स बिलासपूर येथे रेफर करण्यात आले आहे. गुरुवारी सकाळी ९ वाजताच्या सुमारास ही बस जामनीहून सरकाघाटला निघाली आणि सकाळी ९:४५ वाजता सरकाघाट-जामनी-दुगार्पूर रस्त्यावरील मासेरान तलगराजवळ बस अचानक नियंत्रणाबाहेर गेली आणि दरीत पडली. बसमध्ये ३० ते ३५ प्रवासी होते. बसवरील नियंत्रण गमावल्यामुळे हा अपघात झाला.

## कर्नाटकात निवडणूक आयोगाचा घोटाळा

### राहुल गांधीं यांचा आरोप



■ वृत्तसंस्था
नवी दिल्ली, दि. २४ :
बिहारमधील मतदार यादीच्या विशेष सघन सुधारणा विरोधात झालेल्या निदर्शनांदरम्यान काँग्रेस खासदार राहुल गांधी यांनी कर्नाटकमध्ये निवडणूक आयोगावर फसवणूकीचा आरोप केला. राहुल गांधी यांनी संसदेबाहेर सांगितले की, मतदार यादी पुनरावृत्तीच्या नावाखाली कर्नाटकात हजारो बोगस मतदारांची नावे जोडण्यात आली आहेत.

राहुल म्हणाले, 'कर्नाटकातील एका जागेवर निवडणूक आयोगाने घोटाळा केला. आमच्याकडे याचे १००% पुरावे आहेत. त्याच मतदारसंघात ५०, ६० आणि ६५ वर्षे वयोगटातील हजारो नवीन मतदारांना यादीत समाविष्ट करण्यात आले आहे आणि १८ वर्षांवरील मतदारांना यादीतून वगळण्यात आले आहे.'

'एका जागेची चौकशी करताना आम्हाला ही अनियमितता आढळली आहे. मला खात्री आहे की प्रत्येक जागेवर तेच नाटक सुरू आहे.

मी निवडणूक आयोगाला एक संदेश देऊ इच्छितो. की ते यातून सुटतील, तर तो तुमचा गैरसमज आहे. आम्ही तुम्हाला सुटू देणार नाही.'

एका निवेदनात, निवडणूक आयोगाने त्यांच्या टीकाकारांना विचारले की मृत आणि स्थलांतरित मतदारांच्या नावावर बनावट मते टाकण्याची परवानगी दिली पाहिजे का? निवडणूक आयोगाच्या पारदर्शक प्रक्रियेद्वारे तयार केलेली प्रामाणिक मतदार यादी निष्पक्ष निवडणुका आणि मजबूत लोकशाहीचा पाया नाही का? असेही आयोगाने विचारले.

## रशियन विमान कोसळले सर्व ४९ जणांचा मृत्यू

■ वृत्तसंस्था, मास्को, दि. २४ :
चीनच्या सीमेजवळ एक रशियन प्रवासी विमान कोसळले. या अपघातात विमानातील ४९ जणांचा मृत्यू झाला आहे. विमानात ४३ प्रवासी आणि ६ क्रू मेंबर्स होते. प्रवाशांमध्ये ५ मुलांचाही समावेश आहे. बचाव कर्मचाऱ्यांना टिंडा पासून सुमारे १६ किलोमीटर अंतरावर एका टेकडीवर रशियन प्रवासी विमानाचे अवशेष सापडले आहेत.

रॉयटर्सच्या मते, हे विमान रशियाच्या पूर्व अमूर प्रदेशात उड्डाण करत होते. अमूरचे गव्हर्नर वसिली ऑरलोव्ह यांनी टेलिग्रामवर सांगितले की बेपत्ता विमान अंगारा एअरलाइन्सचे आहे.

स्थानिक आपत्कालीन मंत्रालयाने सांगितले की विमान खाबरोव्स्क, ब्लागोवेश्चेन्स्क मार्गे टिंडा येथे जात होते. ते चीनच्या सीमेजवळ आहे. टिंडा येथे पोहोचण्यापूर्वीच ते रडारवरून गायब झाले आणि संपर्क तुटला.

इंटरफॅक्सच्या वृत्तानुसार, टिंडा विमानतळावर उतरण्याच्या पहिल्या प्रयत्नात विमान अयशस्वी झाले. दुसऱ्यांदा उतरण्याचा प्रयत्न केला तेव्हा ते रडारवरून गायब झाले.

# केवळ १२ मिनिटेच चालले लोकसभेचे कामकाज

### बिहार मतदार पडताळणीवरून संसदेत विरोधकांची घोषणाबाजी

■ वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. २४ :
संसदेच्या पावसाळी अधिवेशनाच्या चौथ्या दिवशी गुरुवारी लोकसभेचे कामकाज सकाळी ११ वाजता सुरू होताच, विरोधी पक्षाच्या खासदारांनी बिहार मतदार पडताळणीच्या मुद्द्यावरून गोंधळ घालण्यास सुरुवात केली.

काँग्रेससह अनेक विरोधी खासदारांनी वेलमध्ये येऊन पोस्टर झळकावण्यास सुरुवात केली. सभापती ओम बिर्ला म्हणाले, जर तुम्ही फलक घेऊन आलात तर सभागृह चालणार नाही. त्यांनी काँग्रेसच्या खासदारांना सांगितले, हे तुमचे संस्कार नाहीत.

गोंधळादरम्यान, लोकसभेचे कामकाज आज फक्त १२ मिनिटे चालू शकले. शुक्रवारी सकाळी ११ वाजेपर्यंत तहकूब करण्यात आले. त्याच वेळी, राज्यसभेचे कामकाज फक्त १:४५ मिनिटे चालू शकले.

दुसरीकडे, संसदेच्या बाहेर मकरद्वार येथे बिहार मतदार पडताळणीच्या मुद्द्यावर सलग तिसऱ्या दिवशी निषेध करण्यात आला. सोनिया गांधीही त्यात सामील झाल्या. प्रियंका गांधी यांनी 'लोकशाही धोक्यात' असे लिहिलेले पोस्टर लावले. सलग तीन दिवसांपासून विरोधकांचा गोंधळ सुरू आहे.

**राज्यसभा २५ जुलैपर्यंत तहकूब**

बिहारमधील एसआयआर मुद्द्यावरून राज्यसभेतील विरोधी पक्षनेत्यांनी सभागृहात गोंधळ घातला. त्यानंतर शुक्रवारी सकाळी ११ वाजेपर्यंत सभागृह तहकूब करण्यात आले.

**लोकसभेचे कामकाज तहकूब**

दुपारी २ वाजता लोकसभेचे कामकाज सुरू होताच विरोधकांनी पुन्हा गोंधळ घातला. त्यानंतर शुक्रवारी सकाळी ११ वाजेपर्यंत सभागृह तहकूब करण्यात आले.

# फडणवीस मंत्रिमंडळात लवकरच फेरबदल?

### महाजनांना डच्चू, नार्वेकरांना संधी, मुनगंटीवर विधानसभा अध्यक्ष?



■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २४ :
आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री फडणवीस आपल्या मंत्रिमंडळात मोठे फेरबदल करण्याची शक्यता आहे.

त्यात राज्याचे जलसंपदा मंत्री गिरीश महाजन यांना डच्चू मिळून त्यांच्या जागी विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांना संधी मिळण्याचा दावा केला जात आहे. या संभाव्य फेरबदलात काही अकार्यक्षम व वादग्रस्त मंत्र्यांचीही गच्छंती होण्याची शक्यता आहे. यामुळे सत्ताधारी महायुतीच्या घटकपक्षांच्या मंत्र्यांच्या पोटात गोळा उठला आहे.

भाजपला विधानसभा निवडणुकीत दैदिप्यमान यश मिळाले होते. त्यानंतर आता पुन्हा राज्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचा फड रंगणार आहे. सत्ताधारी महायुतीने मोर्चेबांधणी सुरू केली आहे. पण सत्ताधारी महायुती आपल्या नेत्यांच्या कुरापतींमुळे सातत्याने वादात सापडल्यामुळे सरकारची प्रतिमा डागाळली जात आहे. या प्रकरणी विरोधकांनी केलेली कोंडी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस मंत्रिमंडळात फेरबदल करून फोडण्याचा प्रयत्न करणार आहेत.

वृत्तानुसार, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या अगोदर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आपल्या मंत्रिमंडळात मोठे फेरबदल करतील. त्यात गिरीश महाजन यांना मंत्रिमंडळातून डच्चू देऊन त्यांच्या जागी विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांना संधी देतील.


नार्वेकर यांनी काही दिवसांपूर्वी सरकारमध्ये मंत्री म्हणून काम करण्याची इच्छा बोलून दाखवली होती. फडणवीस त्यांची ही इच्छा पूर्ण करतील असा अंदाज आहे. नार्वेकर राज्यात सत्तांतर झाले तेव्हापासून म्हणजे २०२२ च्या मध्यापासून विधिमंडळाच्या कनिष्ठ सभागृहाचे अध्यक्षपद सांभाळत आहेत.

**मुनगंटीवर विधानसभा अध्यक्ष?**

गिरीश महाजन यांच्याकडे पक्ष संघटनेतील एखादी महत्त्वाची जबाबदारी दिली जाईल.

आगामी फेरबदलांत मुनगंटीवार यांनाही संधी मिळेल असे सांगितले जात आहे. त्यांच्याकडे राहुल नार्वेकर यांचे विधानसभा अध्यक्षपद सोपवले जाण्याची चिन्हे आहेत.

महायुती सरकार गत काही दिवसांपासून आपल्या नेत्यांच्या व मंत्र्यांच्या वादग्रस्त विधानांमुळे सातत्याने वादात अडकले आहे. नीतेश राणे, संजय गायकवाड, संजय शिरसाट हे सातत्याने वादात आहेत . वादग्रस्त मंत्र्यांना मंत्रिमंडळातून बाहेरचा रस्ता दाखविला जाण्याचे संकेत आहेत . अजित पवार राष्ट्रवादी काँग्रेसमधून कृषिमंत्री कोकाटे यांना डच्चू देवून दुसऱ्याला संधी मिळणार असल्याचा दावाही वृत्तात करण्यात आला आहे.



मंत्रिमंडळात फेरबदल होणार असल्याच्या चर्चा सुरू आहेत. यावर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सूचक विधान केले आहे.
ते म्हणाले, आम्ही टीम म्हणून काम करत आहोत. पद खाली वर होत असतात, त्यात एवढे काही चर्चा करण्यासारखे नाही, चांगले काम करण्याचा सरकारचा अजेंडा आहे. आमचा अजेंडा खुर्ची नाही, खुर्चीत ज्यांनी बसवले त्यांचे प्रश्न सोडवणे हा आमचा अजेंडा आहे. देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात आम्ही सारे एकत्र आहोत, असे शिंदे म्हणाले.

## उच्च न्यायालयाच्या निर्णयाला सुप्रीम कोर्टाची स्थगिती

### मुंबई रेल्वे बॉम्बस्फोट

■ वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. २४ :
सर्वोच्च न्यायालयाने गुरूवारी २००६ च्या मुंबई बॉम्बस्फोट प्रकरणातील आरोपींची निर्दोष सुटका करण्याच्या मुंबई उच्च न्यायालयाच्या निर्णयाला स्थगिती दिली आहे. या निर्णयामुळे महाराष्ट्र सरकारसह या प्रकरणातील पीडित कुटुंबीयांना मोठा दिलासा मिळाला आहे.

मुंबई उच्च न्यायालयाने सोमवारी मुंबई रेल्वे बॉम्बस्फोटातील सर्वच १२ आरोपींची निर्दोष सुटका केली होती. त्यानंतर लगेचच या आरोपींची तुरुंगातून सुटका करण्यात आली होती. कोर्टाच्या या निर्णयामुळे राज्य सरकारला मोठा धक्का बसला होता. त्यामुळे शासनाने तत्काळ या आदेशांविरोधात सुप्रीम कोर्टात दाद मागितली होती. या याचिकेवर सुनावणी करताना सुप्रीम कोर्टाने गुरूवारी हायकोर्टाच्या निर्णयाला स्थगिती दिली. तसेच सर्वच आरोपींना नोटीसही बजावली.




# संत नामदेव महाराजांचे वैश्विक स्मारक उभारणार

■ वृत्तसंस्था, पंढरपूर, दि. २४ :
भागवत धर्माचा विचार आपल्या लेखणी व वाणीने देशभर पोहोचवणारे संत नामदेव महाराज यांच्या पंढरपूर येथील मंदिराचा जीर्णोद्धार करण्यात येईल आणि संत नामदेव महाराजांच्या समाधीस्थळी वैश्विक दर्जाचे स्मारक उभारतांना निधीची कमतरता भासू दिली जाणार नाही. त्यांचे विचार सर्वांपर्यंत पोहोचवण्यासाठी शासनस्तरावर प्रयत्न करण्यात येईल, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

पंढरपूर येथे आयोजित श्री संत शिरोमणी नामदेव महाराज, परिवार व संत जनाबाई यांच्या ६७५ व्या संजीवन समाधी सोहळा कार्यक्रमात ते बोलत होते. या वेळी पालकमंत्री जयकुमार गोरे, आमदार समाधान आवताडे, आमदार अभिजित पाटील, आमदार रणजितसिंह मोहिते-पाटील, विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार, श्री नामदेव क्षत्रिय एकसंघाचे अध्यक्ष महेश ढवळे आदी उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, गुरू गोविंदसिंग, संत कबीर यांनी संत नामदेवांचा उल्लेख अत्यंत आदराने केला आहे. मीराबाई, नरसिंह मेहता यांच्या काव्यातदेखील नामदेव महाराजांचे विचार पाहायला मिळतात. भारताच्या सर्व दिशांना जोडण्याचे आणि खऱ्या अर्थाने भागवत धर्मातील विचार वैश्विक करण्याचे कार्य त्यांनी केले.

प्रारंभी मुख्यमंत्र्यांनी श्री संत शिरोमणी नामदेव महाराज यांच्या परिवारातील त्यांचे वंशज हरिभक्त पारायण ज्ञानेश्वर महाराज नामदास व अन्य संतांचे पद पूजन केले. चांदीच्या विशेष नाण्याचे अनावरणही केले.

## कृषिमंत्र्यांवर कडक कारवाई



■ महासागर प्रतिनिधी,मुंबई, दि.२४ :
उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी विधिमंडळात ऑनलाईन रमी खेळण्याप्रकरणी कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांच्यावर कडक कारवाई करण्याचे संकेत दिलेत.

मी यापूर्वीच त्यांना इजा झाले बिजा झाले आता तिजा होऊ देऊ नका याची जाणिव करून दिली होती. आता ते या प्रकरणी आपण ते खेळत नसल्याचे सांगत आहेत. त्यांच्याशी सोमवारी समोरासमोर चर्चा करेन. त्यानंतर या प्रकरणी योग्य तो निर्णय घेईन, असे ते म्हणाले.

# पुणे महानगर प्रदेश ग्रोथ हब उभारणार

## पुणे ग्रोथ हबचा नियोजन आराखडा यशदा करणार : उपमुख्यमंत्री अजित पवार

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २४ :

पुणे महानगर प्रदेश (पीएमआर) हे तंत्रज्ञान, उत्पादन, शिक्षण आणि हरित गतिशीलतेमध्ये आघाडीवर आहे. यामुळे पुणे महानगर प्रदेश ग्रोथ हब उभारणार असल्याचा विश्वास उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी व्यक्त केला. पुण्याला ग्रोथ हब बनविण्यासंदर्भात नियोजनाचा आराखडा यशदा करणार असून यासाठी पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण निधीची तरतूद करेल, असेही उपमुख्यमंत्री पवार यांनी सांगितले.

नीती आयोगाच्या मार्गदर्शक सूचनेनुसार मंत्रालयात आयोजित बैठकीत उपमुख्यमंत्री अजित पवार पवार बोलत होते. यावेळी मुख्य सचिव राजेश कुमार, वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव ओ. पी. गुप्ता, नियोजन विभागाचे अपर मुख्य सचिव डॉ. राजगोपाल देवरा, सामान्य प्रशासन विभागाच्या अपर मुख्य सचिव व्ही. राधा, उपमुख्यमंत्र्यांचे सचिव डॉ.राजेश देशमुख तर दूरदृश्य प्रणालीद्वारे पुण्याचे विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार, जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणचे आयुक्त योगेश म्हसे, यशदाच्या प्रभारी महासंचालक पवनीत कौर, निबंधक राजीव नंदकर उपस्थित होते.

उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले की, केंद्र सरकारने २०२४ च्या अर्थसंकल्पात भारतासाठी १४ ग्रोथ हब शहरांच्या विकासाची घोषणा केली होती. पहिल्या टप्प्यात मुंबई महानगर प्रदेश क्षेत्र (महाराष्ट्र), सुरत (गुजरात), वायझॅग (आंध्र प्रदेश) आणि वाराणसी (उत्तर प्रदेश) या चार शहरी क्षेत्रात ही संकल्पना राबविण्यात येत आहे. यामध्ये मुंबई महानगर प्रदेश क्षेत्रामध्ये ग्रोथ हब प्रकल्पाची अंमलबजावणी सुरु झाली असून आता पुणे महानगर प्रदेश क्षेत्र ग्रोथ हब म्हणून विकसित करण्यासाठी तयारी सुरू आहे. त्यानुसार नीती आयोगाने महाराष्ट्रातील पुणे, नागपूर, नाशिकचा समावेश केला आहे. पुण्यामध्ये आयटी कंपन्या, कारखाने, मेट्रो, रिंग रोड, औद्योगिक कॉरिडोर्स आणि जागतिक



दर्जाच्या शैक्षणिक सुविधा, रुग्णालये असल्याने ग्रोथ हब बनण्यासाठी पुणे महानगर प्रदेश आघाडीवर आहे. पुण्यात अधिकाऱ्यांना प्रशिक्षण देणारी शासकीय संस्था यशदा ही पुणे महानगर प्रदेश क्षेत्रासाठी आर्थिक वाढीचे धोरण आणि नियोजन आराखडा तयार करणार असून कामाबाबतचे निरीक्षण आणि समन्वय विभागीय आयुक्त करणार आहेत. यशदाचा आराखडा तयार झाल्यानंतर मनपा, पीएमआरडीए यांच्यासह संबंधित यंत्रणेने कामाबाबत अंमलबजावणी करावी.

पुण्याचे सकल उत्पन्न ४.२ लाख कोटी असून २०३० पर्यंत १५ ते १८ लाख नोकऱ्या तयार होणार आहेत. यामध्ये किमान ६ लाख महिला कामगार असतील, असे नियोजन करण्यात येणार असल्याने देशात सर्वात प्रथम आर्थिक विकास आराखडा स्वीकारणाऱ्या शहरात पुणे असेल, यामुळे पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणासह पुण्यातील सर्व संबंधित यंत्रणांनी सुरू असलेल्या विविध प्रकल्पातील कामात सातत्य ठेवावे, असेही उपमुख्यमंत्री श्री. पवार यांनी सांगितले. कामाच्या प्रगतीसाठी पुण्यामध्य यशदा येथे लवकरच सर्व संबंधित यंत्रणांची मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली बैठक घेण्याबाबत यावेळी चर्चा झाली.

पुण्यात माहिती तंत्रज्ञान, एआय, इलेक्ट्रिक वाहन, क्लीन टेक, सेमीकंडक्टर डिझाईन उपलब्ध आहेत. शिवाय एमआयडीसी क्षेत्रांमध्ये (चाकण, तळेगाव, रांजणगाव इ.) ऑटोमोटिव्ह, एअरोस्पेस, प्रिसीजन इंजिनीयरिंग आणि फार्मा क्लस्टरचा विस्तार होत आहे. आठशेहून अधिक उच्च शिक्षण संस्थांचा लाभ घेऊन भारताचे टॉप विकसित कौशल्य घेणाऱ्यांची सेवा पुरविणारे स्किलिंग-एक्सपोर्ट शहर होणार आहे. मेट्रो व रिंग रोड कॉरिडोरसह नवीन टाउनशिप असल्याने हरित आणि स्मार्ट नागरीकरणास पोषक वातावरण आहे.

## गडचिरोलीत कृषिभवन उभारण्यास मान्यता : कृषीमंत्री माणिकराव कोकाटे



**मुंबई** :गडचिरोली जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या शेतीविषयक गरजा अधिक प्रभावीपणे पूर्ण व्हाव्यात, कृषी विषयक सेवा एका छताखाली मिळाव्यात आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा लाभ थेट शेतकऱ्यांपर्यंत पोहोचावा या व्यापक हेतूने गडचिरोलीत नवे कृषिभवन इमारत बांधकामास मान्यता देण्यात आल्याची माहिती कृषी मंत्री ॲड. माणिकराव कोकाटे यांनी दिली. या प्रकल्पासाठी ११.६७ कोटींची प्रशासकीय मान्यता देण्यात आली असून, हे भवन सोनापूर येथील फळरोपवाटिकेच्या जागेत उभारले जाणार आहे. या निर्णयामागे शेतकऱ्यांना तातडीने, प्रभावी व आधुनिक सेवा मिळाव्यात हा मूळ उद्देश आहे. कृषी विभागाची जिल्हा व तालुक्यामधील सर्व कार्यालये एकाच ठिकाणी सुसज्ज इमारतीमध्ये असावीत, जेणेकरून कामकाजात सुलभता येईल आणि शेतकरी आणि प्रशासनाच्या दृष्टीने सोयीस्कर होणार आहे. नव्याने होणाऱ्या कार्यालयामध्ये जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी, उपविभागीय कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी, मंडळ कृषी अधिकारी, जिल्हा मृद सर्व्हेक्षण व मृद चाचणी प्रयोगशाळा तसेच शेतकरी प्रशिक्षण गृह याचा या बांधकामामध्ये समावेश असणार आहे.

## कृषिमंत्र्यांचा व्हिडिओ कुणी काढला?
### सरकारची चित्त्याच्या वेगाने चौकशी - रोहित पवार



**मुंबई** : राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी गुरूवारी कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांच्या रमी प्रकरणावरून पुन्हा एकदा महायुती सरकारवर निशाणा साधला. बीडच्या ज्ञानेश्वरी मुंडे आपल्या नवऱ्याच्या खुन्यांना गजाआड करण्यासाठी 2 वर्षांपासून आक्रोश करत आहेत. त्यांची दखल घेतली जात नाही. पण विधिमंडळात पत्ते खेळणाऱ्या मंत्र्याचा व्हिडिओ कुणी काढला? याचा तपास चित्त्याच्या वेगाने केला जात आहे, असे ते म्हणालेत. रोहित पवार यांनी गुरूवारी पत्रकारांशी संवाद साधला. त्यात त्यांनी महादेव मुंडे हत्या प्रकरण, कृषिमंत्री माणिकराव कोकाटे व्हिडिओ प्रकरण, शेतकरी आत्महत्या, महिला अत्याचार, सत्ताधारी पक्षांच्या आमदारांचे गैरवर्तन आदी विविध मुद्यांवरून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वातील सरकारवर हल्ला चढवला. ते म्हणाले, पतीच्या खुन्यांना गजाआड करण्यासाठी एक ज्ञानेश्वरी मुंडे ही भगिनी 2 वर्षांपासून आक्रोश करत आहे.

## राज्याचे स्मशान केले
### संजय राऊत यांची टीका



**मुंबई** : राज्याचे मुख्यमंत्री आणि त्यांचे दोन डेप्युटी कोणत्या हवेत आणि कोणत्या भ्रमात वावरत आहेत? असा प्रश्न ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी उपस्थित केला. ते कोणत्या जगात आहेत? असे देखील त्यांनी म्हटले आहे. देवेंद्र फडणवीस यांचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी कौतुक केले. मात्र पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दोन दिवस महाराष्ट्रात येऊन राहावे. यात गेल्या पाच महिन्यात ज्या शेतकऱ्यांच्या आत्महत्या झाल्या आहेत, त्यांच्या कुटुंबांना बोलावून त्यांच्याशी चर्चा करावी. राज्याला देवेंद्र फडणवीस यांनी स्मशान केले असल्याचे मोदींनी समजून घ्यावे, असा आवाहन देखील राऊत यांनी केला आहे. सांगली येथील तरुण कंत्राटदार हर्षल पाटील यांची आत्महत्या नसून हा सदोष मनुष्यवध असल्याचा आरोप संजय राऊत यांनी केला आहे.

### शेतकऱ्यांनंतर आता ठेकेदार आत्महत्या करू लागले
## राजू शेट्टींचा सरकारवर हल्लाबोल



**सांगली** : वाळवा तालुक्यातील तांदुळवाडी गावातील जल जीवन मिशनसाठी काम करणाऱ्या 35 वर्षीय ठेकेदार हर्षल पाटील यांनी बिले वेळेवर न मिळाल्यामुळे आत्महत्या केल्याचा हृदयद्रावक प्रकार उघडकीस आला आहे. त्यांच्या पश्चात पत्नी व पाच वर्षांची मुलगी असा परिवार असून, या घटनेने कंत्राटदारांमध्ये संतापाचा आणि असुरक्षिततेचा सूर उमटला आहे. या प्रकरणावर स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे नेते आणि माजी खासदार राजू शेट्टी यांनी राज्य सरकारवर जोरदार टीका केली आहे. त्यांनी स्पष्ट शब्दांत म्हटले आहे की, सामान्य जनतेचा बळी घेऊन तुम्ही जो बेधुंद कारभार चालवला आहे, तो आता शेतकऱ्यांच्या आत्महत्यांपासून ठेकेदारांच्या आत्महत्यांपर्यंत पोहोचला आहे.

## मुंबई विद्यापीठातील ८७ अनुकंपा कर्मचाऱ्यांना दिलासा

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २४ :

विद्यापीठातील ८७ अनुकंपा तत्वावर नियुक्त कर्मचाऱ्यांच्या सेवांना अखेर नियमिततेची मंजुरी मिळाली आहे. उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी आज मंत्रालयात झालेल्या आढावा बैठकीत ही माहिती दिली. आज मंत्रालयात उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या आढावा बैठकीचे आयोजन करण्यात आले. बैठकीस अपर मुख्य सचिव बी. वेणुगोपाल रेड्डी, उच्च शिक्षण संचालक डॉ. शैलेंद्र देवळाणकर, तंत्रशिक्षण संचालक डॉ. विनोद मोहितकर उपस्थित होते.

मंत्री चंद्रकांतदादा पाटील म्हणाले मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सर्व विभागांसाठी १५० दिवसांचा उद्दिष्ट कार्यक्रम निश्चित केला आहे. त्याअंतर्गत आकृतीबंध अद्ययावत करणे, नियुक्ती नियम सुधारित करणे आणि अनुकंपा तत्वावरील भरती १०० टक्के करण्यावर भर देण्यात आला आहे. ते पुढे म्हणाले की, मुंबई विद्यापीठातील अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या अनुकंपा नियुक्त्यांचा कालबद्ध आढावा घेऊन आता त्यांना न्याय मिळवून दिला आहे. यावेळी मंत्री पाटील यांनी निर्देश दिले की, सध्या विभागात असलेल्या सर्व रिक्त अनुकंपा जागांचा तातडीने आढावा घ्या आणि १०० टक्के भरती प्रक्रिया पूर्ण करा. हा निर्णय मुंबई विद्यापीठातील अनुकंपा कर्मचाऱ्यांसाठी मोठा दिलासा ठरणार आहे.

## जनसंवादाच्या माध्यमातून नागरिकांच्या अडचणी सोडवाव्यात : चंद्रशेखर बावनकुळे

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २४ :




महसूल विभागाचे काम गतिमान, पारदर्शक आणि लोकाभिमुख होण्यासाठी विभागातील अधिकाऱ्यांनी नागरिकांना प्रत्यक्ष भेटून त्यांच्या अडचणी जाणून घ्याव्यात. जनसंवाद, लोकशाही दिन आदी माध्यमातून त्यांच्या समस्या सोडविण्याचा प्रयत्न करावा, असे निर्देश महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिले.

रायगड जिल्ह्यातील महसूल विभागाशी संबंधित कामांचा आढावा मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी मंत्रालयात झालेल्या बैठकीत घेतला. यावेळी मंत्रालयातील अधिकाऱ्यांसह रायगड जिल्ह्यातील महसूल अधिकारी दूरदृश्य प्रणालीद्वारे उपस्थित होते.

मंत्री चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले, राज्य शासनाच्या 150 दिवसांच्या कार्यक्रमाच्या अंमलबजावणीमध्ये रायगड जिल्हा प्रशासन मागे राहणार नाही याची दक्षता घ्यावी. शासकीय जमिनीवरील अतिक्रमणे नियमित करुन लाभार्थ्यांना घरांसाठी पट्टे उपलब्ध करुन द्यावेत. नवीन वाळू धोरण आणि मार्गदर्शक सूचनांनुसार वाळू उपलब्ध करुन द्यावी. भूमि अभिलेख विभागाच्या आधुनिकीकरणासाठी जिल्हा नियोजनच्या निधीमधून खर्च करण्यात यावा. पाणंद रस्त्यांना क्रमांक देऊन दुतर्फा वृक्ष लागवड करण्यात यावी. लोकअदालत सारख्या माध्यमांतून अर्धन्यायिक प्रकरणांच्या सुनावण्या येत्या तीन महिन्यात पूर्ण कराव्यात. याचबरोबर जिवंत सातबारा, तुकडेबंदी, शेतरस्ता, भोगवटादार 2 मधून 1 मध्ये करण्याची तसेच आकारी पड जमिनीची प्रकरणे, स्वामित्व योजनेचा लाभ देणे आदी कामे देखील कालमर्यादेत मार्गी लावावीत, असे निर्देश त्यांनी दिले.

## राज्यातील विद्यार्थ्यांना तांत्रिक शिक्षण प्रवेशात दिलासा
### विद्यार्थी सहाय्यता केंद्रे स्थापन करण्याचा निर्णय

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २४ :

राज्यातील ग्रामीण तसेच शहरी भागातील विद्यार्थ्यांना तांत्रिक शिक्षणाच्या प्रवेश प्रक्रियेत सुलभता, पारदर्शकता आणि तांत्रिक सहाय्य मिळावे, यासाठी विद्यार्थी सहाय्यता केंद्रे स्थापन करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला आहे, अशी माहिती उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी दिली.

राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्षाच्या आढावा बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. या बैठकीस अपर मुख्य सचिव बी. वेणुगोपाल रेड्डी, राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्षाचे आयुक्त दिलीप सरदेसाई, तंत्रशिक्षण संचालक डॉ. विनोद मोहितकर उपस्थित होते. मंत्री चंद्रकांतदादा पाटील म्हणाले की,"राज्यातील विद्यार्थ्यांना तांत्रिक अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रियेत सहकार्य करण्यासाठी संगणक सुविधांसह सुसज्ज अशी विद्यार्थी सहाय्यता केंद्रे स्थापन केली जाणार आहेत.

ही केंद्रे विद्यार्थ्यांना अर्ज प्रक्रिया, आवश्यक कागदपत्रांची तपासणी, समुपदेशन व मार्गदर्शन याबाबत मदत करतील. मंत्री पाटील पुढे म्हणाले,"मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली गुणवत्तापूर्ण शिक्षण व तांत्रिक प्रगतीसाठी ही महत्त्वाची पायरी ठरणार आहे."

## महिलेवर लोखंडी सळईने हल्ला

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २४ :

रात्रीच्या जेवणात जास्त चिकन आणि चायनीज न दिल्यामुळे संतप्त झालेल्या पतीने महिलेवर लोखंडी सळईने हल्ला केल्याचा धक्कादायक प्रकार मुंबईतील ट्रॉम्बे भागात घडला. या प्रकरणी ट्रॉम्बे पोलिसांनी अजय अरुण दाभाडे (३८) याला अटक केली.

पीडित स्वाती दाभाडे (३७) हिने दिलेल्या तक्रारीनुसार, २३ जुलै रोजी रात्री जेवणाच्या वेळी अजयने तिला अधिक चिकन व चायनीज वाढण्याची मागणी केली. त्यावर स्वातीने जेवण संपल्याचे सांगितले. या उत्तराने संतप्त होऊन अजयने लोखंडी सळईने तिच्या डोक्यावर प्रहार केला. या हल्ल्यात गंभीर जखमी झालेल्या स्वातीला तातडीने शताब्दी रुग्णालयात दाखल करण्यात आले. सध्या तिची प्रकृती स्थिर असल्याची माहिती पोलिसांनी दिली. स्वातीने तब्येत ठिक झाल्यानंतर ट्रॉम्बे पोलीस ठाण्यात तक्रार दिली. भारतीय न्याय संहितेच्या कलम १०९ (हत्येचा प्रयत्न), ११५ (२) (हिंसा), ३५२ (मारहाण), आणि ३ (५) (सामूहिक हेतू) या कलमांतर्गत अज. विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याचप्रमाणे मुलाला पाठिंबा दिल्याचा आरोप करीत अजयच्या आईविरोधातही गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याआधी १ जून रोजी स्वातीने पती व सासरच्या मंडळींविरुद्ध हुंडाबळीचा गुन्हा दाखल केला होता. ही तक्रार मागे घेण्यासाठी अजय स्वातीवर दबाव टाकत असल्याचे पोलीस तपासात समोर आले आहे. स्वातीवर वडिलांकडून पाच लाख रुपये आणण्याचा दबाव अजय टाकत होता. आरोपीला त्या रकमेतून सावकारी व्यवसाय सुरू करायचा होता, असे तक्रारीत म्हटले आहे.

यापूर्वीही स्वातीने जून महिन्यात पतीविरोधात पोलिसांकडे तक्रार केली होती. त्याप्रकरणी गुन्हा दाखल केला होता. त्यानंतर तक्रारदार महिला तीन मुलींसह तिच्या माहेरी राहण्यासाठी गेली होती. त्यावेळी आरोपी पतीने त्यांची माफी मागितली. तसेच त्रास होणार नाही, असा विश्वास दिला होता. त्यावेळी मुलींच्या शिक्षणाचे नुकसान होऊ नये, म्हणून तक्रारदार महिला पुन्हा सासरी आली. त्यानंतर आरोपीने हुंड्यासाठी धमकावण्यास सुरूवात केल्याचे तक्रारीत म्हटले आहे.

### फडणवीसांच्या वाढदिवशी भाजपाचा महारक्तदान विक्रम

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २४ :

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त भारतीय जनता पार्टीने आयोजित केलेल्या महारक्तदान शिबिरांनी दोन जागतिक विक्रम प्रस्थापित केले आहेत. या उपक्रमाची नोंद एशिया बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड्समध्ये झाली असून, भाजपा प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांना विशेष सन्मान प्रदान करण्यात आला. या महाअभियानाचे आयोजन भाजपा प्रदेश कार्यालय आणि डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी न्यासाच्या वतीने करण्यात आले होते. एशिया बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड्सचे वरिष्ठ परीक्षक संजय भोला आणि सीमा मन्नीकोट यांच्या हस्ते भाजपा प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांना प्रशस्तीपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवशी सामाजिक भान राखत रक्तदान शिबिरांनी दोन जागतिक विक्रम प्रस्थापित केले.

## महाराष्ट्र राज्य वस्तू व सेवा कर विभागाची कारवाई

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २४ :

राज्य शासनाच्या वस्तू व सेवा कर विभागामार्फत बोगस बिलिंग प्रकरणी सुरू असलेल्या विशेष मोहिमेअंतर्गत मे. ॲक्युरेट एंटरप्रायजेस या भागीदारी व्यवसायाविरुद्ध तपासात्मक कारवाई करण्यात आली. या कारवाई दरम्यान बनावट खरेदी दाखवून वस्तू व सेवा करांतर्गत खोटी कर सवलत (इनपुट टॅक्स क्रेडिट) घेऊन सुमारे रुपये ९.१९ कोटींची महसूल हानी करण्यात आल्याचे निदर्शनास आले.

या प्रकरणी जबाबदार व्यक्ती त्रिभुवन सिन्हा (वय ५०) आणि अख्तर खान (वय ५५) यांना दिनांक २९ जुलै २०२५ रोजी अटक करण्यात आली असून, अप्पर मुख्य महानगर दंडाधिकारी, मुंबई यांनी त्यांना १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावली आहे.

ही कारवाई सहायक राज्यकर आयुक्त चंदर कांबळे, दादासाहेब शिंदे, राजेश बदर (अन्वेषण 'अ', मुंबई) यांनी राज्यकर सहआयुक्त (भा.प्र.से.) प्रेरणा देशभ्रतार आणि राज्यकर उपायुक्त अनिल कुदळे यांच्या मार्गदर्शनाखाली केली.या कारवाईत राज्यकर निरीक्षकांचे विशेष सहकार्य लाभले.

राज्य वस्तू व सेवा कर विभागाने सर्वसमावेशक नेटवर्क विश्लेषण साधने वापरून आणि अन्य संबंधित यंत्रणांशी समन्वय साधत अशा प्रकारच्या करचुकवेगिरी करणाऱ्या व्यक्ती आणि संस्थांविरोधात कठोर कारवाई सुरू ठेवली आहे. आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्ये ही सहावी आणि सातवी अटक आहे.

## सार्वजनिक गणेशमंडळांना हायकोर्टाचा दिलासा
### ६ फुटांपेक्षा मोठ्या गणेशमूर्ती समुद्रात विसर्जन करण्यास परवानगी

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २४ :

यंदाच्या गणेशोत्सवापुरते सहा फुटांपेक्षा अधिक उंचीच्या पीओपी गणेशमूर्तींचे विसर्जन समुद्रात व नैसर्गिक जलप्रवाहांत करण्यास मुंबई हायकोर्टाने परवानगी दिली आहे. 6 फूट उंचीपर्यंतच्या सर्व पीओपी मूर्तींचे विसर्जन हे कृत्रिम तलावांमध्येच करायचे आहे. त्याचे तंतोतंत पालन संपूर्ण राज्यात सर्व महापालिका व स्थानिक स्वराज्य संस्थांनी करावे. त्यादृष्टीने आवश्यक प्रमाणात कृत्रिम तलावांची व्यवस्था करावी, असाही आदेश हायकोर्टाने दिला आहे.

उच्च न्यायालयाने ही परवानगी या वर्षापुरती दिली आहे. यावर्षी होणाऱ्या नवरात्रोत्सव, अन्य उत्सव व पुढील वर्षीच्या सुरुवातीला होणाऱ्या माघी गणेशोत्सवासाठी म्हणजेच मार्च-2026 पर्यंतच ही परवानगी असेल, असे मुख्य न्यायमूर्ती आलोक आराधे व न्यायमूर्ती संदीप मारणे यांच्या खंडपीठाने आदेशात स्पष्ट केले.

गणेश भक्तांच्या प्रयत्नांना यश मिळाले. सुप्रीम कोटार्ने पीओपी वर घातलेली बंदी राज्य सरकारने सोडवून घेतली. सार्वजनिक गणपती उत्सवातील गणेश मूर्तींचे विसर्जन प्रथा परंपरेनुसार वाजत गाजत होणार की नाही? सोबतच पर्यावणपूरक व्यवस्थाही निर्माण होणार की नाही? याबद्दलची शंका दूर झाली आहे. काकूडकर यांच्या नेतृत्वात



राजीव गांधी आयोगाचा आलेला अहवाल पीओपीच्या मूर्तींना परवानगी द्यायला मदतीस तर ठरलाच, त्याचबरोबर दुसऱ्यांदा अभ्यासगट निर्माण केल्यावर पीओपीवर प्रक्रिया होऊ शकते आणि म्हणून या सगळ्याला समुद्र आणि नैसर्गिक जलस्त्रोतामध्ये विसर्जनाचा रस्ता हा काढता येऊ शकतो, अशी भूमिका अहवालातून मांडली, असे आशिष शेलार यांनी सांगितले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या विषयासंदर्भात बैठक घेतली. संबंधित सर्व खात्यातील अधिकारी यांच्या प्रयत्नांनी आता आपला गणपती बाप्पा पर्यावरणपूरक राहीलच आणि प्रथा परंपरेत उत्साहामध्ये सर्व सार्वजनिक गणेश उत्सवातील गणेश मूर्तींच्या विसर्जनाची धूम ही राज्य महोत्सव म्हणून आता जगभर होतीच ती अजून वाढेल, असा विश्वास आशिष शेलार यांनी व्यक्त केला.

आशिष शेलार यांनी असेही नमूद केले की, महाविकास आघाडी सरकारच्या काळात कोविड काळात गणपती बसूच नये, अशी व्यवस्था तत्कालिन मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी केली. एकप्रकारे ती बंदीच मानता येईल. त्या अगोदरच्या काळात पीओपीच्या गैरसमज निर्माण करून, चुकीच्या आधारावर सीपीसीच्या गाइडलाईनवर न्यायालयाचे आदेश आले. म्हणजे काँग्रेसच्या काळात एकंदरीत या सणावर नख लावण्याचे काम झाले. या दोन्ही बंधनातून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि महायुतीच्या सरकारने गणेशभक्तांची इच्छा पूर्ण केली, असे आशिष शेलार यांनी म्हटले.

आता लालबागचा राजा, चिंचपोकळीचा चिंतामणी, गिरगावचा राजा, उपनगराचा राजा यांसारख्या गणेश मंडळांच्या आणि सहा फूटपेक्षा अधिक उंचीची मूर्ती असणाऱ्या गणेश मंडळाच्या मूतीर्ची विसर्जन दिमाखात होतील. तर सहा फुटांच्या आतील गणेश मूर्तींचे पर्यावरणपूरक कृत्रिम तलावात विसर्जन होईल, असे आशिष शेलार यांनी सांगितले.

राज्य सरकारने धोरण सादर करून पाच फुटांपर्यंतच्या पीओपी मूर्तींचे विसर्जन कृत्रिम तलावांमध्येच करण्याची खबरदारी घेण्याची हमी दिली होती. मात्र, हायकोर्टाने पाच फुटांऐवजी सहा फुटांपर्यंतच्या मूर्तीसाठी तसे बंधन घालून आदेश काढला आणि समुद्र व नैसर्गिक जलस्त्रोतांमधील विसर्जनावरील बंदी उठवली.

## राज्यात रेड अलर्ट

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २४ :

राज्यात पुढील २४ तासासाठी रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग जिल्ह्यांसह पुणे घाट, सातारा घाट, कोल्हापूर घाट या भागात रेड अलर्ट देण्यात आला आहे. जिल्हा प्रशासनाला सतर्क राहण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत, असे राज्य आपत्कानील कार्य केंद्राने कळविले आहे.

भारतीय राष्ट्रीय महासागर माहिती सेवा केंद्रामार्फत ठाणे, मुंबई शहर व उपनगर, रायगड, रत्नागिरी, पालघर आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यांच्या किनारपट्टीला दि. २४ जुलै २०२५ रोजी सायंकाळी ५.३० पासून ते दि. २६ जुलै २०२५ रोजीचे रात्रौ ८.३० पर्यंत ३.८ ते ४.७ मीटर उंच लाटांचा इशारा देण्यात आला आहे. या कालावधीत लहान होड्यांना समुद्रात न जाण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. तसेच समुद्राची धूप आणि उंच लाटांचे तडाखे समुद्र किनारी येण्याचा इशारा देण्यात आला असून सर्व जिल्हा प्रशासनाला सतर्क राहण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. गडचिरोली जिल्ह्यातील गोमणी येथे कोलपल्ली नाल्याच्या अचानक वाढलेल्या पुराच्या पाण्यात ग्रामसेवक उमेश धोडरे अडकले असता, पोलीस विभाग आणि स्थानिक बचाव पथक तात्काळ घटनास्थळी पोहचून त्यांना सुरक्षित बाहेर काढण्यात आले.

मुंबई शहर आणि उपनगर यांना पाणी पुरवठा करणाऱ्या मोडक सागर, मध्य वैतरणा आणि तानसा या धरणातून अनुक्रमे २०४३.७४, २११८.९५ आणि ३३१५.२५ क्युसेक इतका विसर्ग सुरू आहे. संभाव्य आपत्तीच्या अनुषंगाने राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दल आणि राज्य आपत्ती प्रतिसाद दल यांनाही सतर्क राहण्याच्या सूचना देण्यात आल्या असल्याचेही राज्य आपत्कालीन कार्य केंद्राकडून कळविण्यात आले आहे.

## सर्व शालेय उपक्रमांची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी नियोजन करावे : डॉ. पंकज भोयर




■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २४ :

विद्यार्थ्यांचे सर्वांगीण विकास हेच शासनाचे उद्दिष्ट असून शिक्षणाच्या प्रत्येक टप्प्यावर गुणवत्ता आणि आधुनिकतेचा समन्वय साधला जावा. यासाठी या सर्व शालेय उपक्रमांची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी शिक्षण विभागाने सुयोग्य नियोजन करावे, असे निर्देश शालेय शिक्षण राज्यमंत्री डॉ.पंकज भोयर यांनी दिले.

मंत्रालयात शालेय शिक्षण राज्यमंत्री डॉ.पंकज भोयर यांनी मुख्यमंत्री विद्यार्थी विज्ञान वारी, मुख्यमंत्री ज्ञानपत्र योजना आणि पूर्व प्राथमिक शाळांची नोंदणी या विषयांचा आढावा घेतला. यावेळी ते बोलत होते. या बैठकीस प्रधान सचिव रणजितसिंह देओल, शालेय शिक्षण आयुक्त सचिंद्र प्रताप सिंह (दूरदृश्य प्रणालीद्वारे), राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेचे संचालक राहुल रेखावार (दूरदृश्य प्रणालीद्वारे), प्राथमिक शिक्षण संचालक शरद गोसावी, उपसचिव समीर सावंत, उपसचिव तुषार महाजन आदी उपस्थित होते.

राज्यमंत्री डॉ. भोयर म्हणाले, राज्यातील विद्यार्थ्यांमध्ये विज्ञान विषयक आत्मीयता निर्माण व्हावी या उद्देशाने मुख्यमंत्री विद्यार्थी विज्ञान वारी उपक्रम राबविण्यात येत आहे. या उपक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना विविध प्रतिष्ठित वैज्ञानिक संस्थांना भेट देण्याची संधी मिळणार आहे. मुख्यमंत्री ज्ञानपत्र योजना अंतर्गत राज्यातील प्रत्येक विद्यार्थ्यांपर्यंत पर्यावरण संवर्धनाचा संदेश पोहोचविण्यात येणार असल्याचे राज्यमंत्री डॉ. भोयर यांनी सांगितले.

शुक्रवार, दि. २५ जुलै २०२५

# चंद्रपूर महासागर

पान ३

## आज २५ जुलै जिल्ह्यातील शाळांना सुटी जाहिर

**चंद्रपूर, दि. २४ :** भारतीय हवामान खात्याच्या वर्तवलेल्या अंदाजानुसार २५ जुलै रोजी चंद्रपूर जिल्ह्यात 'रेड अलर्ट' दिला असून काही ठिकाणी अत्यंत मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता वर्तविलेली आहे. त्यामुळे चंद्रपूर जिल्हयात कोणत्याही प्रकारची अनुचित घटना घडू नये, तसेच अतिवृष्टीमुळे आपत्कालीन परिस्थिती निर्माण झाल्यास त्याचा परिणाम शालेय विद्यार्थ्यांवर होऊ नये, याकरिता चंद्रपूर जिल्ह्यातील सर्व अंगणवाड्या, पूर्व प्राथमिक, प्राथमिक व माध्यमिक शाळा, विद्यालये, महाविद्यालये व खाजगी कोचिंग क्लासेस यांना २५ जुलै रोजी सुट्टी जाहीर करण्यात आली आहे.

## भारतीय मजदूर संघाचा स्थापना दिवस संपन्न

**घूग्घूस -** दि.२३ जुलै २०२५ बुधवार रोज घुग्घुस येथील भारतीय लॉयड्स मेटल्स कामगार संघ कार्यालयात ' '२३ जुलै भारतीय मजदूर संघ ७१ वा स्थापना दिवस' मोठ्या उत्साहात कार्यक्रम करण्यात आला.सर्वप्रथम भगवान विश्वकर्मा,भारत माता,लोकमान्य बाळ गंगाधर टिळक व भारतीय मजदूर संघाचे संस्थापक दंत्तोपंत ठेंगडी या-च्या प्रतिमेस माल्यार्पण करून अभिवादन करण्यात आले.तसेच दि-पजव्लीत करुण सामुहिक भारतीय मजदूर संघाचे गायण करण्यात आले.भारतीय लॉयड्स मेटल्स कामगार संघाचे अध्यक्ष विवेक अल्लेवारी यांनी मार्गदर्शन केले.

# पुराचे पाण्यात अडकलेल्या शालेय विद्यार्थ्यांना पोलिसांनी गावी सुखरूप पोहचविले

## शुक्रवारी चंद्रपूर जिल्ह्याला रेड अलर्ट

**महासागर प्रतिनिधी**

**चंद्रपूर, दि. २४ जुलै :** जिल्हयात मागील दोन दिवसापासून सतत मुसळाधार पावसामुळे जिल्हयातील धरणे, नदी, नाले यांना पुर येवुन अनेक मार्गावरील पुलावरुन पाणी वाहत आहे. दिनांक २३ जुलै रोजी पोलीस स्टेशन विरुर अंतर्गत मौजा वरून ते विरुर मार्गावरील नाल्याला पुर आल्याने दोन महामंडळ बस विचबोर्डी, सिर्शी गावाजवळ रोडवर सांयकाळी ६:३० वाजल्यापासुन अडकेल्या होत्या. बस मध्ये २५ ते ३० शाळेचे विद्यार्थी आणि २५ ते ३० गावकरी नागरीक अडकलेले आहेत अशी माहिती विरुर पोलीसांना



मिळताच पोलीस स्टेशन विरूरचे ठाणेदार सपोनि संतोष वाकडे हे तात्काळ पोलीस स्टॉफ सह शासकीय वाहनाने सदर ठिकाणी पोहचुन पुराचे पाण्यामुळे अडकलेल्या आणि सकाळ पासून उपाशी असलेल्या विद्यार्थ्यांकडे जावुन त्यांना नाश्ता, बिस्कीट आणि पाण्याची व्यवस्था केली व त्यांना धिर देऊन अंदाजे दोन अडीच तास त्यांच्या सोबत राहुन पुराचे पाण्याचा प्रवाह कमी झाल्याने शासकीय वाहन दोन्ही बसच्या समोर लावुन त्यांना अडकलेल्या ठिकाणाहून बाहेर काढून शाळेतील मुलांचे पाल्य, आई-वडील काळजी करत असल्याने विद्यार्थ्यांच्या गावी डोंगरगांव, सुबई, कविडपेठ, चिंचोली गावात जावुन प्रत्येक विद्यार्थ्यांना रात्री १२ पावेतो सुखरुप त्यांचे घरी पोहचवुन दिले. सदरची कामगिरी विरुर ठाणेदार सपोनि संतोष वाकडे यांचे नेतृत्वात परि. पोउपनि दत्ताहरी जाधव, विजय मुंडे, राहुल वैद्य, हर्षल लांडे, हर्षल चौधरी, विभीषण साटके, सौरव पगडपेललीवार, संजय कोडापे सर्व पोलीस स्टेशन विरुर यांनी केली आहे.

## विज अंगावर पडून शेतकऱ्यांचा मृत्यू

**चिमूर :** तालुक्यातील पिंपळगाव येथील शेतकरी दिलीप गुलाब श्रीरामे वय ३५ वर्षे मौजा वगार पेठ शेतशिवारात बुधवारला दुपारी अंदाजे २ वाजताचे सुमारास विजेच्या कडाटासह पाऊस आला. त्यावेळी दिलीपच्या अंगावर विज पडून मृत्यु झाल्याची घटना घडली. मृतकाचे नातेवाईकांनी भिसी पोलीस स्टेशन येथे दिलेल्या माहीती नुसार घटना स्थळ पंचनामा केला. त्यानंतर अकस्मात मृत्यूची नोंद करून मृतदेह शवविच्छेदनाकरिता उपजिल्हा रूग्णालय चिमुर येथे पाठविण्यात आलेले आहे. दिलीप श्रीरामे च्या अकाली मृत्यु ने परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. मृतकाचे पश्चात पत्नी, आई-वडील, दोन मुली व बराच मोठा आप्त परिवार आहे. पुढील तपास भिसी पोलीस करित आहेत

# २५-२६ जुलै दरम्यान विदर्भात मुसळधार पावसाचा अंदाज

## शुक्रवारी चंद्रपूर जिल्ह्याला रेड अलर्ट

**महासागर प्रतिनिधी**

**चंद्रपूर, दि. २४ जुलै :** काही दिवसांची उसंत घेतल्या नंतर दोन दिवसांपूर्वी जिल्ह्यात पाऊस पुन्हा सक्रिय झाला. बुधवारी पावसाने चंद्रपूर शहर, राजुरा, कोरपना सिंदेवाही,बल्लारपूर व जिवती तालुक्यात दमदार हजेरी लावली. दुपारी सुरू झालेल्या मुसळधार पावसाने चंद्रपुरकरांना झोडपून काढले. सायंकाळी पावसाची तीव्रता कमी झाली पण रात्री पावसाने सम्पूर्ण जिल्ह्याला कवेत घेतले.गुरुवारी दिवसभर पावसाची रिप रिप सुरूच होती.जिल्ह्यातील ५ तालुक्याला अतिवृष्टीचा सामना करावा लागला.कोरपना तालुक्यात १०२.७मिमी,बल्लारपूर येथे ९४.०मिमी ,जिवती येथे ८२.१मिमी, राजुरा येथे ७५.४ मिमी तर सिंदेवाही तालुक्यात ६६.८ मिमी पावसाची नोंद करण्यात आली.५ तालुक्यात अतिवृष्टी व चौफेर पाऊस असल्याने नदी नाले आता फुगू लागले आहेत.हवामान खात्याने आता शुक्रवारी(दि २५) रेड अलर्ट जारी केला आहे.या सोबतच पूर येण्याची शक्यता वर्तविण्यात आली असून नदी काठावरील गावांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. बुधवारी झालेल्या पावसामुळे जनजीवन प्रभावित झाले.महानगरात पूर सदृश्य स्थिती निर्माण झाली.यात तुकुम व शास्त्रीनगरात पाणी साचले तटबंदीच्या आत पुरसदृश स्थिती निर्माण झाल्याने दुकानदारांचे मोठे नुकसान झाले.

# पाच वर्ष लोटूनही वृद्ध दांपत्याच्या हत्येचे रहस्य उलगडले नाही

**महासागर तालुका प्रतिनिधी**

**भद्रावती, दि. २४ जुलै :** तालुक्यातील चोरा येथील शेतातील घरात कुजलेल्या अवस्थेत वृद्ध पती व पत्नीचा मृतदेह २८ जुलै २०२० मध्ये आढळला होता, या घटनेला पोलिसांनी मर्ग दाखल केला.

तपासात घातपाताचा संशय आल्याने पोलिसांनी हत्येचा गुन्हा दाखल केला होता, मात्र पोलीस तपासाला पाच वर्षे लोटली तरी, हत्येचे आरोपी पोलिसांना गवसले नसल्याने अजूनही आसुटकर कुटुंब न्यायाच्या प्रतीक्षेत आहे .

गजानन आसुटकर व ६२ वर्ष व शीला आसुटकर वय ५५ वर्ष राहणार चोरा असे हत्या झालेला वृद्ध पती पत्नीचे नाव आहे गजानन यांचे चोरा येथून दोन किमी अंतरावर शेत आहे.शेतात घर होते. दोघेही पती-पत्नी शेतात राहत होते तर, त्यांचे चार मुले नोकरी व काम धंदा असल्याने भद्रावती येथे राहत होते. दी २८ जुलैला या दोघांचा खाटेवर कुजलेल्या अवस्थेत मृतदेह आढळला होता.

एकाच वेळेस दोघांचा अकस्मात मृत्यू होणे ही बाब



पोलिसांनाही खटकली होती, तसेच मृतकाची मुले प्रदीप आसुटकर व शरद आसुटकर यांनी आपल्या आई-वडिलांची आत्महत्या नसून हत्या केल्याचा आरोप केला होता. पोलीस तपासा नंतर हत्ये चा गुन्हा दाखल केल्यानंतर तपास चक्रे फिरवली, मात्र भद्रावती पोलिसांना हे प्रकरण उलघडले नसल्याने या प्रकरणाचा गुन्हे अन्वेषण विभाग चंद्रपूर यांनी तपास केला त्यानंतर आता हे प्रकरण सीआयडी कड प्रलंबिते आहे.

या प्रकरणातील आरोपीचा काही शोध लागला काय हे विचारणा करण्याकरता मृतकाची मुले प्रदीप आसुटकर हे वारंवार कार्यालयात जात असतात, मात्र तपास सुरू असल्याचे सांगण्यात येत असल्याने त्यांना परत यावे लागते. आपल्या आई-वडिलांच्या हत्यारांचा शोध कधी लागणार व आम्हाला न्याय कधी मिळणार या प्रतीक्षेत अजूनही आसुटकर कुटुंब आस धरून आहे.

# कायद्याचा भंग रुग्णालयात जंगी कार्यक्रम डीजे अन् डान्स रुग्णांना झाला त्रास

**महासागर तालुका प्रतिनिधी**

**ब्रम्हपुरी, दि. २४ जुलै :** शासनाच्या परिपत्रकानुसार कोणत्याही शासकीय कार्यालयात शासकीय कार्यक्रमा व्यतिरिक्त कार्यक्रम घेऊ नये इतर कार्यक्रम घेतल्यास त्यावर कारवाईचे निर्देश दिले असतानाही ब्रम्हपुरी येथील ग्रामीण रुग्णालयात सेवानिवृत्तीचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला त्यात डीजे वर गाणे लावून डान्स करण्याचा करणाल्यामुळे रुग्णांना नाहक त्रास सहन करण्याचा प्रकार घडल्याची माहिती प्राप्त झाली.त्यावर वरिष्ठ काय कारवाई करतात याकडे सर्वांचे लक्ष लागून आहे.

ब्रम्हपुरी शहर शैक्षणिक, आरोग्य नगरी म्हणून प्रसिद्ध आहे.मात्र नागरिक ज्यांना देवाची उपमा देतात त्याच डॉक्टरांकडून त्यांच्यात उपस्थितीत रुग्णांना त्रास होईल असे कृत्य घडत असेल तर देव म्हणाव की पोटभरू देव / दैत्य म्हणाव असे वाटू लागले. ब्रम्हपुरी शहरातील ग्रामीण रुग्णालयात एका कर्मचाऱ्याचा सेवानिवृत्ती झाल्याचा कार्यक्रम घेतला गेला. सदर कार्यक्रम साध्या प्रकारे न घेता मोठया आवाजात डीजे वाजवून कर्मचारी काही डॉक्टर डीजेच्या तालावर नाचत होते.त्यांना एवढही भान नाही की आपल्या रुग्णालयात अनेक रुग्ण उपचारासाठी भरती आहेत त्यांना त्रास होत तर नाही ना.शासकीय आदेश असताना कोणतीही पार्टी शासकीय कार्यालयात साजरी करू नये हे अधीक्षकांना माहित नाही काय? असे प्रश्न पडतात. निव्वळ पदाचा गैरवापर आणि आवेश प्रवृत्ती शासनाच्या नियमाची अवहेलना करण्याचं प्रकार तर नाही ना असे असल्यास ही मोठी चूक असल्याचे निदर्शनास येते.बाकी विभागात कोणतीही पार्टी किंवा शासकीय व्यतिरिक्त कार्यक्रम घेत असताना कार्यक्रमाचे आयोजन बाहेर ठिकाणी करताना दिसतात मग ग्रामीण रुग्णालयात डिजे वाजवून नाचगाणी करून पार्टी करण्याचा व त्यातून रुग्णांना झालेला त्रास हे कितपत योग्य आहे याचाही वरिष्ठ अधिकार यांनी गांभीर्यने घेणार गरजेचे आहे. तसेच योग्य चौकशी करून त्यावर कारवाई अपेक्षित असून बेडर शासकीय सेवेतील डॉक्टर व इतर कर्मचाऱ्यांवर कारवाई वरिष्ठ करणार काय? असा प्रश्न माणसांकडून येताना दिसत आहे. विशेष म्हणजे हे कृत्य बाहेर येऊ नये म्हणून सदर रुग्णालयातील काही डॉक्टर कर्मचा-री यांनी काही लोकांचे खिसे गरम केल्याचीही चर्चा आहे.हा विषय सध्या ब्रम्हपुरी शहरात मोठ्या चवीने चर्चिला जात आहे.

बुधवारला ग्रामीण रुग्णालयातील इमारती मध्ये सेवावृत्तीचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.जेवन सुध्दा होते.तीथ पर्यंत ठिक आहे. पण डिजे लावून नाचगाणी करायला नको पाहिजे होते.सदर इमारत बांधकाम विभागाने अजुन पर्यंत आम्हाला स्वाधीन केले नाही आहे. मी संबंधित घडलेल्या प्रकाराबाबत लीपिक यांच्या कडून अहवाल मागितला आहे.कि ती पार्टी कोणी आयोजित केली होती.त्यानंतर योग्य ती कारवाई करू.


**डॉ.प्रितम खंडाळे**
**वैद्यकीय अधीक्षक**
**उपजिल्हा रुग्णालय ब्रम्हपुरी**

# महादवाडी येथील निकृष्ट झालेल्या बांधकामाची चौकशी करुन दोषींवर कारवाई करा

## सरपंच भोजराज कामडी यांची पत्रकार परिषदेत मागणी

**महासागर प्रतिनिधी**

**नेरी, दि. २४ जुलै :** चिमूर तालुक्यातील महादवाडी गावाला जोडणाऱ्या राष्ट्रीय ३३२ महामार्गचे डाबरीकरणाचे काम गेल्या तीन वर्षांपूर्वी करण्यात आले .डांबरीकरण रस्त्याच्या साईडच्या कामात अत्यल्प मुरुम टाकला गेला अंदाजपत्रका प्रमाणे कामे करण्यात आली नाहीं.थातूरमातूर काम करून कंत्राटदाराचे खिसे भरले गेले असल्याची तक्रार देखील करण्यात आली तसेच.महादवाडी येथे सार्वजनिक बांधकाम विभागाच्या वतीने २५१५ अंतर्गत सामाजिक सभागृहाचे बांधकाम करण्यात आले ते सुद्धा निकृष्ट दर्जाचे करण्यात आले आहे.बांधकाम करताना



निकृष्ट सिमेंट चा वापर करण्यात आला तसेच गावातील सिमेंट रस्ताचे १३० मीटरचे काम असताना फक्त जवळपास ९३ मीटर चे कामे करण्यात आली.ग्रामपंचायतच्या ठराव नुसार कामे न करीता बांधकामं विभागाच्या मर्जीने कामे करण्यात आले आहे.असाही आरोप सरपंच भोजराज कामडी यांनी केला आहे.अपूर्ण कामे असताना अनुदान मात्र पूर्ण कामाचे काढण्यात आली आहे. अनेकदा तक्रारी करून सुद्धा बांधकाम अभियंत्याने दुर्लक्षच केले

चिमूर येथील सार्वजनिक बांधकाम विभागाचे प्रभारी उपअभियंता,यांनी बांधकामाकडे दुर्लक्ष केले. निष्काळजीपणा, बेजबाबदारपणा करीत बांधकाम मंजुरी देऊन शासनाची दिशाभूल करून शासकीय अनुदान वेळोवेळी देण्यात आले असून शासनाची फसवणूक केली आहे. या संबंधात मुख्य बांधकाम अभियंता यांच्याकडे सातत्याने पाठपुरावा केल्यानंतर देखील निकृष्ट रस्त्याच्या चौकशीला मुहुर्त लागत नसल्याचा आरोप त्यांनी केला आहे.शिल्लक असलेले अनुदान न देता त्या कामाची चौकशी करण्यात यावी, प्रभारी बांधकामं अभियंता यांची बदली करण्यात यावी, सदर कामाची चौकशी न केल्यास आंदोलन करण्यात येईल असा इशारा आज महादवाडी ग्रामपंचायत चे सरपंच भोजराज कामडी यांनी आज महादवाडी येथे घेतलेल्या पत्रकार परिषदेत केला आहे.

# संजय शेजुळ यांनी वाढदिवसानिमित्त गरजूला ५० हजारांचे आर्थिक सहाय्य करून दिला सामाजिक संदेश

**महासागर प्रतिनिधी**

**चंद्रपूर, दि. २४ जुलै :** दुर्गापूर येथील मेश्राम या कंत्राटी कामगाराचा अपघात झाला तेव्हापासून यांच्या परिवारावर आर्थिक संकट ओढवले होते. समाजात या परिवाराला सहाय्य करण्याची भावना होती परंतु कुणी पुढाकार घेत नव्हते. सदर बाब निदर्शनास येताच राष्ट्रवादी कॉंग्रेसचे कामगार विभाग जिल्हाध्यक्ष संजय शेजुळ यांनी आपल्या जन्मदिनानिमित्त इतर गाजावाजा न करता या गरजू परिवाराला ५०००० रुपयांची आर्थिक मदत केली.



मेश्राम यांच्या अपघातापासून त्यांच्या द्वारे कोणतेही काम होत नसल्याने त्यांच्या परिवाराचा उदरनिर्वाह, दवाखान्यातील उपचार व मुलांच्या शिक्षणासाठी लागणारा खर्च यामुळे मोठी आर्थिक समस्या निर्माण झाली होती. त्यामुळे हताश झालेल्या या कुटुंबाच्या वतीने अनेकांकडे सहकार्याची अपेक्षा व्यक्त करण्यात आली होती. मात्र कोणताही पक्ष किंवा संस्था यांच्यातर्फे पुढाकार घेण्यात आलेला नव्हता.

सदर गंभीर परिस्थिती लक्ष्यात आल्यानंतर सदैव सामाजिक उपक्रमात पुढाकार घेणारे संवेदनशील व्यक्ती म्हणून परिचित असलेले युवा उद्योजक राष्ट्रवादी कॉंग्रेसचे कामगार विभाग जिल्हाध्यक्ष संजय शेजुळ यांनी आपल्या वाढदिवसानिमित्त कोणताही गाजावाजा न करता मेश्राम परिवाराला ५० हजार रुपयांचे आर्थिक सहाय्य करीत एक सामाजिक बांधिलकी निर्माण केली. शेजुळ यांच्या या उपक्रमामुळे सर्वत्र कौतुक व्यक्त करण्यात येत आहे. संजय शेजुळ यांनी स्वतः मेश्राम कुटुंबाची भेट घेऊन ५०००० रुपयांचा धनादेश दिला. यावेळी दुर्गापूर ग्रामपंचायत चे माजी सरपंच अमोल ठाकरे, राष्ट्रवादी कॉंग्रेसचे सोशल मीडिया जिल्हाध्यक्ष अमर गोमासे, सामाजिक कार्यकर्ते सचिन मांडले, नितीन घुबडे, भोजराज शर्मा, आकाश बंडीवार उपस्थित होते.

# शेतात ये- जा करणारे शेत रस्ते अडवू नका : तहसीलदार मोहनिश शेलवटकर यांचे आवाहन

## शेतकऱ्यांनी परस्पर समन्वय साधून सामाजिक बांधिलकी राखावी

**महासागर तालुका प्रतिनिधी**

**पोंभुर्णा, दि. २४ जुलै :** महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ च्या कलम १४३तसेच मा. माननीय कोर्टाचे आदेश, नुसार शेतकऱ्यांना त्यांच्या शेतीपर्यंत ये-जा करण्यासाठी आवश्यक असणाऱ्या पारंपरिक शेत रस्त्यांचा वापर करण्याचा कायदेशीर हक्क आहे. शेतीत यांत्रिकीकरण, ट्रॅक्टर, रोटाव्हेटर, हार्वेस्टर यांचा वाढता वापर लक्षात घेता, आजच्या काळात व्यापक व सुलभ रस्ते सुविधा ही शाश्वत शेतीच्या दृष्टिकोनातून अत्यावश्यक झाली आहे.

असे असतांना सुध्दा काही



ठिकाणी शेतकऱ्यांनी एकमेकांचे शेती रस्ते अडवून सामाजिक तणाव निर्माण केला जात असल्याचे निदर्शनास आले आहे. हे अत्यंत निषेधार्ह असून यामुळे केवळ वैयक्तिक नुकसानच होत नाही तर समाजात गैरसमज व विघटनास चालना मिळते.

सदर परिस्थिती टाळण्यासाठी सर्व शेतकऱ्यांनी परस्पर समजुतीने आणि प्रशासनाच्या सूचनांनुसार शेत रस्त्यांचा वापर करावा. आपापसातील वाद सामाजिक बांधिलकीने शांततापूर्ण मार्गाने व कायदेशीर प्रक्रियेतून सोडवावित. शेत रस्ते अडवणे ही कायदेशीरदृष्ट्या दंडनीय बाब आहे याची सर्वांनी नोंद घ्यावी. आपआपसांतील शेतरस्त्याचे वाद मिटवण्यासाठी संबंधित क्षेत्रीय अधिकारी / ग्राम महसूल अधिकारी / मंडळ अधिकारी यांची मदत घ्यावी व शेतकऱ्यांना आपल्या गा-वात शांती, समन्वय आणि सहकार्य टिकवण्यासाठी शेतकऱ्यांनी शेत रस्त्यांचा प्रश्न परस्पर चर्चेने सोडवा — समाजातील सलोखा आणि शेतीची प्रगती हेच आपले ध्येय असावे असे तहसीलदार मोहनिश शेलवटकर यांनी म्हटले आहे.

# चिकन मार्केटमध्ये घाणीचे साम्राज्य, नगर परिषदेचे दुर्लक्ष

## साफसफाई करण्याची दुकानदार व नागरिकांची मागणी

**महासागर तालुका प्रतिनिधी**

**राजुरा, दि. २४ जुलै :** शहरात आठवडी बाजार लगत चिकन मार्केट व मटन मार्केट आहे या ठिकाणी राजुरा शहरातील व शहराला लागून असलेल्या ग्रामीण भागातील नागरिक मोठ्या प्रमाणात चिकन व मटन खरेदी करण्याकरिता येत असतात परंतु या ठिकाणी साफसफाई होत नसल्याने व पाण्याचा प्रश्न असल्याने येथील दुकानदार व नागरिकांना घाणीचा व दुर्गंधीचा सामना करावा लागत आहे.

घाणीमुळे व दुर्गंधीमुळे आरोग्याचा प्रश्न निर्माण होत असल्याने वेळीच नगर परिषदेने या ठिकाणी पाण्याच्या टाक्या दुरुस्त करून दुकानालगत असलेल्या घाणीची साफसफाई करणे आवश्यक असल्याचे मत नागरिकानी व्यक्त केले आहे.



राजुरा शहरात मटन चिकन व मच्छी विकण्याकरीता सोमनाथपूर लगत असलेल्या आठवडी बाजाराच्या बाजूला मटन मार्केट तयार केले आहे त्या ठिकाणी नगर परिषदेच्या वतीने गाडे तयार करून ते गाडे मांस विक्री करणाऱ्या दुकानदारांना भाडेतत्त्वावर दिलेले आहे. मांस विक्री होत असल्याने त्या ठिकाणी पाण्याची व्यवस्था करण्याकरिता पाण्याच्या तीन टाक्या बसविण्यात आल्या होत्या परंतु त्या टाक्या फुटल्यामुळे टाक्यात पाणी नसल्याने पाण्याची मोठी समस्या निर्माण झाली असून दुकानदारांना पाण्यासाठी इतरत्र भटकावे लागत आहे. पाणी नसल्यामुळे या परिसरात साफसफाई होत नसून मोठ्या प्रमाणात दुर्गंधी पसरलेली आहे. परिसर निर्जतूक करण्याकरिता फवारांनी करणे किंवा निर्जतुकीकरण करणारा पावडर टाकणे आवश्यक आहे. या परिसरात साफसफाई होत नसल्याने इतरत्र मटन व चिकनचे सुटे भाग राहत असल्यामुळे दुर्गंधी पसरलेली आहे. मास खरेदी करण्याकरिता येत असलेल्या नागरिकांना या दुर्गंधीचा सामना करावा लागत आहे. या दुर्गंधीचा नागरिकांच्या आरोग्याला धोका निर्माण होत असून दुर्गंधी होत असलेल्या ठिकाणी चिकन मटन खरेदी होत असल्यामुळे या मास विक्रीवर या दुर्गंधीचा परिणाम होऊन नागरिकांना आरोग्याच्या समस्येला समोर जाण्याची वेळ येत आहे. यामुळे वेळीच नगर परिषदेने लक्ष देऊन या ठिकाणी असलेली दुर्गंधी साफ करून पाण्याची समस्या निकाली काढण्याची मागणी दुकानदार व नागरिकांनी केलेली आहे.

मांस विक्री करताना पाण्याची नितांत आवश्यकता असते. पाण्याच्या टाक्या फुटून असल्यामुळे मार्केटमध्ये पाणी नाही. एक नळ आहे त्याला पुरेसे पाणी नाही, मोठ्या प्रमाणात दुर्गंधी पसारात आहे नगर परिषदने साफसफाई करावी

**बिलाल अली, चिकन दुकानदार राजुरा**

मटण मार्केटमध्ये साफसफाई नसल्यामुळे दुर्गंधी येत असल्याने आरोग्याचा प्रश्न निर्माण होत आहे. दुकानाच्या बाजूला घाण असल्यामुळे मासावर याचा परिणाम होऊन आरोग्याला बाधा होऊ शकते.

**आकाश अगळे, ग्राहक**

# विद्या विहार कॉन्व्हेंट तुकूम मध्ये डोक्यावर काच पडल्याने तीन वर्षाची मुलगी गंभीर जखमी

**महासागर प्रतिनिधी**

**चंद्रपूर, दि. २४जुलै :** चंद्रपूर शहरातील विद्या विहार कॉन्व्हेंट या प्रतिष्ठीत शाळेत आज दि. २४ जुलै रोजी सकाळच्या सुमारास शाळेच्या आवारात नसरींचे मुल खेळत असताना अचानक शाळेच्या वरच्या मजल्यावरील लायब्ररीतील काच खाली खेळत असलेल्या तीन वर्षीय मुलीच्या डोक्यावर पडला. यामुळे मुलीला गंभीर दुखापत झाली असून तीच्यावर डॉ. मेहरा हॉस्पीटल मध्ये उपचार सुरु आहे. शाळा व्यवस्थापनाच्या दुर्लक्षपणामुळे हि घटना घडली असून याची दखल अद्याप रामनगर पोलिसांनी तसेच शिक्षण विभागाने घेतली नाही. शाळा संचालकावर कठोर कारवाईची मागणी संतप्त पालकांनी केली आहे.


## जाहीर नोटीस

**(JL.CJJD) मा.सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर नादगांव खंडेश्वर यांचे न्यायालयामधील किरकोळ (RMJC) अर्ज क्र. :- १८१/२०२५**

विजय // वि//निरंक

नेमलेली तारीख :- १३-०८-२०२५

१. विजय बाबूराव खंडार, रा शिरपूर पो. मोखड ता. नांदगाव खंडेश्वर जि. अमरावती
२. गोपाल बाबूराव खडार, रा शिरपुर पो. मोखड ता. नांदगाव खंडेश्वर जि. अमरावती
३. दत्तात्रेय बाबूराव खडार, रा हाटेकर लेआऊट लक्ष्मी नगर मोठी उमरी ता. जि. अकोला

---- वि ----

निरंक

ज्याअर्थी, के. केलु कुट्टी याचा मृत्यु दि.०२.०३.१९९७ रोजी व्यंकटश हॉस्पीटल, चंद्रपुर ता.जि. चंद्रपुर येथे झाला. मयत के.केलु. कुट्टी यांच्या ताब्यात खालील नमुद केलेले शेत होते :-

**Description of Field**

Within the local limits of Zilha Parishad, Amravati and within the jurisdiction of Sub-Registrar, Nandgaon Kh., Mouje - Shirpur, Tq. Nandgaon Kh., Dist. Amravati Field Survey No. 90/3/D, Class-2, admeasuring 2 H 03 R & Potkharab 0.05 R. Total admeasuing 2 H 08 R the four Corner of which are as under -
Towards East - Field of Chandrabhagabai Deverankar
Towards West - Field of Chunnilal Tandiye @ Tayade
Towards North - Field of Sukhdeo Bagade
Towards South - Road & thereafter field of others

श्री.के.केलु. कुट्टी यांनी दि.२२.०६.१९९३ रोजी केलेल्या मृत्युपत्रानुसार सदर शेत श्री. बाबुराव दौलतराव खंडार यांना, दिले होते. मृत्युपत्रामध्ये वारस केलेले बाबुराव दौलतराव खंडार हे सुध्दा दि.१३.१०.२०१५ रोजी शिरपुर ता.नांदगांव खंडेश्वर जि. अमरावती येथे मयत झाले आहेत. बाबूराव दौलतराव खंडार यांच्या पत्नी वच्छला बापुरावजी खंडार या सुध्दा दि ०५.१०.२०११ रोजी शिरपुर ता, नांदगांव खंडेश्वर जि. अमरावती येथे मयत झालेल्या आहेत.

अर्जदार क्र.०१ ते ०३ हे बाबुराव दौलतराव खंडार यांची मुले आहेत, त्यांनी 'भारतीय उत्तराधिकार कायद्याच्या कलम २७६ अंतर्गत (Application under section 276 of indian succession act for grant of probate) प्रोबेट प्रमाणपत्र मिळण्याकरीता अर्ज सादर केला आहे.

त्याअर्थी कोणास वरील प्रोबेट प्रमाणपत्र विरुध्द काही आक्षेप किंवा हरकती घ्यावयाच्या असेल तर त्यांनी नेमलेल्या तारखेस सकाळी १०.३० वाजता मा. दिवाणी न्यायालय, नादगांव खंडेश्वर येथे न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर वकीलांमार्फत हजार राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावणी होपुन निकाल दिला जाईल.

आज दिनांक : १० जुलै २०२५ रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

आदेशानुसार
सहाय्यक अधिक्षक
मा. दिवाणी न्यायालय, नादगांव खंडेश्वर

# धनखड यांचा राजीनामा का?

१० जुलै २०२५ रोजी उपराष्ट्रपती जगदीप धनखड दिल्लीतील जवाहरलाल नेहरू विद्यापीठात भाषण देत होते. ते म्हणाले- 'I will retire at the right time, August 2027, subject to divine intervention. अर्थात, मी योग्य वेळी निवृत्त होईन. आणि तो काळ म्हणजे ऑगस्ट २०२७, जर काही दैवी शक्ती आली तर ती वेगळी बाब आहे. ते कोणत्या दैवी शक्तीबद्दल बोलत होते हे फक्त जगदीप धनखड यांनाच माहिती आहे, पण त्यांनी २१ जुलै रोजी राजीनामा दिला. त्यांनी प्रकृती अस्वास्थ्याचे कारण सांगितले. त्यानंतर लगेचच नवीन उपराष्ट्रपतींच्या नावाबद्दल चर्चांना पेव फुटले.

--------------

धनखड यांनी खरोखरच प्रकृती अस्वास्थ्यामुळे राजीनामा दिला का, स्क्रिप्ट आधीच तयार होती का, सरकारसोबत त्यांची कटुता वाढत आहे का, त्यांच्या जागी पुढचा उपराष्ट्रपती कोण असू शकतो आणि का?

धनखड यांना बाजूला करण्यात आल्याचे संकेत देणाऱ्या ३ घटना आहेत. यामध्ये कृषिमंत्री शिवराज सिंह चौहान यांच्यावरील त्यांची टिप्पणी, भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष जेपी नड्डा यांच्याशी असलेला तणाव व न्यायमूर्ती वर्मा यांच्या महाभियोगावर वेगळी भूमिका घेणे.

**उपराष्ट्रपतिपदाचे दावेदार**

राजनाथ सिंह हे भाजपच्या सर्वात ज्येष्ठ नेत्यांपैकी एक आहेत. ते भाजपच्या मुख्य कार्यकर्त्यांपैकी आहेत आणि आरएसएसदेखील त्यांच्यावर विश्वास ठेवते. राजनाथ सिंह यांची प्रतिमा सर्व पक्षांमध्ये स्वीकारार्ह नेत्याची आहे. जर त्यांना उपराष्ट्रपती बनवले गेले तर ते सर्व पक्षांशी आणि नेत्यांशी चांगला समन्वय साधू शकतील.

राजकीय विश्लेषक रशीद किडवाई म्हणतात, 'राजनाथ सिंह हे या पदासाठी सर्वात योग्य आहेत. त्यांची राजकारणात दीर्घ कारकीर्द आहे. ते विचारसरणीला समर्पित आहेत. भाजपमध्ये असे मानले जाते की राजनाथ सिंह यांना त्यांच्या क्षमतेनुसार अद्याप पद मिळालेले नाही.'

'ही निवडणूक केवळ उपराष्ट्रपती पदासाठी नसेल. त्यांना ५ वर्षांसाठी उपराष्ट्रपती बनवले जाऊ शकते आणि नंतर त्यांना राष्ट्रपती निवडणुकीतही उमेदवार बनवले जाऊ शकते. यामुळे ते १० वर्षे संवैधानिक पदावर राहतील याची खात्री होईल.'

शिवराज सिंह चौहान हे मध्य प्रदेशचे सर्वात जास्त काळ मुख्यमंत्री राहिले आहेत. आमदार आणि लोकसभा खासदार असण्यासोबतच ते भाजपचे राष्ट्रीय उपाध्यक्ष देखील राहिले आहेत. सध्या ते केंद्रात मंत्री आहेत. त्यांना राज्यापासून केंद्रापर्यंत प्रत्येक स्तरावर अनुभव आहे. शिवराज हे संघाचे समर्पित कार्यकर्ते आहेत. त्यांना संघाचाही पाठिंबा आहे. शिवराज यांची संतुलित प्रतिमा राज्यसभेचे अध्यक्ष म्हणून त्यांचे काम सोपे करेल.

रविशंकर प्रसाद हे भाजपचे जुने नेते आहेत. ते बिहारचे आहेत. ते १९ वर्षांपासून खासदार आहेत. ते केंद्रात राज्य आणि कॅबिनेट मंत्री आहेत. त्यांना केंद्रीय राजकारणात भरपूर अनुभव आहे. वकील असल्याने कायदेशीर आणि गुंतागुंतीच्या बाबींवर त्यांची चांगली पकड आहे. केंद्रात विरोधी राजकारणात दीर्घकाळ राहिल्यामुळे त्यांचे इतर पक्षांशी चांगले संबंध आहेत.

नितीश कुमार हे २० वर्षांपासून बिहारचे मुख्यमंत्री आहेत. जर सरकार स्थापन झाले तर भाजप बिहारमध्ये स्वतःचा मुख्यमंत्री बनवू इच्छिते. म्हणून, नितीश कुमार हे हे पद स्वीकारण्यास सहमत असतील तर त्यांना उपराष्ट्रपती बनवता येईल. मुख्यमंत्री होण्यापूर्वी त्यांनी अटलबिहारी वाजपेयी सरकारमध्ये रेल्वे, रस्ते वाहतूक आणि कृषी अशी मंत्रालये सांभाळली आहेत.

हरिवंश नारायण सिंह हे सध्या राज्यसभेचे उपसभापती आहेत. उपराष्ट्रपतिपदी त्यांची नियुक्ती ही त्यांची बढती म्हणून पाहिली जाईल. उपराष्ट्रपतीपदासाठी हरिवंश यांचे नाव प्रबळ दावेदार म्हणून पुढे येत आहे.

पत्रकारितेशी त्यांचा दीर्घकाळचा संबंध, राज्यसभा आणि उपसभापतिपदाचा अनुभव, जनता दल (युनायटेड) आणि एनडीएमधील मजबूत स्थान यामुळे त्यांचा दावा बळकट होतो. हरिवंश यांना उपराष्ट्रपती बनवून भाजप हा संदेश देऊ शकते की मित्रपक्षांच्या नेत्यांना आघाडीत मोठी पदे दिली जात आहेत.

आरिफ मोहम्मद खान आणि शशी थरूर हेदेखील संभाव्य दावेदार आहेत

'हरिवंश आणि रविशंकर प्रसाद यांच्याव्यतिरिक्त, आरिफ मोहम्मद खान हेदेखील बिहारमधून उमेदवार असू शकतात. बिहारमध्ये निवडणुका आहेत. उपराष्ट्रपती निवडताना हेदेखील विचारात घेतले जाईल. आरिफ मोहम्मद खान मुस्लिमांच्या वाईट गोष्टींवर उघडपणे बोलत आहेत.'

'भाजप एखाद्या मुस्लिम व्यक्तीला उपराष्ट्रपती बनवू शकते अशी चर्चा आहे. सध्या भाजप सरकारमध्ये एकाही मुस्लिम व्यक्तीला मोठ्या पदावर बसवलेले नाही. जर एखाद्या मुस्लिम व्यक्तीला उमेदवार बनवले तर विरोधी पक्षही त्याला विरोध करू शकणार नाही. अशा परिस्थितीत, हा सरकारचा राजकीयदृष्ट्या विजय असेल.'

तथापि, सर्वात मोठा प्रश्न हा आहे की, धनखड यांनी अचानक राजीनामा का दिला? विरोधी पक्षातील एका खासदाराने आपले नाव न सांगता म्हटले आहे की, '२१ जुलै रोजी संध्याकाळी ६ वाजता जगदीप धनखड राज्यसभेत होते. त्यांचे वर्तन इतर कोणत्याही दिवशीसारखेच होते. त्यांच्या एका जवळच्या मित्राने असेही सांगितले की पुढील आठवड्याचे त्यांचे वेळापत्रकदेखील तयार होते. रात्री ९ वाजताच्या सुमारास जगदीप धनखड यांनी अचानक राजीनामा दिला. या तीन तासांत काय बदल झाले हे कोणालाही माहिती नाही.

सूत्रांचे म्हणणे आहे की, 'माजी उपराष्ट्रपती जगदीप सिंह धनखड यांच्या घरी २० जुलै रोजी एक पार्टी आयोजित करण्यात आली होती. या दिवशी जगदीप धनखड यांच्या पत्नी सुदेश धनखड यांचा वाढदिवस होता. या पार्टीला सर्व पक्षांचे नेते, राज्यसभा कर्मचारी आणि राज्यसभा टीव्ही कर्मचाऱ्यांना आमंत्रित करण्यात आले होते. धनखड यांच्या राजीनाम्याच्या एक दिवस आधी ही पार्टी आयोजित करण्यात आली होती.'

असे मानले जाते की त्यांनी स्वतःला निरोप दिला. सूत्रांनी असेही म्हटले आहे की त्यांचा निरोप निश्चित होता, परंतु तो इतक्या लवकर होईल अशी अपेक्षा नव्हती.

**धनखड यांच्यापासून अंतर दिसण्याच्या ३ घटना**

१. खुल्या व्यासपीठावरून शिवराज सिंह यांना प्रश्न

सूत्रानुसार, धनखड यांनी मुंबईतील सेंट्रल कॉटन टेक्नॉलॉजी रिसर्च संस्थेत पहिल्यांदाच सार्वजनिकरीत्या मर्यादा



ओलांडली. ती तारीख होती ३ डिसेंबर २०२४. या दिवशी संस्थेचा शताब्दी सोहळा होता. धनखड यांनी कृषी मंत्री शिवराज सिंह चौहान यांना शेतकऱ्यांना दिलेल्या आश्वासनांवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले होते.

व्यासपीठावरून शिवराज सिंह चौहान यांच्याकडे बोट दाखवत धनखड म्हणाले, 'कृषिमंत्री, तुमचा प्रत्येक क्षण महत्त्वाचा आहे. मी तुम्हाला आणि संविधानाच्या अंतर्गत दुसऱ्या स्थानावर असलेल्या व्यक्तीला विनंती करतो की, कृपया मला सांगा की शेतकऱ्यांना काय वचन दिले होते आणि जे वचन दिले होते ते का पूर्ण केले गेले नाही.'

शिवराज सिंह चौहान गप्प राहिले, परंतु पक्ष नेतृत्व आणि आरएसएस धनखड यांच्या वृत्तीवर नाराज होते. त्यांनी धनखड यांना इशारा दिला की जर असे पुन्हा घडले तर ते अनुशासनहीनता मानली जाईल. तथापि, शिवराज सिंह चौहान यांनी या मुद्द्यावर कधीही धनखड यांच्याशी थेट बोलले नाही.

२. न्या. यशवंत वर्मा यांच्यावरील महाभियोगाबाबत वेगळी भूमिका

न्यायमूर्ती यशवंत वर्मा यांच्या घरात मोठ्या प्रमाणात जळालेल्या नोटांचे गठ्ठे सापडले. वर्मा यांच्याविरुद्ध महाभियोग आणला जाणार होता. लोकसभेच्या १५० खासदारांनी त्यावर स्वाक्षऱ्या केल्या आहेत. कायदा मंत्री किरेन रिजिजू यांनीही लोकसभा सदस्यांना स्वाक्षरीचा प्रस्ताव सोपवण्याची माहिती दिली होती.

असे असूनही धनखड यांनी राज्यसभेत न्यायमूर्ती वर्मा यांच्या विरोधात ६३ खासदारांच्या स्वाक्षऱ्या गोळा केल्या. हे सर्व खासदार विरोधी पक्षाचे होते. प्रश्न असा निर्माण झाला की जर लोकसभेत महाभियोग प्रस्तावावर सत्ताधारी पक्षाच्या १५० खासदारांनी स्वाक्षऱ्या केल्या असतील, तर राज्यसभेतील ६३ खासदारांच्या स्वाक्षऱ्यांचा अर्थ काय?

धनखड यांना माहिती होते की लोकसभेत महाभियोग आणण्यासाठी आवश्यक असलेली मते मिळाली आहेत. प्रत्यक्षात त्यांना स्वतःच्या सभागृहात महाभियोग आणायचा होता. धनखड यांच्या या वृत्तीवर कायदामंत्र्यांनी नाराजी व्यक्त केल्याचे सूत्रांकडून समजते.

३. धनखड आणि जेपी नड्डा यांच्यात सभागृहात तणाव

पावसाळी अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी, म्हणजे २१ जुलै रोजी, विरोधकांना लोकसभा आणि राज्यसभेत ऑपरेशन सिंदूरवर चर्चा करायची होती. राहुल गांधी लोकसभेत बोलू लागले तेव्हा लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांनी त्यांना सांगितले की या मुद्द्यावर कधी आणि किती तास चर्चा करायची हे व्यवसाय सल्लागार समितीमध्ये ठरवले जाईल. तुम्हीही त्या समितीचा भाग आहात, मुद्दा तिथे मांडू शकता.

हे बोलल्यानंतर लोकसभा अध्यक्षांनी राहुल गांधींना बसण्यास सांगितले. दरम्यान, काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांना राज्यसभेत बोलण्याची परवानगी देण्यात आली. सभागृहातील चर्चेच्या नियमांबद्दल बोलण्यासाठी ही परवानगी देण्यात आली.

जेव्हा खरगे बोलण्यासाठी उभे राहिले तेव्हा त्यांनी फक्त नियमांबद्दल बोलण्याऐवजी भाषण देण्यास सुरुवात केली. जेपी नड्डा यांनी आक्षेप घेतला. ते धनखड यांना म्हणाले, अध्यक्ष महोदय, तुम्ही त्यांना नियमांबद्दल बोलण्यास सांगितले होते, पण ते भाषण देत आहेत.

लोकसभा अध्यक्षांनी राहुल गांधींना ज्या प्रकारे बोलण्यापासून रोखले होते त्याप्रमाणे धनखड यांनी मल्लिकार्जुन खरगे यांना रोखले नाही. यावरून हे स्पष्ट झाले की सरकार आणि धनखड यांच्यात सर्व काही ठीक नाही. जेपी नड्डा यांनी तर असेही म्हटले की फक्त माझेच म्हणणे रेकॉर्डवर राहील.

सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, खरगे यांना बोलू द्यायचे की थांबवू नये याबद्दल जेपी नड्डा आणि धनखड यांच्यात वाद झाला. सूत्रांचे म्हणणे आहे की, सभागृहाचे कामकाज संपल्यानंतर गृहमंत्र्यांना धनखड यांच्या या वृत्तीची माहिती देण्यात आली.

याशिवाय, ऑपरेशन सिंदूरवरील बैठक कधी सुरू होईल हे पीएसीच्या बैठकीत ठरवता आले नाही. यानंतर, दुसरी बैठक बोलावण्यात आली, परंतु जेपी नड्डा आणि मंत्री किरेन रिजिजू या बैठकीला उपस्थित राहिले नाहीत. सूत्रांचे म्हणणे आहे की धनखड यांना याची माहिती नव्हती. तथापि, नड्डा यांनी स्पष्ट केले की धनखड यांना त्यांच्या अनुपस्थितीबद्दल माहिती देण्यात आली होती. नड्डा आणि रिजिजू यांच्या अनुपस्थितीमुळे बैठक रद्द करण्यात आली.

उपराष्ट्रपती धनखड यांच्या वृत्तीमुळे सरकार नाराज असल्याचे स्पष्ट झाले. सूत्रांचे म्हणणे आहे की, यानंतर गृहमंत्र्यांनी धनखड यांना कडक संदेश दिला. भाजप खासदारांची स्वाक्षरी मोहीम सुरू झाली. असे वाटत होते की भाजप स्वतः उपराष्ट्रपतींना हटवण्यासाठी महाभियोग प्रस्ताव आणेल. प्रकरण या टप्प्यावर पोहोचण्यापूर्वीच, धनखड यांनी रात्री ९ वाजता राजीनामा दिला.

■ ■ ■

## राजनाथ सिंह

वय: 74 वर्षे

केंद्रीय संरक्षण मंत्री

यूपीच्या लखनौ मतदारसंघातून खासदार

शिक्षण: एमएससी फिजिक्स, (गोरखपूर विद्यापीठ)

**राजकीय कारकीर्द**

- १९६४ मध्ये, ते वयाच्या अवघ्या १३ व्या वर्षी राष्ट्रीय स्वयंसेवक संघात सामील झाले.
- 1972 मध्ये अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेत सामील झाले
- १९७४ मध्ये जनसंघात सामील होऊन राजकारणाला सुरुवात केली, आणीबाणीच्या काळात अटक झाली
- १९७७ मध्ये, ते फक्त २५ वर्षांचे असताना मिर्झापूर, उत्तर प्रदेश येथून पहिल्यांदा आमदार झाले.
- भाजपच्या सर्वात ज्येष्ठ नेत्यांपैकी एक, २००५ ते २००९ आणि २०१३ ते २०१४ पर्यंत दोनदा पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष होते.
- २००० ते २००२ पर्यंत उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री, २०१४ ते २०१९ पर्यंत केंद्रात गृहमंत्री, २०१९ पासून संरक्षण मंत्री



# महायुतीतील वादग्रस्त मंत्र्यांनी भाजपची प्रतिमा उद्ध्वस्त केली

राज्यातील महायुती सरकार स्थापन झाल्यावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्थिर, पारदर्शक आणि निर्णयक्षम प्रशासनाचा दावा केला होता. परंतु गेल्या काही महिन्यांतील घटनाक्रम पाहता हे सरकार मंत्र्यांच्या वादग्रस्त वर्तनामुळे बदनामीचे प्रतीक बनत चालले आहे. भाजपची सत्ता वाचवण्यासाठी शिंदे आणि अजित पवार गटांना बरोबर घेतले, पण आता हेच मित्रपक्ष भाजपसाठी डोकेदुखी ठरत आहेत.

धनंजय मुंडे प्रकरण हा महायुती सरकारच्या सत्ताधारी एकत्रिकरणातील पहिला मोठा धक्का ठरला. संतोष देशमुख हत्या प्रकरणात मुंडे यांच्यावर थेट आरोप झाले आणि अखेर राजीनामा घ्यावा लागला. अजित पवार गटाला धक्का बसला, पण याचे राजकीय नुकसान भाजपलाही झाले. जनता विचारतेय ऋ अशा व्यक्तींना मंत्रिपद का दिले?

यानंतर कृषीमंत्री माणिकराव कोकाटे यांच्या रमी प्रकरणाने सरकारची प्रतिमा पुन्हा डागाळली. विधिमंडळात बसून पत्ते खेळणारा मंत्री म्हणजे लोकशाहीची थट्टा असल्याचे चित्र निर्माण झाले. विरोधकांनी हे प्रकरण हाताळताना भाजपवर हल्ला चढवला, कारण कोकाटे हे अजित पवार गटाचे असले तरी सरकारची जबाबदारी भाजपवर आहेच.

ताजं प्रकरण शंकर मांडेकर यांच्या भावाच्या गोळीबाराचे. दौंडमधील कार्यक्रमात एका तरुणीवर गोळी झाडल्याची घटना ही सत्ता आणि दहशत यांचा संगम असल्याचे दाखवते. अशा घटनांमुळे भाजपची सुशासनाची प्रतिमा उध्वस्त होतेय.

शिवसेना शिंदे गटातील संजय शिरसाठ, योगेश कदम, भारत गोगावले, संजय गायकवाड, या साऱ्यांची प्रकरणे म्हणजे सरकारला वारंवार लज्जास्पद स्थितीत आणणारे ठरले. शिरसाठ यांचा पैशांच्या बॅगेसह व्हिडिओ, योगेश कदम यांच्या आईच्या नावाने असलेला बार आणि तेथून पकडलेल्या २२ मुली, गोगावले यांची अघोरी पूजा तर गायकवाड यांची मारहाण, या सर्व गोष्टींनी भाजपला आमच्या मित्रांना रोखा अशी भूमिका घ्यावी लागलीय.

खरं म्हणजे या साऱ्या वादग्रस्त मंत्र्यांवर शिंदे आणि अजित पवार यांचा वचक नसल्याचेच सिद्ध होते. दोन्ही उपमुख्यमंत्री आपापल्या आमदारांना हाताळण्यात अपयशी ठरत असल्याने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचीच डोकेदुखी वाढतेय. कारण जनतेच्या दृष्टीने ह्यसरकार म्हणजे मुख्यमंत्रीह्व असते, मग मंत्र्यांचा पक्ष कोणताही असो.



दिपक कैतके

या सरकारच्या स्थापनेच्या वेळी सामाजिक समिकरण, सत्ता संतुलन, राजकीय स्थैर्य या शब्दांचे गजर होते. पण आता या मंत्र्यांनी केलेल्या वादग्रस्त कृतीमुळे महायुती सरकार म्हणजे वाद, गुन्हेगारी, अनैतिकता आणि गोंधळ असेच चित्र उभे राहत आहे.

भाजपच्या सुशासनच्या ब्रँडवर हे मोठे डाग आहेत. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका काही महिन्यांवर येऊन ठेपल्या असताना मित्रपक्षातील मंत्र्यांच्या वादग्रस्त प्रकरणांची मालिका थांबण्याचे नाव घेत नाही. यामुळे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या परफेक्ट प्लानिंगवरही प्रश्नचिन्ह निर्माण होत आहे.

आज भाजपने आत्मपरीक्षण करणे गरजेचे आहे. कारण या साऱ्या घटनांमुळे विरोधकांना खूप मोठे आयुध मिळाले आहे. शिंदेऋअजित पवार यांना सत्तेत ठेवण्याची किंमत भाजपला फारच महागात पडू शकते. राजकीय फायदेशीर गुंतवणूक ठरावी म्हणून केलेली महायुती, आता महाविनाश ठरणार का, हा खरा प्रश्न आहे.

# खुमासदार लेखणी थंडावली

**श्याम बसप्पा ठाणेदार**
**दौंड. जिल्हा पुणे.**
**९९२२५४६२९५**

महाराष्ट्रातील प्रसिद्ध पत्रकार, लेखक, स्तंभ लेखक शिरीष कणेकर यांचा आज स्मृतिदिन. २५ जुलै २०२३ रोजी वयाच्या ८० व्या वर्षी त्यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. मृत्यूच्या आदल्या दिवशी त्यांनी लिहिलेले लेख वर्तमानपत्रात छापून आले होते. त्यांची जवळपास सर्वच पुस्तके मी वाचून काढली आहेत. वर्तमानपत्रातील त्यांचे लेख वाचूनच मी स्तंभलेखनाकडे वळलो. आज जे चाळीशी - पन्नाशीत आहे त्या सर्वांचा आवडीचा विषय ते लेखणीतून खुमासदारपणे हाताळत आणि तो विषय म्हणजे चित्रपट आणि क्रिकेट.

वर्तमान पत्रात त्यांचे चित्रपट आणि क्रिकेटवर लेख छापून आले की ते झटक्यात वाचून संपवणे आणि त्यावर तासनतास चर्चा करणे हा आमच्या मित्र मंडळींचा आवडता छंद. त्यांच्यामुळेच आम्हाला जुन्या काळातील कुंदनलाल सैगल, दिलीप कुमार, राज कुमार, अशोक कुमार, राज कपूर, शम्मी कपूर, देवानंद या अभिनेत्यांची ओळख झाली. तसेच पन्नास ते ऐंशी च्या दशकातील क्रिकेटपटूंची ओळख झाली.

केवळ अभिनेते, अभिनेत्री आणि क्रिकेटरच नव्हे तर हिंदी सिनेसंगीत हा देखील त्यांच्या लेखनाचा आवडीचा विषय होता. अतिशय अभ्यासपूर्ण, खुसखुशीत आणि विनोदीशैली हे त्यांच्या लेखणीचे वैशिष्ट्य. अतिशय खुसखुशीत विनोदी शैलीत ते लिहित असल्याने तरुण वर्ग त्यांचा मोठा वाचक बनला. तरुण मुलांचे ते आवडते लेखक होते.

तरुण मुले कट्ट्यावर बसून ज्या प्रमाणे गप्पा मारत अगदी तसेच त्यांचे लेखन होते त्यामुळेच त्यांचा सर्वाधिक वाचकवर्ग हा तरुण होता. वर्तमानपत्रात लेख लिहून स्तंभलेखक म्हणून नावारूपास आलेल्या शिरीष कणेकर यांनी पुढे अनेक पुस्तके लिहिली.

यादो की बारात, शिरीषासन, सिनेमाबाजी, मुद्दे आणि गुद्दे, चहाटळकी, सुरपारंब्या, सिनेमगिरी, लागाव बत्ती, कणेकरी, चिमटे आणि गालगुच्चे, आसपास, मेतकूट, चित्ररूप, कल्चर - वल्हचर असे त्यांचे विविध वर्तमानपत्रातील स्तंभ लेखन गाजले.

गाये चला जा, यादो की बारात, एक्केचाळीस, गोळी मार भेजे में, गोतावळा, कुरापत, मखलाशी, फटकेबाजी, पुन्हा यादों की बारात, टिवल्या - बावल्या, चंची, चापट पोळी, डॉलरच्या देशा, एकला, रहस्यवल्ली, सुरपारंब्या, क्रिकेटवेध, नट - बोलट, बोलपट, सिनेमा डॉट कॉम ही त्यांची पुस्तके खूप लोकप्रिय झाली.

शिरीष कणेकर यांनी लेखनासोबत क्रिकेट व चित्रपटावर स्टॅण्ड अप शो देखील केले. माझी फिल्लमबाजी, फटकेबाजी, ....आणि पुन्हा कणेकर हे त्यांचे स्टँड अप शो खूप लोकप्रिय झाले. त्यांना अनेक पुरस्कार देखील मिळाले पण वाचकांच्या मनात त्यांचे जे स्थान होते ते कोणत्याही पुरस्कारापेक्षा श्रेष्ठ होते. कणेकर गेले आणि खुमासदार लेखणी थंडावली असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही.

आपल्या खुमासदार लेखनाने तरुण वाचकांच्या मनात आगळे स्थान निर्माण करणारा हा अवलिया लेखक आज आपल्यात नाही हे मन मानायला तयार नाही. शिरीष कणेकरांची फिल्लमबाजी, फटकेबाजी पुन्हा अनुभवता येणार नाही याची खंत वाटते. असो नियतीने जे मांडून ठेवले आहे ते स्वीकारावेच लागेल. शिरीष कणेकर यांना स्मृतिदिनी विनम्र अभिवादन!

■ ■ ■

## मुंबई साखळी बॉम्बस्फोट : अजूनही न्याय अधुराच!

**वाचक लिहितात**

११ जुलै २००६ रोजी मुंबईत झालेल्या साखळी बॉम्बस्फोट प्रकरणात विशेष न्यायालयात दोषी ठरवण्यात आलेल्या १२ आरोपींची मुंबई उच्च न्यायालयाने निर्दोष सुटका केली. ही बाब केवळ बॉम्बस्फोटात मृत्युमुखी पडलेल्या व्यक्तींच्या कुटुंबीयांवर झालेला मोठा आघात नाही, तर प्रत्येक भारतीयाच्या मनावर झालेला आघात आहे.

या प्रकरणात जलद गती न्यायालयामार्फत काही महिन्यांत दोषींना फाशीची शिक्षा होणे, अशी अपेक्षा सामान्य जनतेला होती. मात्र या घटनेला १९ वर्षे लोटूनही या प्रकरणातील खरे दोषी कोण? हा प्रश्न आजही अनुत्तरीत आहे, ही अत्यंत लज्जास्पद बाब आहे.

बॉम्बस्फोटानंतर मुंबई पोलिसांनी तपास करून १२ जणांविरोधात आरोपपत्र दाखल केले होते. सत्र न्यायालयाने पोलिसांनी सादर केलेल्या पुराव्यांच्या आधारे पाच आरोपींना फाशी आणि उर्वरित सात जणांना जन्मठेपेची शिक्षा सुनावली. मात्र ज्या पुराव्याच्या आधारावर सत्र न्यायालयाने ही शिक्षा सुनावली होती तो पुरावाच उच्च न्यायालयाने स्वीकारला नाही आणि आरोपी निर्दोष सुटले. आरोपींच्या विरोधात सरकारी पक्ष एकही आरोप सिद्ध करू शकला नाही यावरून अनेक प्रश्न उपस्थित होतात. सरकारी पक्ष एकही आरोप सिद्ध करू शकला नाही, हे पाहता अनेक प्रश्न उपस्थित होतात.

सादर केलेल्या इलेक्ट्रॉनिक पुराव्यांमध्ये छेडछाड झाली का? काही पुरावे गायब झाले का? साक्षीदारांवर, पोलिसांवर कोणाचा दबाव होता का? आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे, जर हे आरोपी निर्दोष असतील, तर बॉम्बस्फोट कोणी केला?

आता या निर्णयाविरोधात राज्य सरकार सर्वोच्च न्यायालयात दाद मागणार आहे. मात्र त्याचा निकाल कधी लागणार? आणि त्या निकालाद्वारे पीडित कुटुंबीयांना न्याय कधी मिळणार, हा प्रश्न आजही अनुत्तरीतच राहिला आहे. तसेच असा मोठा दहशतवादी हल्ला आणि त्यानंतरही खरे आरोपी कोण हे स्पष्ट न होणे, यामुळे व्यवस्थेवरही शंका निर्माण होते.

■ **सौ. प्रिया बागडदेव**
**छिंदवाडा.**

## तुम्हीही खाता का? गरजेपेक्षा जास्त बदाम



निरोगी राहण्यासाठी व मेंदूचे आरोग्य चांगले राहण्यासाठी अनेकजण बदामाचे सेवन करत असतात. यासोबतच पोषक तत्वांनी समृद्ध असलेले बदाम शरीराला तंदुरुस्त ठेवण्यास आणि अनेक आजारांना दूर ठेवण्यास देखील मदत करतात.

हृदय निरोगी ठेवण्यासाठी बदाम हा एक उत्तम पर्याय मानला जातो. कारण बदामात प्रथिने, फायबर, व्हिटॅमिन ई, मॅग्नेशियम आणि निरोगी फॅटसारखे अनेक पोषक घटक आढळतात.

हे सर्व पोषक तत्व शरीराला ऊर्जा देण्याचे काम करतात. सहसा दररोज सकाळी रिकाम्या पोटी चार ते पाच भिजवलेले बदाम खाण्याचा सल्ला दिला जातो. काही लोक ते न भिजवता खातात. दररोज चार ते पाच बदाम खाल्ल्याने तुमच्या आरोग्याला अनेक फायदे होतात. परंतु आवश्यकतेपेक्षा जास्त बदाम खाल्ल्याने तुमच्या आरोग्याला अनेक प्रकारच्या समस्या उद्भवू शकतात. गरजेपेक्षा जास्त बदाम खाल्ल्याने तुमच्या आरोग्यावर दुष्परिणाम होऊ शकतात.

**पचन बिघडू शकते** : बदामांमध्ये भरपूर फायबर असते. तर अशावेळेस जास्त बदाम खाल्ल्याने तुमच्या पचनसंस्थेवर वाईट परिणाम होऊ शकतो. यामुळे गॅस, पोटफुगी, अपचन आणि पेटके यासारख्या समस्या उद्भवू शकतात.

**पौष्टिक कमतरता** : जर तुम्ही जास्त बदाम खाल्ले तर तुमच्या शरीरात इतर पोषक तत्वांची कमतरता निर्माण होऊ शकते. कारण बदामात फायबरचे प्रमाण जास्त असते. म्हणून आपल्या शरीरात लोह, कॅल्शियम आणि झिंक शरीरात शोषले जाण्यापासून रोखते.

**ॲलर्जी** : जर तुम्ही जास्त बदाम खाल्ले तर तुमच्या घशात सूज आणि वेदना होऊ शकतात. त्यामुळे तुमच्या तोंडाला तसेच ओठांना आणि जीभेला खाज येऊ शकते. असे म्हटले जाते की जर तुम्हाला कोणतीही ॲलर्जी असेल तर तुम्ही कोणतेही ड्रायफ्रुट्स खाणे टाळावे, बदाम तर खाऊ नये.

**किडनी स्टोनचा धोका** : बदामांमध्ये ऑक्सलेट आढळते. त्यातच तुम्ही जर जास्त बदाम खाल्ले तर ऑक्सलेटची पातळी वाढू शकते. ते किडनीमध्ये जमा होऊन स्टोन तयार होऊ शकते. यामुळे तुम्हाला किडनी स्टोनचा त्रास सुरू होण्याची शक्यता असते.

**वजन वाढू शकते** : बदाम हेल्दी फॅट्सने समृद्ध असतात. त्यामुळे बदाम जास्त प्रमाणात खाल्ल्याने तुमच्या शरीरात कॅलरीजचे प्रमाण वाढू शकते. यामुळे तुमचे वजन वाढते. हे दुष्परिणाम लक्षात घेता मोजकेच बदाम खा.

■ ■ ■

## अशोकायन

**प्रा. अशोक सारडा**
**मेहकर**
**(९४२१३९४३३९)**



### शरीफ बदमाश

राज्यातील नेत्यांना
झालय काय वाफरायला?
दारुड्यालाही लाजवेल असे
शब्दालंकार लागलेत वापरायला

कोणी म्हणतं कलंकीत
कोणी म्हणतय गद्दार
फ्री स्टाईलपाहून कार्यकर्त्यांची
अवाक झाले सारे मतदार

महाराष्ट्राच्या उज्वल परंपरेला
सत्तापिपासुंनी कलंक
लावला राजा
नाही जनाची तर मनाची ठेवा
कुठे नेऊन ठेवताय
महाराष्ट्र माझा?..

## मोरवा विमानतळाचा घेतला आढावा

**चंद्रपूर, दि. २४ जुलै :** महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी लिमिटेड (ईंअ) च्या उपाध्यक्षा तथा व्यवस्थापकीय संचालक स्वाती पांडे यांनी नुकतीच चंद्रपूर येथील मोरवा विमानतळाला भेट दिली. नागपूर फ्लाइंग क्लबने आपला फ्लाइंग सेक्शन प्रशिक्षणासाठी अलीकडेच या ठिकाणी स्थलांतरित केल्याने सदर भेटीचे आयोजन करण्यात आले होते. मोरवा विमानतळ हे ईंअ च्या मालकीचे असून, नागपूर फ्लाइंग क्लबला विमान उड्डाण प्रशिक्षणासाठी सुपूर्त करण्यात आले आहे. सौ. पांडे यांचा दौरा या प्रशिक्षण केंद्रातील उपलब्ध पायाभूत सुविधा, तांत्रिक गरजा व भविष्यातील विकास संधींचा आढावा घेण्यासाठी आयोजित करण्यात आला होता.

## महानगरपालिकेत लोकमान्य टिळक जयंती

**चंद्रपूर, दि. २३ जुलै :** लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या जयंती निमित्त चंद्रपूर महानगरपालिकेच्या वतीने २३ जुलै रोजी सकाळी ११ वाजता अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी मार्गदर्शन करतांना अतिरिक्त आयुक्त चंदन पाटील यांनी सांगितले की, लोकमान्य टिळक केवळ स्वातंत्र्यलढ्याचे आद्य प्रवर्तक किंवा स्वातंत्र सेनानी नव्हते तर त्याही पलीकडे ते गणिततज्ज्ञ, खगोलशास्त्रज्ञ, कवी, लेखक, वक्ते, पत्रकार, शिक्षक, राजकारणातील द्रष्टेपणा असलेले लढवय्ये, भारतीय असंतोषाचे जनक असे अष्टपैलू व्यक्तिमत्व होते. लोकमान्य टिळकांनी दिलेला 'स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध अधिकार आहे,' या घोषणेने देशाच्या स्वातंत्र्य लढ्याचा इतिहास बदलण्यासह ब्रिटिश राजवटीला उलथून टाकण्याचा आत्मविश्वास भारतीयांमध्ये जागवला.

# पोलीस प्रशासनाच्या मदतीने मंदिरात अडकलेल्या नागरिकांची सुटका

**महासागर तालुका प्रतिनिधी**

**राजुरा, दि. २४ जुलै :** तालुक्यात मोठ्याप्रमाणात पाऊस पडला यामुळे उंच टेकडी भागवरून वाहत येणाऱ्या राजुरा शहरलगत वाहणाऱ्या भवानी नाल्याला रात्री दहा वाजता अचानक आलेल्या पाण्यामुळे तीन तास राजुरा गडचांदूर मार्ग बंद झाला होता. यामुळे नाल्यावरील पुलाच्या दोन्ही बाजूने लांबच लांब वाहनांच्या रांगा लागल्या होत्या.

याचवेळी भवानी मंदिर येथे एका कौटुंबिक कार्यक्रमासाठी आलेल्या दहा ते बारा नागरिकांना नाल्याला आलेल्या पाण्यामुळे अडकून रहावे लागले. घटनेची



माहिती राजुरा तहसील प्रशासन आणि पोलीस प्रशासनाला मिळताच तहसीलदार डॉ. ओमप्रकाश गोंड व पोलीस निरीक्षक सुमित परतेकी यांच्या मार्गदर्शनात सहाय्यक पोलीस निरीक्षक पांडुरंग हाके व पोलीस उपनिरीक्षक पराग उल्लेवार यांनी मंदिरात अडकलेल्या काही पत्रकार आणि नागरिकांना जेसीबीच्या सहाय्याने रेस्क्यू करून बाहेर काढण्याचा प्रयत्न केला. मात्र पाण्याचा प्रवाह जोरदार असल्यामुळे जेसीबी पाण्यात चालविणे शक्य नसल्याने पोलिसांनी मंदिराच्या मागच्या बाजूला असलेल्या भिंतीवर चढून प्रत्येकाना रेस्क्यू करीत रात्रो अकरा वाजता बाहेर काढले. आमदार देवराव भोंगळे यावेळी प्रत्यक्ष नागरिकांच्या संपर्कात राहून प्रशासनाकडून मदत बचत कार्याची माहिती घेत होते.

मंदिर परिसरातून पाण्याचा प्रवाह खुप वेगाने होता व मंदिर परिसरात चार ते पाच फूट पाणी असल्याने त्याठिकाणी कोणालाही जाता येत नव्हते. नाल्याचे पाणी राजुरा शहराची आराध्य दैवत असलेल्या भवानी मंदिराच्या पोर्च मध्ये शिरले होते. याच मंदिराच्या पायथ्याशी असलेल्या हनुमान मंदिरात एक प्रमोद गटलेवार मतिमंद युवक अडकून असल्याचे दिसताच प्रसंगवधान साधून पत्रकार सागर भटपल्लीवार यांनी त्यांना सुखरूप भवानी मंदिरात आणले.

पाण्यात अडकलेल्यांमध्ये रामपूर राजुरा येथिल नामदेव गौरकार, प्रा. सुयोग साळवे, बंटी गौरकार, संदिप हिंगाने, रमेश भोयर, रमेश जिवतोडे, पत्रकार सागर भटपल्लीवार, सुरेश साळवे, गणेश बेले, श्रीकृष्ण गोरे आणि इतर चार नागरिक यांना पोलीस प्रशासनाने रेस्क्यू करून सुखरूप बाहेर काढले.

# चुरशीच्या लढतीत देवाडा येथे भाजपचे उपसरपंच

**महासागर तालुका प्रतिनिधी**

**राजुरा, दि. २४ जुलै :** देवाडा येथे उपसरपंच पदासाठी निवडणूक घेण्यात आली यासाठी आमदार देवराव भोंगळे यांचे मार्गदर्शनात भारतीय जनता पार्टीचे उमेदवार रिंगणात उतरवण्यात आले व या निवडणुकीचे नेतृत्व नवनिर्वाचित तालुकाध्यक्ष वामन तुराणकर यांनी केले.

तसेच हा विजय प्राप्त करण्यासाठी देवाळाचे सरपंच शंकरजी मडावी, शिवा बोंकुर, विनोद नामेवार, पंढरीची रासेकर, सिन्नू मंथनवार, सुभाष तेलीवार , मधुकर आत्राम, बालाजी दुर्गे, रामरावजी वडस्कर, योगेश वडस्कर, उच्चयाजी जल्लावार



यांनी परिश्रम घेतले. या निवडणुकीत भारतीय जनता पार्टीला सहा मते व काँग्रेस पक्षाला सहा मते असल्याने ही निवडणूक अतिशय चुरशीची होती यामध्ये दोन्ही पक्षांना समसमान मते पडल्यामुळे निर्णायक मत हे सरपंच करतो या ग्रामपंचायतीमध्ये भारतीय जनता पार्टीचा सरपंच असल्यामुळे एक मत भारतीय जनता पक्षाच्या बाजूने पडले व हा विजय सहा विरुद्ध सात या फरकाने प्राप्त केला यासाठी ज्या भारतीय जनता पार्टीच्या कार्यकर्त्यांनी अहोरात्र परिश्रम घेतले व भारतीय जनता पार्टीचे उमेदवार कुठल्याच प्रकारच्या प्रलोभनला बळी न पडता एकनिष्ठता दाखवली या सर्वांचे अभिनंदन केले जात आहे.

# देवाभाऊ जनकल्याण सेवा सप्ताहाच्या पाच दिवसांत १५०० रक्तदात्यांनी केले रक्तदान

**महासागर प्रतिनिधी**

**चंद्रपूर, दि. २४ जुलै :** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त आमदार किशोर जोरगेवार यांच्या पुढाकारातून चंद्रपूर मतदारसंघात विविध ठिकाणी रक्तदान शिबिरांचे आयोजन करण्यात आले असून, फक्त पाच दिवसांत १५०० हून अधिक रक्तदात्यांनी रक्तदान करत रक्तदान हेच खरे श्रेष्ठदान असा संदेश दिला आहे. हे रक्तदान शिबिरे २९ जुलैपर्यंत सुरू राहणार आहेत.

आमदार किशोर जोरगेवार यांच्या पुढाकारातून २० जुलैपासून चंद्रपूर



मतदारसंघात देवाभाऊ जनकल्याण सेवा सप्ताहा'ला सुरुवात झाली आहे. या सेवा सप्ताहाअंतर्गत विविध सामाजिक, धार्मिक, आरोग्यवर्धक व शैक्षणिक उपयुक्त कार्यक्रम राबविले जात आहेत. यामध्ये रक्तदान शिबिरे, योग प्रात्यक्षिके, वक्तृत्व स्पर्धा, रोजगार मेळावे, शालेय साहित्य वाटप, वृक्षारोपण आणि इतर उपक्रमांचा समावेश आहे.

या उपक्रमांत विशेषत: ५५ रक्तदान शिबिरांचे आयोजन करण्यात आले असून दररोज ८ ते १० रक्तदान शिबिरे पार पडत आहेत. मागील पाच दिवसांत झालेल्या २७ शिबिरांमध्ये १५०० हून अधिक रक्तदात्यांनी रक्तदान केले आहे. या शिबिरांना रक्तदात्यांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून, त्यामुळे रक्ताच्या टंचाईवर काही प्रमाणात मात केली जाणार आहे.

यासोबतच, चंद्रपूर येथील राज्यातील सर्वात प्राचीन शिवलिंगाजवळ रुद्राभिषेक व जलाभिषेक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. शकुंतला लॉन येथे विद्यार्थिनींना २०५५ सायकली वाटप करण्यात येणार आहे. याच ठिकाणी आरोग्य शिबिराचे आयोजनही करण्यात आले आहे.

# नांदी आणि संगीत झाडीपट्टी रंगभूमीचा आत्मा आहे : प्रा.डॉ. मोहरकर

**महासागर तालुका प्रतिनिधी**

**चिमूर, दि. २४ जुलै :** तालुक्यातील कला व वाणिज्य महाविद्यालय भिसी येथे माजी मराठी विभाग प्रमुख प्रा. वसंत सोनवणे यांचे स्मृती प्रित्यर्थ मंगळवार ला 'झाडीपट्टी रंगभूमीची वाटचाल' या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. प्रमुख वक्ता म्हणून सेवानिवृत प्राचार्य डॉ. श्याम मोहरकर साहित्यिक तथा समीक्षक चंद्रपूर, मार्गदर्शन करतांना म्हणाले की, नांदी व संगीत झाडीपट्टी रंगभुमीचा आत्मा आहे.

कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून संस्थेचे सचिव सुनिल जावळेकर तसेच प्रमुख उपस्थिती म्हणून




कार्यकारी प्राचार्य डॉ. विठ्ठल ठावरी, शीतल सोनवणे व्यासपीठावर हजर होते.

झाडीपट्टीत पूर्वी दंडारी प्रसिद्ध होत्या. नंतर दंडार सादर करणारी कलावंत मंडळी नाटके सादर करू लागली. झाडीपट्टीत पौराणिक, ऐतिहासिक आणि संगीत नाटके केली जायची. आता काही मोजकेच हौशी नाटक मंडळे वगळता झाडीपट्टी रंगभूमीला अलीकडे पूर्णतः व्यावसायिक स्वरूप आले आहे.तसेच

झाडीपट्टी नाटकाचे वैशिष्ट्य म्हणजे नाटकाच्या शीर्षकासमोर संगीत शब्द लावल्या शिवाय आणि नांदी म्हटल्याशिवाय नाटकाला सुरुवात होत नाही. नांदी आणि संगीत हा झाडीपट्टी रंगभूमीचा आत्मा आहे. इतर मराठी रंगभूमीवर हा प्रकार सहसा आढळत नाही. असे विचार डॉ. श्याम मोहरकर यांनी व्यक्त केले. याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष सुनिल जावळेकर यांनी एक रंगकर्मी या नात्याने त्यांनी आपले अनुभव सांगितले.

प्रास्ताविक कार्यकारी प्राचार्य डॉ. विठ्ठल ठावरी, पाहुण्यांचा परिचय डॉ. दिनकर चौधरी, संचालन डॉ. सुनंदा चरडे आणि उपस्थित मान्यवरांचे आभार डॉ. नत्थु गिरडे यांनी मानले.

या प्रसंगी सिनेट सदस्य विजयकुमार घरत, डॉ.राजेश सोनकुसरे, तिलक बांगडे, अरविंद लांडगे, भिसी येथील सामाजिक कार्यकर्ते तसेच विद्यार्थी बहुसंख्येने श्रोते म्हणून उपस्थित होते.

# ग्रामपंचायत कार्यालय वढा येथे मोफत आरोग्य तपासणी शिबिर संपन्न

**महासागर प्रतिनिधी**

**घुग्घूस, दि. २४ जुलै :** धारिवाल इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड आणि पहेल मल्टीपर्पज सोसायटी, चंद्रपूर यांच्या संयुक्त विद्यमाने ग्राम पंचायत वढा येथे मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले.

शिबिराचा मुख्य उद्देश ग्रामीण भागातील नागरिकांना त्यांच्या दैनंदिन धकाधकीच्या जीवनातही सुलभ, मोफत व दर्जेदार आरोग्य सेवा उपलब्ध करून देणे हा होता.

हा उपक्रम देवेश कुमार, मुख्य



महाप्रबंधक, धारिवाल यांच्या नेतृत्वाखाली पार पडला.

कार्यक्रमाला उपस्थित मान्यवर मा. डॉ. अनिश नायर, मुख्य व्यवस्थापक, धारिवाल, रूपेश वैरागडे धारिवाल, किशोर वरारकर सरपंच वढा यांची उपस्थिती होती.

या उपक्रमात एकूण ६५ नागरिकांनी आरोग्य तपासणी करून औषधोपचाराचा लाभ घेतला.

संचालन व आभारप्रदर्शन दिनेश कामतवार यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी माधुरी श्रीवास्तव, आशिष हलगे,राखी दुर्वे,धरती जोगी यांनी प्रयत्न केले. या उपक्रमामुळे गावकऱ्यांना प्राथमिक आरोग्य सुविधा मिळाल्यामुळे समाधान व्यक्त करण्यात आले आहे.

# गुणवंत राजनेत्याच्या वाढदिवशी गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान हा दुग्धशर्करा योग : हंसराज अहीर

**महासागर प्रतिनिधी**

**चंद्रपूर, दि. २४ जुलै :** भारतीय संस्कृती उदात्त असून संस्कार, विचार आणि असामान्य कर्तृत्व असल्याने देशाच्या सुपुत्रांनी आपले नाव देशातच नव्हे तर, जागतिक स्तरावर सुवर्णाक्षरात कोरले आहे. आजचा हा गुणगौरव सोहळा गुणवंत राजनेत्याच्या वाढदिवसानिमित्त होत आहे याचा विशेष आनंद असून हा दुग्धशर्करा योग आहे. हा देश गुणवंतांची खाण आहे, अशा गुणवंतांचा सन्मान करणे हीच आपली खरी संस्कृती आहे. गत दोन दशकांपासून गुणवंत विद्यार्थ्यांच्या यशाचा गुणगौरव करून त्यांना भविष्यातील यशस्वी वाटचालीकारिता प्रोत्साहन व शुभेच्छा देणे हीच या कार्यक्रमामागील मुळ भावना असल्याचे प्रतिपादन राष्ट्रीय मागासवर्ग आयोगाचे अध्यक्ष तथा पुर्व केंद्रीय गृह राज्यमंत्री हंसराज अहीर यांनी केले.

राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त भारतीय जनता युवा मोर्चा व कमल स्पोर्टींग क्लब, चंद्रपूर यांचेद्वारा भाजयुमोचे प्रदेश उपाध्यक्ष युवा नेते रघुवीर अहीर यांच्या विशेष पुढाकारातून दि. २२ जुलै



२०२५ रोजी, चंद्रपूर शहरातील इयत्ता १० वी व १२वी परीक्षेमध्ये गुणवत्ता प्राप्त विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा कन्यका परमेश्वरी सभागृह, कस्तुरबा मार्ग, चंद्रपूर येथे पार पडला त्याप्रसंगी हंसराज अहीर बोलत होते.

या गुणगौरव सोहळ्यास गोंडवाना विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. किर्तीवर्धन दिक्षीत, भाजपा ओबीसी मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष डॉ. अशोक जिवतोडे, हरीश्चंद्रजी अहीर, माजी उपमहापौर अनिल फुलझेले, डॉ. एम जे खान, एमआयडीसी असो. चे अध्यक्ष मधुसूदन रुंगठा, शामल अहीर, कार्यकमाचे आयोजक रघुवीर अहीर, भाजपाचे माजी जिल्हा महामंत्री नामदेव डाहुले, माजी नगरसेवक संजय कंचर्लावार, राजु अडपेवार, आदी मान्यवर उपस्थित होते.प्रास्ताविकात रघुवीर अहीर यांनी कार्यक्रमामागील भुमिका विषद करताना विद्यार्थ्यांनी आपली संस्कृती, परंपरा व चिरंतन मुल्ये विद्यार्थी दशेतच जपली पाहीजे, तिला महत्व देतांना बारा बलुतेदारीतील पारंपारीक व्यवसाय अबाधित राहावेत यासाठी आधुनिक पध्दतीने या व्यवसायाला जागतिक स्तरावर पोहचविण्यासाठी विद्यार्थ्यांनी कौशल्यप्राप्त करावे असे आवाहन केले. पंतप्रधान मोदीजी स्किल इंडियाच्या माध्यमातून देशाच्या पारंपारीक व्यवसायास बळ देत असल्याचेही त्यांनी सांगितले.

याप्रसंगी डॉ. अशोक जिवतोडे यांनी गुरू शिष्य परंपरेतून यापूर्वी विद्यार्थी घडायचे आज ज्ञार्नाजनाच्या विविध माध्यमातून विद्यार्थी घडत आहेत. पालकांच्या यापुर्वीच्या अपेक्षांमध्ये सुध्दा मोठे परीवर्तन झाल्याने शिक्षणाचा विस्तार वाढत असून अनेक क्षेत्र त्याच्यासाठी खुले झाले असल्याने परीश्रम, जिद्द व निर्भय होत आपल्या आवडीच्या शैक्षणिक क्षेत्रात प्रवेश घेवून विद्यार्थ्यांनी आपले भवितव्य घडवावे असा हितोपदेश त्यांनी दिला.

# जमनजट्टी परिसरात मनपातर्फे वृक्षारोपण

## एक पेड माँ के नाम २.० व माझी वसुंधरा अभियान अंतर्गत अभियान

**महासागर प्रतिनिधी**

**चंद्रपूर, दि. २४ जुलै :** चंद्रपूर महानगरपालिके मार्फत पठाणपुरा गेट बाहेरील जमनजट्टी परिसरात वृक्षारोपण कार्यक्रम २२ जुलै रोजी सकाळी ९ वाजता आयुक्त विपीन पालीवाल यांच्या उपस्थितीत राबविण्यात आला. याप्रसंगी रोपट्यांची लागवड करण्यात आली.

शासनातर्फे 'एक पेड माँ के नाम २.०' तसेच 'माझी वसुंधरा' अभियान राबविले जात आहे. या उपक्रमाचे उद्दिष्ट पर्यावरण संवर्धन, जैवविविधतेचे रक्षण आणि हरित आवरणात वाढ करून भावी पिढ्यांसाठी सुदृढ पर्यावरणाची जपणूक करणे आहे.उपरोक्त उपक्रमाअंतर्गत महापालिका प्रशासन, अधिकारी, नागरिक, स्वयंसेवी संस्था व विद्यार्थी यांच्या सक्रिय सहभागाने वृक्षारोपण केले जाणार आहे. राष्ट्रीय मोहिमांच्या



अनुषंगाने मनपातर्फे वृक्षारोपण कार्यक्रम राबविला जात असून जनजागृतीसह प्रत्यक्ष कृतीवर भर देण्यात येत आहे.

याप्रसंगी आयुक्त विपीन पालीवाल यांनी उपस्थितांना झाडे जगवण्याची जबाबदार ही परिसरातील नागरिकांची असल्याचे सांगितले.यापूर्वी बल्लारपूर रोडवर लावलेली झाडे नागरिकांच्या सहकार्याने जगली आहेत. शहराला जवळपास २ लक्ष वृक्षांची आवश्यकता आहे,यातील ५० हजार वृक्ष लावण्याचे मनपाचे उद्दिष्ट आहे.एक विद्यार्थी एक वृक्ष हा उपक्रम शालेय विद्यार्थ्यांकरिता मनपा राबवित असुन या उपक्रमाच्या माध्यमातून नागरिकांनी आपल्या परिसरात अधिकाधिक वृक्ष लागवड करून पर्यावरण रक्षणासाठी पुढे यावे.

कार्यक्रमात सहायक आयुक्त शुभांगी सूर्यवंशी,उपअभियंता रवींद्र कळंबे,चैतन्य चोरे,हुज्जाज ए इकरा मल्टिपर्पज सोसायटी,इको प्रो संस्था तसेच मनपा अधिकारी कर्मचारी व इतर सामाजिक संस्थेची प्रतिनिधी उपस्थीत होते.

# घुग्घुस पोलिसांकडून प्रामाणिक नागरिकाचा सत्कार

## हरवलेले पाकीट, महत्त्वाची कागदपत्रे मूळ मालकाला परत



**महासागर प्रतिनिधी**

**घुग्घुस, दि. २४ जुलै :** घुग्घुस येथील नागरिक दिलीप इंगोले यांचे दिनांक २३ जुलै,२०२५ बुधवार रोजी पैशांचे पाकीट आणि त्यातील महत्त्वाची कागदपत्रे हरवली होती. सुदैवाने, हे हरवलेले पाकीट आणि दस्तऐवज घुग्घुस येथीलच रहिवासी विनोद सदाशिव कामतवार यांना सापडले.

कामतवार यांनी तातडीने हे पाकीट आणि त्यातील कागदपत्रे घुग्घुस पोलीस ठाण्यात जमा केली. पोलिसांनी केलेल्या पडताळणीनंतर, ही सर्व वस्तू दिलीप इंगोले यांच्या असल्याचे निष्पन्न झाले आणि ती त्यांना सुखरूप परत करण्यात आली.

या प्रामाणिक कृत्याबद्दल घुग्घुस पोलीस ठाण्याच्या वतीने विनोद कामतवार यांचा विशेष सत्कार करण्यात आला. पोलीस अधिकाऱ्यांनी कामतवार यांच्या सचोटीचे आणि सामाजिक जबाबदारीच्या भावनेचे कौतुक केले. या घटनेमुळे समाजात प्रामाणिकपणा आणि चांगुलपणा अजूनही टिकून असल्याची भावना व्यक्त होत आहे. दिलीप इंगोले यांनीही कामतवार, घुग्घुस पोलिसांचे आभार मानले.

# महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषद, चंद्रपूर शहर जिल्हा कार्यकारिणीची निवड

**महासागर प्रतिनिधी**

**चंद्रपूर, दि. २३ जुलै :** लोकमान्य टिळक कन्या विद्यालय चंद्रपूर येथे महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेची संयुक्त सभा (ग्रामीण व महानगर) जिल्हाध्यक्ष विलास खोंड (ग्रामीण) यांचे अध्यक्षतेखाली संपन्न झाली.

या सभेत चंद्रपूर महानगरचे पालक रामदास गिरटकर विभाग संघटन मंत्री यांचे मार्गदर्शनात चंद्रपूर महानगराची कार्यकारिणी घोषित करण्यात आली. त्यात कार्याध्यक्ष पदी विनय कावडकर व देवेंद्र कंचर्लीवार, अध्यक्षपदी विपीन मानकर तर कार्यवाह पदी वसंत वडस्कर यांची निवड करण्यात आली. उपाध्यक्ष सुनिल पाचखेडे व



अश्विनी श्रीपाद पिंपळापूरे, सहकार्यवाह म्हणून चंद्रशेखर जोशी आणि मृणाल मनोज पनके, कोषाध्यक्ष म्हणून देविदास चवले याची निवड करण्यात आली. संघटन मंत्री मुर्लीधर पाकमोडे, कार्यालय मंत्री संतोष कुमरे, महिला आघाडी प्रमुख म्हणून प्रा. स्नेहल अनिल बांगडे व महिला आघाडी सहप्रमुख वर्षा महादेवराव महात्मे यांची निवड करण्यात आली असून कार्यकारिणी सदस्यांमध्ये केशरी शेषराव देऊरमल्ले, भारती पिट्टलवार-कन्नमवार, वंदना विजय एंगलवार, सुरेश अडपेवार, विजय पत्तीवार यांची निवड करण्यात आली.

या सभेला जिल्हा कार्यवाह दिलीप मॅकलवार (ग्रामीण), संघटन मंत्री डॉ. किशोर टेंभूर्णे, सहसंघटन मंत्री चंद्रशेखर भंडारवार, कनिष्ठ महाविद्यालयीन प्रतिनिधी विलास वरभे, संदिप बद्दलवार, विनोद वाघमारे, प्रभाकर साळवे, दयानंद चिंतलवार यांची उपस्थिती होती. सभेचे संचालन संदिप बद्दलवार तर आभार चंद्रशेखर भंडारवार यांनी मानले.

RNI No.49746/1988 चंद्रपूर महासागर

मालक, मुद्रक, प्रकाशक सौ. निर्मला चांडक यांनी अरुणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर १८ येथे छापुन दैनिक चंद्रपूर महासागर कार्यालय, पोपट बिल्डींग जटपुरा गेट, चंद्रपूर येथे प्रकाशित केले. संपादक राहुल चांडक

मुख्य कार्यालय फोन - ७४४७७३५८५१, ९९२२९७००२३ * स्थानिक संपादक :- प्रवीण बतकी * (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबावदारी यांचेवर राहील.)



# श्रावणमासी.. हर्ष मानसी...

## श्रावण मासाचे महत्त्व

जगन घाणेकर
घाटकोपर, मुंबई.
९६६४५५९७८०

२५ जुलैपासून श्रावण मासारंभ होत आहे. आषाढी एकादशी ते कार्तिक एकादशी या चार महिन्यांच्या काळात भगवान श्री विष्णू महासागरात शेषशय्येवर योगनिद्रा घेत असल्याने सृष्टीचा भार भगवान शिव शंकरांवर पडतो. त्यामुळे या दिवसांत शिव उपासनेला अधिक महत्व प्राप्त झाले आहे. श्रावण मसाविषयी शास्त्रीय माहिती या लेखातून जाणून घेऊया.

भगवान श्रीकृष्ण आणि अर्जुन यांच्या श्रीमद्भगवत्गीतेतील संवादात भगवान श्रीकृष्णाने सांगितले आहे, मासांमध्ये (महिन्यांमध्ये) मी मार्गशीर्ष मास आहे. याचप्रमाणे शिव आणि सनतकुमार यांच्यामध्ये श्रावणमासाबद्दल पुढील आशयाचा संवाद झाल्याचे पुराणात म्हटले आहे. भोलेनाथ शिव म्हणतात

*द्वादशस्वपि मासेषु श्रावणो मेऽतिवल्लभः ।*
*श्रवणार्हं यन्माहात्म्यं तेनासौ श्रवणो मतः ।।*
*श्रवणर्क्षं पौर्णमास्यं ततोऽपि श्रावणः स्मृतः ।*
*यस्य श्रवणमात्रेण सिद्धिदः श्रावणोऽप्यतः ।।*

अर्थ : १२ मासांतील श्रावण मास मला अतिप्रिय आहे. त्याचे माहात्म्य श्रवण करण्यास योग्य आहे. त्यामुळे त्याला श्रावण मास असे म्हटले जाते. श्रावण या शब्दाची उत्पत्ती श्रवण या शब्दातून झाली आहे.

श्रवण शब्दाचे २ अर्थ होतात. त्यांपैकी एक म्हणजे हिंदु पंचांगातील २२ वे नक्षत्र, असा आहे आणि दुसरा अर्थ श्रवण म्हणजे ऐकणे. श्रावणात श्रवणभक्ती केल्याने सिद्धी प्राप्त होतात. त्यामुळेच हा मास अत्यंत पवित्र आणि शुभ मानला जातो.

हिंदु धर्मात पंचांगातील ५ अंगापैकी नक्षत्र या अंगाला अत्यंत महत्त्व आहे. त्यामुळे हिंदु कालगणनेनुसार १२ मासांची नावे ही त्या त्या मासाच्या पौर्णिमेला चंद्र ज्या नक्षत्रात असतो, त्या नक्षत्रानुसार आहेत, उदा. चैत्र मासातील पौर्णिमेला चंद्र चित्रा नक्षत्रात असतो; म्हणून त्या मासाचे नाव चैत्र आहे. श्रावणातील पौर्णिमेला चंद्र श्रवण नक्षत्रात असतो. त्यामुळे त्या मासाचे नाव श्रावण आहे. पौर्णिमेला चंद्र ज्या नक्षत्रात असतो, त्या नक्षत्राचे चैतन्य आणि ऊर्जा त्या संपूर्ण मासात अधिक प्रमाणात कार्यरत असते.

शास्त्रानुरुक्तो बहुपुत्रमित्रः
सत्पात्रभक्तिः विजितारिपक्षः ।
चेज्जन्मकाले श्रवणा हि
यस्य प्रेमा पुराणश्रवणे प्रवीणः ।।
जातकाभरण

अर्थ : श्रवण नक्षत्रावर जन्माला आलेला मनुष्य शास्त्रप्रेमी, अनेक मित्र असलेला, मुलाबाळांची आवड असणारा, विधायक कार्ये करणारा, शत्रूंवर विजय मिळवणारा, पुराणश्रवण आदींमध्ये रुची असलेला असतो.

हिंदु संस्कृतीचे निर्माते असणाऱ्या ऋषिमुनींना याचे सर्व ज्ञान होते. त्यामुळेच त्यांनी आपल्यावर उत्तम आणि उदात्त संस्कार व्हावेत आणि आपल्याला आवश्यक ते धर्मज्ञान सहजपणे मिळावे, यांसाठी श्रावण मासात अधिकाधिक ग्रंथ, कथावाचन, पारायण, व्रतवैकल्ये, दानधर्म करण्याचे मार्गदर्शन केले आहे. त्यामुळेच वर्षभर मांसाहार करणारे लोक श्रावण मासात मांसाहार पूर्णतः वर्ज्य करतात.

बहुतेक घरांत श्री सत्यनारायणाची पूजा अगत्याने केली जाते. श्रावणात प्रत्येक वारानुसार व्रते, विशेष पूजा, उपवास इत्यादी गोष्टी स्त्रिया तर करतातच; पण बहुतेक पुरुषसुद्धा दाढी न करणे, केस न कापणे, तसेच उपवास करणे, घरात श्रीगुरुचरित्र, श्रीनवनाथ माहात्म्य, शिवलीलामृत, शिवपुराण किंवा कुठल्याही धार्मिक ग्रंथांची पारायणे इत्यादी आचारांचे पालन करतातच. त्यामुळे ह्यब्रह्मांडातील ग्रह, तारे आणि नक्षत्रे यांचे मानवी जीवन किंवा चराचर सृष्टी यांवर सकारात्मक किंवा नकारात्मक परिणाम होतातच, याचाच हा पुरावा आहे.

तात्पर्य काय, तर हिंदु धर्मशास्त्रातील विज्ञान समजून घेतले पाहिजे. त्यामुळे आपल्या जीवनात जे जे उत्तम, उदात्त, उन्नत, महन्मधुर, ते ते घडवण्यासाठी कटिबद्ध असणाऱ्या प्रत्येक व्यक्तीच्या मानसिकतेला या श्रवण नक्षत्रामुळे आणि श्रावण मासामुळे योग्य ते क्रियमाण वापरण्यासाठी भरपूर प्रमाणात बळ मिळते.

●●●●●●

## चातुर्मासातील सण, व्रते आणि उत्सव



श्रीमती. प्रतिभा जडी
सनातन संस्था, अकोला.
83293 08517

चातुर्मास, म्हणजे ४ मासांचा काळ. याचा आरंभ देवशयनी, म्हणजेच आषाढ शुक्ल ११ (एकादशी) या दिवशी होतो आणि प्रबोधिनी, म्हणजेच कार्तिक शुक्ल ११ (एकादशी) या दिवशी संपतो. या दोन्ही महाएकादशी असून अनेक जण या दिवशी उपवास करतात. एकादशीला आळंदीची संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज यांची पालखी पंढरपूरला विठ्ठलाच्या दर्शनाकरता जाते. पालखीच्या समवेत लक्षावधी वारकरी असतात.

चातुर्मासात देवशयनी एकादशीच्या दिवशी देव झोपत असल्याने असुरांपासून रक्षण होण्यासाठी त्या कालावधीत व्रत-वैकल्ये केली जातात.

आषाढ मासाच्या पौर्णिमेच्या मागेपुढे पूर्वाषाढा-उत्तराषाढा नक्षत्र असते. मनुष्याचे १ वर्ष, म्हणजे देवांची अहोरात्र. दक्षिणायनह्य म्हणजे ६ मासांची रात्र, तर उत्तरायण म्हणजे दिवस होय. यथा देहे तथा देवे, म्हणजे मानवाने आपल्यासारखेच देव आहेत, ही कल्पना गृहीत धरल्यामुळे आपल्यासारखेच देव झोपी जातात; म्हणून आरंभ देवशयनी एकादशीने होतो आणि ४ मासांनी कार्तिक शुक्ल ११, म्हणजेच प्रबोधिनी एकादशीच्या दिवशी देव जागे होतात, असे समजले जाते.

देव निद्रिस्त असल्यामुळे अनेक असुर मानवाला त्रास देतात. हे त्रास टाळण्याकरता व्रत-वैकल्ये करावीत, म्हणजे धमार्ची अभिवृद्धी होऊन मानवाला त्याचा लाभ होतो आणि त्याच्यात संकटाला तोंड देण्याची मानसिकता निर्माण होते.

**चातुर्मासातील व्रतांचे महत्त्व**

व्रत, म्हणजे विशिष्ट काळासाठी किंवा आमरण आचरायचा धर्म. नियम आणि व्रत हे समानार्थी शब्द आहेत. जेव्हा एखादी व्यक्ती स्वतःचा आचार, अन्नादी व्यवहार, रूढी आणि उपासना यांवर निर्बंध घालते किंवा घालून घेते, त्या वेळी या गोष्टी व्रत या संज्ञेत येतात.

**व्रतांचे प्रकार आणि नियम**

व्रते नित्य (नेहमी करायची) आणि काम्य (इच्छित गोष्ट साध्य करण्यासाठी केलेली) अशा दोन्ही प्रकारची असतात. एकादशीचा उपवास करणाऱ्याने संपूर्ण दिवस अन्न वर्ज्य करणे, एकदाच पाणी पिणे आणि दिवसा न झोपणे, असे नियम पाळावेत. एकादशीचे पारणे (उपवास सोडणे) द्वादशीला किंवा दुसऱ्या दिवशीही उपवास आल्यास त्रयोदशीला करता येते.

व्रत करणाऱ्यांनी मद्य-मांसादी पदार्थांचे सेवन न करणे, पलंगावर न निजणे आदी निर्बंध पाळावयाचे असतात.

**चातुर्मासातील सण, व्रते आणि उत्सव**

श्रावण मास

चातुर्मासाचा दुसरा मास श्रावण मास आहे. या मासातील पौर्णिमेच्या मागेपुढे श्रवण नक्षत्र येते; म्हणून हा श्रावण मास आहे. या मासात स्त्रियांची अनेक व्रत-वैकल्ये असून सातही वारांना काही ना काही पूजा सांगितल्या आहेत.

**नवविवाहित स्त्रियांनी ५ वर्षे पाळवयाची व्रते आणि वारानुसार करायची पूजा**

सोमवारी शिवपूजा : यामध्ये अनुक्रमे तांदूळ, तीळ, मूग आणि जवस या धान्यांची शिवामूठ वाहिली जाते.

सोळा सोमवार व्रत : सोमवती व्रत हे काम्य (इच्छा) व्रत आहे.

मंगळवारी मंगळागौरीची पूजा : नवविवाहित मुली सौभाग्यवृद्धीसाठी मंगळवारी मंगळागौरीची षोडशोपचारे पूजा करतात. यात १६ या संख्येला महत्त्व असते. त्यामुळे पूजेसाठी १६ सुवासिनींना बोलावतात, तसेच पूजा करतांना देवीला १६ प्रकारची पत्री, फुले इत्यादी वहातात.

बुधवार आणि गुरुवार : या दोन्ही दिवशी बृहस्पतीची पूजा करतात.

शुक्रवारी जिवतीची पूजा : या दिवशी मुलांच्या आरोग्याकरता जिवतीच्या चित्राची पूजा करतात. सुवासिनींना हळदकुंकू लावून फुटाणे देतात.

शनिवार : नरसिंह आणि पिंपळ यांची पूजा करतात.

रविवार : सूर्याची (आदित्यराणूबाईची) पूजा करतात.

**श्रावण मास : दुसऱ्या पंधरवाड्यातील व्रते**

जन्माष्टमी : या दिवशी श्रीकृष्ण जयंती असते. कृष्ण हा भगवान विष्णूचा आठवा अवतार मानला जातो. या दिवशी संत ज्ञानेश्वर जयंती असते.

श्रावण कृष्ण द्वादशी : या दिवशी पावस (जिल्हा रत्नागिरी) येथील स्वामी स्वरूपानंद यांची पुण्यतिथी असते.

दर्श (पिठोरी) अमावास्या : या दिवशी पोळा सण साजरा करतात. या दिवशी वृषभपूजन केले जाते. वृषभांना (बैलांना) गोड-धोड खाऊ घालतात. हा सण ग्रामीण भागात मोठ्या आनंदाने साजरा केला जातो.

**भाद्रपद मास**

हा चातुर्मासापैकी तिसरा मास आहे. या मासाच्या पौर्णिमेच्या मागेपुढे पूर्वा भाद्रपदा नक्षत्र येते. भाद्रपद शुक्ल पक्षात हरितालिका, गणपति, ऋषिपंचमी, गौरी आवाहन, पूजन आणि विसर्जन, अदुःखनवमी, स्वर्णगौरी इत्यादी व्रते असतात.

**भाद्रपद मासातील व्रते**

भाद्रपद शुक्ल तृतीया (हरितालिका व्रत) : या दिवशी मातीच्या हरितालिकेच्या मूर्ती (सखीसह) आणतात. सौभाग्यप्राप्तीसाठी आणि कुमारिकांना चांगला पती मिळावा; म्हणून केले जाणारे हे व्रत सर्व स्त्रिया अन् मुली करतात. या दिवशी पूजा, उपवास आणि रात्री जागरण करतात.

दुसऱ्या दिवशी पारणे सोडतात. या संदर्भात पुराणात एक कथा आहे. ह्यपार्वतीला शंकरा समवेतच विवाह करायचा होता; म्हणून ती आणि तिची सखी अरण्यात तपश्चर्येकरता गेल्या. पार्वतीच्या खडतर तपाने भगवान शंकर प्रसन्न झाले आणि त्यांनी तिचा पत्नी म्हणून स्वीकार केला. त्याकरता तिने जे व्रत केले, ते हे हरितालिका व्रत.

भाद्रपद शुक्ल चतुर्थी (श्री गणेशचतुर्थी)

भाद्रपद शुक्ल चतुर्थीला घरोघरी पार्थिव (मातीच्या) गणेशाच्या मूर्तीची पूजा असते. कुलाचाराप्रमाणे दीड दिवस, ५ दिवस, गौरीसह किंवा अनंतचतुर्दशीच्या दिवशी श्री गणेशमूर्तीचे विसर्जन करतात.

ऋषिपंचमी : भाद्रपद शुक्ल पंचमी या दिवशी सप्तर्षि आणि अरुंधती यांची पूजा करायची असते. या व्रतात १०८ वेळा आघाड्याच्या काड्यांनी दंतधावन करायचे असते.

१०८ वेळा नदीच्या पाण्यात डुबक्या (नदीवर स्नान करत असतील, तर) मारायच्या किंवा १०८ तांबे पाणी स्नानाला घ्यायचे असते. १०८ वस्तूंचे वायन दान (स्त्रियांनी ब्राह्मणास द्यायचे दान) करावे. हे व्रत ७ वर्षे करायचे असते. या दिवशी बैलाच्या श्रमाचे काहीही खायचे नसते. पुरातन काळी असे आचरण केले जात होते.

अदुःखनवमी : भाद्रपद शुक्ल नवमी या दिवशी गौरीची पूजा, उपवास आणि जागरण करतात. हे व्रत ९ वर्षे करायचे असते. या दिवशी भागवत सप्ताहाचा आरंभ होऊन पौर्णिमेला समाप्ती होते.

अनंतचर्तुदशी : अनंताच्या पूजेचे व्रत ज्यांनी घेतले आहे, ते अनंतचतुर्दशी (भाद्रपद शुक्ल १४) या दिवशी पूजा करतात. ही पूजा घरातील कर्ता पुरुष करतो.

भाद्रपद पौर्णिमा : या दिवसाला प्रौष्ठपदी पौर्णिमा म्हणतात. या दिवशी प्रपितामहाच्या (पणजोबांच्या) पूर्वीच्या तीन पुरुषांना उद्देशून श्राद्ध करावे, असे सांगितले आहे.

भाद्रपद कृष्ण प्रतिपदेपासून महालयारंभ

पक्ष पंधरवड्यात पितरांना पिंड देतात. भाद्रपद अमावास्येला सर्वपित्री अमावास्या, असे म्हणतात आणि त्या दिवशी श्राद्ध केले जाते.

भाद्रपद कृष्ण नवमी (अविधवा नवमी)

स्वतःची माता किंवा कुटुंबातील अन्य कुणी स्त्री अहेवपणे (सौभाग्यवती असतांना) मृत झाली असल्यास तिचे श्राद्ध करायचे असते. त्या दिवशी ब्राह्मणासह सुवासिनीलाही भोजन देण्याचा प्रघात आहे.

**आश्विन मास**

या मासात पौर्णिमेच्या मागे पुढे आश्विन नक्षत्र असते. हा मास म्हणजे उत्साहाचा मास.

**आश्विन शुक्ल प्रतिपदा (घटस्थापना)**

आश्विन शुक्ल पक्षाचा आरंभ घटस्थापनेने होतो. हे देवीचे नवरात्र असते. या व्रतात कुलाचाराप्रमाणे पूजा, सप्तशतीचा पाठ, नंदादीप इत्यादी आचार केले जातात. नवरात्रात प्रतिदिन फुलांच्या माळा वाढवत जातात. कुमारिका, सवाष्ण आणि ब्राह्मण यांना प्रतिदिन किंवा पहिल्या दिवशी आणि शेवटच्या दिवशी भोजनाला बोलावतात.

ललितापंचमीचे व्रत

ज्या स्त्रियांनी हे व्रत घेतले आहे, त्या उपांगललिता या देवीची पूजा करतात. देवीला गंधयुक्त साग्र (३ किंवा ५ पाती असलेल्या दुर्वा) ४८ दुर्वा वहातात, तसेच घारग्यांचे वाण देतात. त्या दिवशी मंत्रजागर करतात.

दुर्गाष्टमी : या दिवशी श्री महालक्ष्मीची पूजा करतात. या पूजेसाठी तांदुळाच्या उकडीचा मुखवटा सिद्ध करून देवी वस्त्रालंकारांनी सजवतात आणि तिची पूजा करतात. कोकणस्थ ब्राह्मण शाखेचे लोक हे व्रत करतात. नवविवाहित मुली विवाहानंतर ५ वर्षे पूजा करतात. घागरी फुंकून पूर्ण रात्र महालक्ष्मी जागवतात आणि दुसऱ्या दिवशी मुखवट्याचे विसर्जन करतात.

विजयादशमी (दसरा) : हा साडेतीन मुहूर्तांपैकी एक आहे. या दिवशी श्रवण नक्षत्र असल्यास ते अधिक शुभदायक असते. या दिवशी पोथी आणि शस्त्रास्त्रे यांची पूजा करतात. सीमोल्लंघन करून आपट्याची पाने सोने म्हणून वाटतात. याच दिवशी देवीने शुंभ-निशुंभ आणि महिषासुरादी असुरांचा नाश करून विजय मिळवला. याच दिवशी रामाने रावणाचा पराभव करून विजय मिळवला; म्हणून ही विजयादशमी !

कोजागरी पौर्णिमा : या दिवशी चंद्राला औक्षण करून चंद्रप्रकाशात आटवलेले दूध प्राशन करतात. आई मोठ्या मुलाला किंवा मुलीला औक्षण करते.

आश्विन कृष्ण द्वादशी (वसुबारस) :
या दिवशी सायंकाळी सवत्स गायीचे पूजन करतात.

आश्विन कृष्ण त्रयोदशी (धनत्रयोदशी)
या दिवशी दीपदानाचे व्रत केल्यास अपमृत्यू येत नाही.

आश्विन कृष्ण चतुर्दशी (नरकचतुर्दशी)
चतुर्दशीपासून कार्तिक शुक्ल २ अखेर असे सलग ४ दिवस दिवाळी सण आहे. हिंदूंचा हा मोठा आणि महत्त्वाचा सण आहे. नरकचतुर्दशीच्या दिवशी सूर्योदयापूर्वी अभ्यंगस्नान करावे.

आश्विन अमावस्या (लक्ष्मीपूजन) :
या दिवशी लक्ष्मी-कुबेर यांचे पूजन अर्थात लक्ष्मीपूजन असते. व्यापारी लोक वह्यांचे पूजन करतात. दिवाळीचे पुढील दोन दिवस कार्तिक मासात येतात.

**कार्तिक मास**

कार्तिक शुक्ल प्रतिपदा
(बलिप्रतिपदा : दिवाळी पाडवा)

कार्तिक मासाचा पहिला दिवस, म्हणजे बलिप्रतिपदा. बली हा प्रल्हादाचा नातू, म्हणजेच प्रल्हादाचा मुलगा विरोचन याचा पुत्र होता. त्याने (बलीने) इंद्रादी देवांना पराभूत केले. तो देवांची संपत्ती दैत्य लोकांत नेत असतांना ती सागरात पडली; म्हणून पुढे समुद्रमंथन करून ती संपत्ती वर काढली.

बली १०० वा यज्ञ करत असतांना वामनाने (भगवान विष्णूच्या पाचव्या अवताराने) बलीकडे त्रिपादभूमीचे दान मागितले. वामनाने दोन पावलांत त्रिभुवन व्यापले आणि तिसरे पाऊल बलीच्या सांगण्याप्रमाणे मस्तकावर ठेवले आणि त्याला सुतल या पाताळात घातले.

कार्तिक शुक्ल द्वितीया (भाऊबीज)
याला यमद्वितीया, असे म्हणतात. या दिवशी यम बहिणीकडे ओवाळणी घालण्यास जातो.

या लेखात चातुर्मासातील व्रते-सण यांचा उल्लेख थोडक्यात केला आहे. बहुतेक व्रते स्त्रियांनीच करायची आहेत. संसारात येणाऱ्या अनेक अडचणींना त्यांना तोंड देता यावे, हा त्यामागील प्रधान हेतू आहे. ऐहिक सुखापेक्षा पारलौकिक सुखाकडे लक्ष द्या.

■ ■ ■

## सणांचा राजा श्रावण

श्रावण महिना हा हिंदू पंचांगानुसार आणि भारतीय सौर दिनदर्शिकेनुसार वर्षातला पाचवा महिना आहे. या महिन्याच्या पौर्णिमेला चंद्र श्रवण नक्षत्रात असतो, त्यावरून या महिन्याला श्रावण असे नाव मिळाले आहे.

**खगोलीय महत्व**

भारतीय राष्ट्रीय दिनदर्शिकेतला श्रावण महिना हा जुलैच्या उत्तरार्धात पौर्णिमेपासून सुरू होतो आणि ऑगस्टच्या तिसऱ्या आठवड्यात पुढील पौर्णिमेच्या दिवशी संपतो. तमिळ कॅलेंडरमध्ये तो अवनी म्हणून ओळखला जातो आणि सौर वर्षाचा पाचवा महिना असतो. चंद्र धार्मिक कॅलेंडरमध्ये श्रावण हा अमावस्येपासून सुरू होतो आणि तो वषार्चा पाचवा महिना असतो. श्राबोन हा सौर बंगाली कॅलेंडरचा चौथा महिना आहे. तसेच नेपाळी कॅलेंडरचा चौथा महिना असतो. श्रावण हा वर्षा ऋतुचा (पावसाळ्याचा) दुसरा महिना असतो.

**अधिक श्रावण**

साधारणतः ८ किंवा ११ आणि क्वचित १९ वर्षांनी अधिक श्रावण येतो. त्या महिन्यात येणाऱ्या शुक्ल किंवा वद्य या दोन्ही एकादश्यांना कमला एकादशी हे नाव आहे. उत्तर हिंदुस्थानात या एकादश्यांना अनुक्रमे पद्मिनी आणि परम एकादशी म्हणतात. एकादश्या वगळल्या तर अधिक श्रावणात कोणतेही हिंदू सण किंवा व्रताचे दिवस येत नाहीत. ज्यावर्षी अधिक श्रावण असतो त्यावर्षी पाच महिन्यांचा चातुर्मास असतो. चातुमार्सात लग्ने होत नसल्याने ती अधिक श्रावणातही होत नाहीत.

श्रावण महिन्याला सर्व व्रतांचा/सणांचा राजा म्हणले जाते. श्रावण महिन्यातील प्रत्येक वारी कोणत्याना कोणत्या देवतेची पूजा वा व्रत करण्याची हिंदू आणि जैनधर्मीयांची परंपरा आहे. या विशिष्ट महिन्यात केल्या जाणाऱ्या शंकराच्या उपासनेला हिंदू धर्मात विशेष महत्त्व आहे संपूर्ण भारतीय उपखंडासाठी श्रावण महिना खूप महत्त्वाचा आहे कारण तो नैऋत्य मान्सूनच्या आगमनाशी जोडलेला आहे.

श्रावण महिन्यात नागपंचमी, रक्षाबंधन, नारळी पौर्णिमा , भुज(जा)रिया पर्व, श्रीकृष्ण जयंती/'कृष्ण जन्माष्टमी', पिठोरी अमावास्या, पोळा, मंगळागौरी पूजन, गणेश चतुर्थी, अनंत चतुर्थीयासह अनेक सणांची रेलचेल असते.

उत्तर भारतात विशेषतः बिहार मधील वैजनाथ या ज्योतिलिंगांपैकी एक असलेल्या शिवमंदिरात गंगेचे पाणी कावडीतून वाहून नेऊन शिवपिंडीला अभिषेक करण्याची परंपरा आहे. अशी कावड खांद्यावर घेऊन चालत जाणाऱ्या भाविकांना कावडिया असे संबोधिले जाते.

उत्तर भारतात या महिन्यात झुलन यात्रा, रक्षाबंधन, जन्माष्टमी व नंदोत्सव हे उत्सव विशेष महत्त्वाचे मानतात. झुलन जत्रा हा दोलोत्सव आहे. पौर्णिमेच्या दिवशी राधा व कृष्ण यांना हिंदोळ्यावर बसवून झोके देतात व स्त्रिया त्यांच्यासंबंधी गीते गातात. हा उत्सव एकादशी पासून पौर्णिमेपर्यंत चालतो. कृष्ण जन्माच्या दुसऱ्या दिवशी नंदोत्सव करतात. नंदाला पुत्र झाला असे समजून या दिवशी हळदी-कुंकू मिसळलेले पाणी पिचकारीने उडवतात.

एकूणच काय तर श्रावण मासात सर्वत्र पाऊस कोसळत असतो, नदी नाले दुथडी भरून वाहत असतात, शेतीचाही हंगाम सुरू झालेला असतो . त्यात सणांची रेलचेल आणि गोडधोड करून खाण्याचे दिवस . चला तर आपणही या श्रावण मासाचा मनमुराद आनंद लुटूया.

■ ■ ■

## सावन का महिना पवन करे सोर...



सावन का महिना पवन करे सोर,
जियरा रे झूमे ऐसे ,जैसे बनमा नाचे मोर

१९६७ मध्ये रिलीज झालेलं मिलन चित्रपटातलं हे गीत श्रावणाच्या देखाव्याची खरी अनुभूती देतं. निसर्गाच मनमोहक रूप आणि मराठी सणांची आरास असलेला श्रावणमास !!

निसर्गाच्या सृजनाचे राजेपद सांभाळत, माहेरवाशीणींना व्रत- वैकल्यात गुंतवून टाकणारा , सणांनी आपापसातील कटूता काढून टाकणारा हा महिना आनंदाची बीजे चित्तवृत्तीत पेरून जातो. निसर्गाने स्वतः भोवती पांघरलेली हिरवीगार शाल, ऊन पावसाशी चालवलेला खेळ, पांढऱ्या शुभ्र, स्वच्छ, खळाळत्या धबधब्यात न्हाऊन निघणारा डोंगर, डेरेदार झाडाला बांधलेले सुगरणीचे खोपे आणि पारंब्यांना टांगलेले झुले हे श्रावणाचं रूप गावोगावी पहायला मिळतं आणि पृथ्वीवरील हिरव्या स्वगार्ची अनुभूती येते.

लालचुटूक तेरडा, धायरीची तांबूस फुले, विविध रंगी रानफुले, अनेक विध फळे, अनेक खनिजांनी युक्त कंर्टोली, भोकर, अळू अशा अनेक रानभाज्या असा रानमेवा, पक्ष्यांचा किलबिलाट, श्रावण आपल्या समोर ठेवतो आणि या सा-यामुळे निसर्गाचे हे जणू अनोखे रंगसंमेलनच भासते.

निसर्गाच्या या आविष्काराला विविध सणांची सोबत असते.श्रावणाची सुरवात होते ती नागपंचमीने. शेतीचे रक्षण करून शेतकऱ्यालाही मदत करणाऱ्या नागाचे पूजन हे या सणाचे महत्त्व आहे. यानंतर सारे कोळी बांधव आपल्या व्यवसायाची सुरवात करण्यास सज्ज होतात.

समुद्राला नारळ अर्पण करून त्याला शांत करणारा नारळी पौर्णिमेचा सण यानंतर येतो .याचवेळी बहिण- भावाच्या नात्याची वीण अधिक घट्ट करणारा रक्षाबंधनाचा सण असतो.बालकृष्णाच्या बालक्रीडा दाखवणारा, बालगोपालांचा लाडका दहीकालेचा उत्सव मुलांचा आवडता.

विवाहित स्त्रीया याच महिन्यात मंगळागौर पूजतात, दर सोमवारी भगवान शंकराला शिवामूठ वाहतात. मंगळागौरीच्या सणासाठी खास वेशभूषा करून, केशभूषा करून, दागदागिने लेऊन माहेरवाशीणी सणांच्या निमित्ताने माहेरी येतात.आपली सारी सुख दुःखे आपल्या आई, बहिणी, भावांशी हितगुज करत मनमोकळेपणाने सांगतात.

आपल्या दुःखावर मायेची फुंकर घेऊन, आपल्या सासरच्या माणसांचे कोडकौतुक करून साऱ्या सणांत समरस होतात.

श्रावण मासात निसर्ग भरभरून देत असतो त्यामुळे सारे पशुपक्षीही आनंदात असतात.कुरणे वनी बागडत असतात. बगळ्यांची माळ काळ्या नभाला सुशोभित करते. दुथडी भरून वाहणारी नदी पाणीटंचाईचे सावट दूर करते.

एकूणच वातावरण प्रसन्न असते. या वातावरण आपल्याला मात्र वाट्टेल तसे, वाट्टेल तेव्हा, तेलकट, तामसी खाऊन चालत नाही त्यामुळे आजाराबाबत श्रावणमासानेच काही मर्यादा घातल्या आहेत. यातील अनेक व्रतवैकल्यांचे शास्त्र समजून घेणे आवश्यक आहे. आपल्या पोटाला पचेल इतकाच आहारा व शक्यतो शाकाहार या काळात असावा असे शास्त्र सांगते.

व्रतवैकल्यांमागे शरीराला आवश्यक असणारे लंघन असावे हा मुलभूत हेतू आहे. या मुळे शिस्त, संयम ह्या गोष्टींचेही आपल्यावर नकळत संस्कार होतात. सर्वामागील विज्ञान आपण समजून घेतले तर श्रावण अधिक आनंद देईल यात तिळमात्र शंका नाही.

श्रावणाचे माहात्म्य अनेक कवी, कवयित्रींनी आपल्या साहित्यातून विशद केले आहे. बालकवींची श्रावणमास कविता, असा रंगारी श्रावण ही ऐश्वर्य पाटेकर यांची कविता श्रावणाचे चपखल वर्णन करणारी आहे. निसर्ग भ्रमंती, ट्रेकिंगसाठी, पावसाळी सहलीसाठी श्रावणमास परफेक्ट आहे असं म्हणायला काहीच हरकत नाही. निसर्गाच्या सानिध्यात जेथे पाहू तेथे फोटोजनिक व्ह्यू असतात. सेल्फीकाढून, फोटो काढून बॅटरी फूल होते, डिपी ठेवायला खूप फोटोंचं कलेक्शन मिळतं.

आषाढात प्रचंड पाऊस कधीकधी आपल्या बेतावर पाणी पाडू शकतो पण श्रावणातील पाऊस सहल खूप आनंद देऊन जातो. म्हणूनच श्रावणाचे वर्णन नेमके काय करावे? धार्मिक, अध्यात्मिक, हृदयस्पर्शी, निसर्गरम्य वा एकात्मिक?

खरं तरं मानवी जीवनाला आशावादी दृष्टिकोन देणारा श्रावण हे परमेश्वराने दिलेले वरदान आहे आणि दरवर्षी मिळणारे आहे.मनाची मरगळ दूर करणारा, झाडापानांना चमकदार करणारा, पवित्र, धार्मिक असा श्रावण. उपासाच्या पदार्थांनी तृप्त ढेकर द्यायला लावणारा असा हा श्रावण .वर्णन करायला शब्द अपुरे पडतील असा हा श्रावण .

*श्रावणराजा तू अद्भुतकिमयागार ।*
*हरित तृणांनी सजली*
*वसुधा नटूनी हिरवीगार ।*
*ललनाही झाल्या प्रसन्न*
*पहा तुझ्या या रूपांनी ।*
*श्रावणमासाचे हे गीत गुंफीले या शब्दांनी ।*

# श्रावण महिन्यात या गोष्टी टाळा...

हिंदू धर्मामध्ये अनेक सण अगदी धुमधडाक्यात साजरी केली जाते. काही दिवसांमध्ये श्रावण महिन्याला सुरूवात होणार आहे.

श्रावण महिन्यामध्ये अनेक सणांची सुरूवात होते. श्रावण महिना महादेवाला समर्पित आहे. महादेवाची पूजा केल्यामुळे तुमच्या जीवनातील सर्व समस्या दूर होण्यास मदत होते.

श्रावण महिना खूप पवित्र आहे आणि महादेवांना समर्पित आहे. श्रावण आज २५ जुलैपासून सुरू होत आहे आणि पोळा सणापर्यंत चालेल. या महिन्यात अनेक कामे निषिद्ध आहेत. जर श्रावण महिन्यात हे नियम पाळले नाहीत तर नकारात्मक परिणामांना सामोरे जावे लागू शकते. कोणती कामे करू नयेत हे जाणून घ्या.

**श्रावणमध्ये हे नियम पाळा**

श्रावण महिन्यात मांसाहार आणि मद्यपान करू नये. तसेच मांसाहारापासून दूर राहावे. सावन महिना हा भोलेनाथांचा आवडता महिना आहे.

या महिन्यात भोलेनाथांना प्रसन्न करणारी कामे करावीत, भोलेनाथांना आवडत नसलेली कामे टाळावीत, या महिन्यात राग आणि अहंकारापासून दूर राहावे आणि कोणाशीही कठोर शब्द बोलू नयेत.

श्रावण महिन्यात केस कापणे, नखे कापणे आणि दाढी करणे निषिद्ध आहे. धार्मिक दृष्टिकोनातून श्रावण महिना खूप महत्त्वाचा मानला जातो, म्हणूनच या महिन्यात या गोष्टी करण्यास मनाई आहे.

श्रावण महिन्यात घरकाम, मालमत्ता खरेदी-विक्री करणे शुभ मानले जात नाही, म्हणून या महिन्यात या कामांपासून दूर राहावे. श्रावण महिन्यात भगवान शिवाला तुळशी अर्पण करू नका. तुळशी भगवान विष्णूंना प्रिय आहे, म्हणून भगवान शिवाला तुळशी अर्पण करण्यास मनाई आहे. तसेच केतकी फुले, हळद, कुलकुम अर्पण करू नका.

श्रावण महिन्यात दह्यापासून बनवलेली भाजीपाला करी बनवू नका, कच्चे दूध पिऊ नका, मुळा, वांगी आणि मसाल्यांचे पदार्थ खाऊ नका. श्रावण महिन्यात दुधाचा अनादर करू नका.

चातुर्मास श्रावण महिन्यापासून सुरू होतो, म्हणून या महिन्यात लग्न, लग्न, मुंडन समारंभ इत्यादी शुभ कामे केली जात नाहीत.

श्रावण महिना हिंदू धर्मात खूप महत्वाचा मानला जातो. हा महिना भगवान शंकराला समर्पित आहे. या महिन्यात लोक उपवास करतात, विविध धार्मिक विधी करतात आणि शंकराची पूजा करतात.

श्रावण महिना भगवान शंकराची आराधना करण्यासाठी अत्यंत शुभ मानला जातो. या महिन्यात शंकराची विशेष पूजा केल्याने भक्तांच्या मनोकामना पूर्ण होतात, असे मानले जाते.

अनेक लोक सावन महिन्यात उपवास करतात. सोमवारचा उपवास (श्रावणी सोमवार) विशेषतः महत्वाचा मानला जातो. उपवास केल्याने मन शांत होते आणि एकाग्रता वाढते, असे मानले जाते.

■ ■ ■

# कर्जमाफीसाठी प्रहार आक्रमक

## राज्यभरात ठिकठिकाणी चक्काजाम आंदोलन : गोंडखैरीत शववाहिका पेटवून दिली

■ महासागर प्रतिनिधी
अमरावती / नागपूर /यवतमाळ, दि. २४ :
शेतकऱ्यांना कर्जमाफी मिळावी, यासह शेतकरी, शेतमजूर, दिव्यांगांच्या विविध मागण्यांसाठी प्रहार जनशक्ती पक्षाचे अध्यक्ष बच्चू कडू यांच्या नेतृत्वात राज्यभरात चक्काजाम आंदोलन करण्यात आले.

माजी मुख्यमंत्री स्व. वसंतराव नाईक यांच्या स्मृतिस्थळी गहुली (पुसद) येथे येत्या २९ जुलैला राज्यभरातील शेतकरी नेते चिंतन करणार आणि आंदोलनाची पुढील दिशा अधिक तीव्र ठरणार. शब्दाने फसवणे थांबवा, शेतकऱ्यांना हक्क द्या, नाहीतर ट्रेलरनंतरचा पिक्चर तापदायक असेल, सरकारने शेतकऱ्यांच्या भावनांचा आदर करावा, सरकारने आम्हाला उग्र आंदोलन करण्यास भाग पाडू नये, असा इशारा बच्चू कडू यांनी दिला आहे.

बच्चू कडू यांनी पोलिसांच्या दडपशाहीचा निषेध केला. ज्या जिल्ह्यांमध्ये पोलिसांनी शेतकऱ्यांच्या कर्जमुक्तीची व शेतकऱ्यांच्या मालाच्या हमीभावाची चळवळ दाबण्याचा प्रयत्न केला, तिथे पुन्हा चक्काजाम करणार, आता कुठलीही पूर्वसूचना न देता मंत्रालयात घुसू, सरकारला शेवटचा इशारा, हे फक्त ट्रेलर होते, पुढचे पिक्चर धगधगते असेल, असे बच्चू कडू म्हणाले.

परतवाडा-अमरावती महामार्गावर टायर जाळून रास्ता रोको आंदोलन करण्यात आले. शेतकरी, शेतमजूर, दिव्यांग, मच्छीमार, मेंढपाळ यांच्यासह विविध घटकांच्या न्याय्य मागण्यांसाठी प्रहार संघटना सरकारविरोधात आक्रमक झाली आहे. या आंदोलनाला विविध पक्ष संघटनांनी पाठिंबा दिला होता. अनेक ठिकाणी वाहतूक ठप्प पडली होती. आता आंदोलनाची पुढील दिशा येत्या २९ जुलैला ठरवली जाणार आहे.

सरकारला राज्यात अशांतता हवी आहे. म्हणूनच कर्जमाफीचा निर्णय घेतला जात नाही. कर्जमाफीसाठी समिती नेमली पण अध्यक्षाला माहिती नाही. आता गांधीगिरी संपली, भगतसिंगगिरी सुरू झाली आहे. आत्महत्या करण्याऐवजी लढा दिला पाहिजे. कृषिमंत्री विधानभवनात रमी खेळतायत आणि युवक रमी खेळून मरत आहेत, असे बच्चू कडू म्हणाले.

शासनाच्या खोट्या आश्वासनांनी फसवले गेलेले शेतकरी रस्त्यावर उतरले. संपूर्ण महाराष्ट्रात तब्बल ५४२ ठिकाणी झालेल्या चक्काजाम आंदोलनाने सरकारला जागे केले, फसव्या घोषणांनी फसवले गेलेले शेतकरी आज कोरड्या जमिनीवर थकीत कर्जदार म्हणून उभे आहेत, शेतकऱ्यांना आता बँक कर्ज देत नाहीत, शेती तोट्यात चालली आणि सरकार गप्प आहे. सरकारचे हे धोरण नव्हे, ही शेतकऱ्यांच्या आत्महत्येची जमीन तयार करण्याची सरकारी रणनीती आहे, अशी टीका कडू यांनी केली.



**नागपुर** : शेतमालाला योग्य बाजार भाव द्या , सरसकट कर्जमाफी द्या अशी मागणी करत आंदोलन करणाऱ्या प्रहार संघटनेच्या चक्काजाम आंदोलनाला गुरुवारी गोंडखैरी येथे हिंसक वळण लागले. अमरावती मार्गावरील एका आंदोलकाने शववाहिका पेटवून दिल्याने परिसरात एकच गोंधळ उडाला. चक्काजाम आंदोलन संपल्यानंतर दुपारी तीनच्या सुमारास ही घटना घडली. त्यामुळे कळमेश्वर पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत आग आटोक्यात आणली. बळीराजा फाउंडेशनची ही शववाहिका परिसरातील नागरिकांनी सोयीसाठी वापरली जात होती.

### गोंडखैरीत हिंसक वळण



ही शववाहिका प्रहार संघटनेचे तालुका पदाधिकारी रजनीकांत अतकरी यांच्या घरासमोर उभी होती. आंदोलनानंतर ती दुपारी महामार्गावर आणून पेटवून देण्यात आल्याचे कळमेश्वरचे ठाणेदार मनोज काळबांडे यांनी सांगितले.

आमदार बच्चू कडू यांचा मतदार संघ असलेला अमरावती जिल्हा हा प्रहार संघटनेचे मुख्यालय आहे. त्यामुळे राज्यभरात पुकारलेल्या या चक्काजामसाठी प्रहारचे कार्यकर्ते मोठ्या प्रमाणात नागपूरच्या दिशेने निघाले होते. याची कुणकूण लागताच पोलिसांनी नागपूर अमरावती महामार्गावरील गोंडखैरी येथे कार्यकर्त्यांची कोंडी करीत त्यांना शहरात प्रवेश करण्यावरून रोखून धरले. त्यावरून जाळपोळीचे पडसाद उमटल्याचे कार्यकर्त्यांचे म्हणणे आहे.

### हातात पत्ते, चक्काजाम!



**यवतमाळ :** माजी मंत्री बच्चू भाऊ कडू यांच्या नेतृत्वाखाली यवतमाळ जिल्ह्यात आज ठिकठिकाणी शेतकरी रस्त्यावर उतरले. यवतमाळ येथे बसस्थानक चौकात चक्काजाम आंदोलन करण्यात आले.
घोषणाबाजी करत शेतकऱ्यांनी सरकारविरुध्द आपला संताप व्यक्त केला. यावेळी पत्ते खेळून शासनाचा निषेध करण्यात आला.
या चक्काजाम आंदोलनाला प्रहार जनशक्ती पक्ष, संभाजी ब्रिगेड, महाराष्ट्र नवनिर्माण सेना, शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे गट), काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट), गोंडवाणा गणतंत्र पार्टी, एमआयएम, आम आदमी पार्टी आणि अपनी प्रजाहित पार्टी यांचा सक्रीय पाठिंबा मिळाला.

तात्काळ शेतकरी कर्जमाफी जाहीर करावी, सक्तीची कर्जवसुली थांबवावी, शेतकरी आत्महत्या रोखण्यासाठी ठोस धोरण राबवावे, विधवा व अपंग शेतकरी महिलांसाठी रोजगार व सुरक्षा योजना लागू कराव्यात, मनरेगा अंतर्गत शेतीच्या कामासाठी पेरणी ते कापणीपर्यंत मजुरी व कामाचा विस्तार करावा, ग्रामीण तरुणांसाठी शिक्षण व स्वयंरोजगार संधी निर्माण कराव्यात यासह अनेक मागण्यांसाठी हे चक्काजाम आंदोलन करण्यात आले.

जिल्ह्यात अनेक ठिकाणी शेतकऱ्यांनी बैलगाड्या, ट्रॅक्टर आणि शेतीची उपकरणे घेऊन रस्त्यावर उतरून संताप व्यक्त केला. काही ठिकाणी वाहतूक काही काळ ठप्प झाली होती.

हे सरकार झोपले आहे, याला जागे करण्यासाठी आम्ही चक्काजाम आंदोलन करत आहोत, अशा शब्दांत शेतकऱ्यांनी आपला आक्रोश व्यक्त केला. माजी मंत्री बच्चू कडू यांनी याआधी आमरण उपोषण आणि सात बारा कोरा यात्रा काढून सरकारचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला होता. मात्र तरीही शेतकऱ्यांच्या मागण्या दुर्लक्षित केल्या गेल्याने आंदोलन करण्यात आले.

यवतमाळ येथे आंदोलनात बिपीन चौधरी, सुरज खोब्रागडे, देवा शिवरामवार, राजेन्द्र गायकवाड, किशोर इंगळे, गजानन पाटील, चंदन हातागडे, निलेश राठोड, कुणाल जतकर, पिंटु दांडगे, अमन चौधरी, जावेद काझी यांच्यासह पदाधिकारी सहभागी झाले होते.

## महसूल विभागाच्या अधिकाऱ्यांना फेसॲपद्वारे हजेरी बंधनकारक



■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २४ :
महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी मोठा निर्णय घेतला आहे. महसूलच्या अधिकाऱ्यांची आता रोज फेसॲपद्वारे हजेरी लावावी लागणार आहे.

यामध्ये तलाठी पासून उपजिल्हाधिकारी यांच्यापर्यंत सर्वांना फेसॲपद्वारे हजेरीचे बंधन करण्यात आले आहे. फेसॲपवर हजेरी दाखवली नाही तर संबंधीत अधिकारी हा गैरहजर समजला जाणार आहे. विशेष म्हणजे ज्या गावात नोकरी आहे, तिथूनच उपस्थिती लावावी लागणार आहे.

महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी महसूल खात्यातील प्रशासकीय कार्यक्षमतेत पारदर्शकता आणण्यासाठी एक मोठा निर्णय घेतला आहे. आता तलाठी पासून ते उपजिल्हाधिकारी यांच्यापर्यंत सर्व महसूल अधिकाऱ्यांना दररोज फेसॲपद्वारे हजेरी लावणे बंधनकारक करण्यात आले आहे.

या नव्या आदेशानुसार, फेसॲपवर हजेरी नोंदवलेली नसेल तर संबंधित अधिकारी 'गैरहजर' समजले जाणार आहेत. हजेरीची ही नवी पद्धत ऑगस्ट २०२५ पासून संपूर्ण राज्यभर लागू होण्याची शक्यता आहे.

यासोबतच एक महत्त्वाची अट अशी आहे की, संबंधित अधिकाऱ्याने आपली उपस्थिती फक्त ज्या गावात त्यांची नेमणूक आहे, त्या गावातूनच लावावी लागणार आहे. यामुळे फील्डवर न जाता कार्यालयीन उपस्थिती दाखवण्याच्या प्रथेला आळा बसेल, अशी सरकारला अपेक्षा आहे.

महसूल कर्मचाऱ्यांची उपस्थिती सुनिश्चित करणे, जनतेला वेळेवर सेवा मिळवून देणे, प्रशासनात पारदर्शकता आणि जबाबदारी निर्माण करणे ही यामागची उद्दिष्टे आहेत.

हा निर्णय राबवण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांना सूचना देण्यात आल्या आहेत. महसूल विभागाशी संबंधित ७/१२ उतारे, उत्पन्न प्रमाणपत्रे, जमीन मोजणी, फेरफार नोंदणी यांसारख्या सेवांसाठी नागरिकांना कार्यालयात वारंवार जावे लागते. त्यामुळे अधिकाऱ्यांची नियमित उपस्थिती अत्यंत आवश्यक असल्याचे बावनकुळे यांनी स्पष्ट केले.

**नागरिकांच्या अडचणी सोडवाव्यात**

महसूल विभागाचे काम गतिमान, पारदर्शक आणि लोकाभिमुख होण्यासाठी विभागातील अधिकाऱ्यांनी नागरिकांना प्रत्यक्ष भेटून त्यांच्या अडचणी जाणून घ्याव्यात. जनसंवाद, लोकशाही दिन आदी माध्यमातून त्यांच्या समस्या सोडवाव्या, असे निर्देश महसूल मंत्री बावनकुळे यांनी दिले.

## राज्य मंत्रिमंडळात बदलाचे वारे?

### धर्मराव बाबा आत्रामांचा दावा



■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. २४ :
राज्यातील राजकारणात मंत्रिमंडळ बदलाच्या चर्चांना आता अधिकच जोर आला आहे. माजी मंत्री धर्मराव बाबा आत्राम यांनी आज मोठं वक्तव्य करत वातावरण तापवलं.

आत्राम म्हणाले, मंत्रिमंडळात बदल होईल असं वातावरण दिसते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे यंग आणि एनर्जेटिक आहेत. त्यांना आणि उपमुख्यमंत्र्यांना परफॉर्मन्स हवा आहे. त्यामुळे मंत्र्यांच्या कामकाजाचं ऑडिट होणार आहे. माणिकराव कोकाटेंबाबत अजित पवार निर्णय घेतील, असंही त्यांनी स्पष्ट केलं. गेल्या काही दिवसांत कोकाटेंच्या वादग्रस्त कृत्यांमुळे सरकारची अडचण वाढली आहे. या पार्श्वभूमीवर मंत्रिमंडळ फेरबदल किंवा राजीनामा घेण्याच्या चर्चांना उधाण आले आहे.

आत्राम पुढे म्हणाले,यंग एनर्जेटिक मुख्यमंत्री असल्यामुळे प्रत्येक मंत्री कसा परफॉर्म करतो याकडे लक्ष असणार आहे. आता कामच बघितलं जाणार आहे.

या वक्तव्यानंतर राजकीय वर्तुळात चर्चा सुरू झाली आहे की, आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या तोंडावर महायुती सरकारमधील काही मंत्र्यांना घरचा रस्ता दाखवला जाऊ शकतो. यामुळे आगामी काळात महायुती सरकारमध्ये मोठी हालचाल होण्याची चिन्हं दिसत आहेत.

## संतप्त कंत्राटदारांचे जिल्हा परिषदत कार्यालय परिसरात आंदोलन



■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २४ :
सार्वजनिक बांधकाम आणि इतरही विभागांमध्ये काम पूर्ण करूनही वर्षभरापासून अनेक कंत्राटदारांना देयक मिळाले नाही. एका कंत्राटदाराने चक्क आत्महत्या करण्यापर्यंत टोकाचे पाऊल उचलले. त्यावर संतप्त कंत्राटदारांनी नागपुरातील जिल्हा परिषदत कार्यालय परिसरात आंदोलन केले.

हर्षल पाटील असे आत्महत्या केलेल्या कंत्राटदाराचे नाव आहे. तो सांगली येथील आहे. नागपूर कॉन्ट्रॅक्टर्स असोसिएशनचे अध्यक्ष सुबोध सरोदे म्हणाले, हर्षल पाटील जलजीवन योजनेअंतर्गत विविध कंत्राटाची कामे करत होता. सुमारे वर्षांपूर्वी त्याने सुमारे दीड कोटी रुपये किमतीचे काम पूर्ण करून देयक शासनाच्या बंधित विभागाकडे जमा केले. परंतु वर्षभरापासून देयकाची रक्कमच मिळाली नाही. सरकारकडून निधी उपलब्ध केला गेला नसल्याचे अधिकारी सांगतात. कंत्राटदाराला शासनाने दिलेली कामे पूर्ण करण्यासाठी लागणाऱ्या कामगारांचे वेतन व साहित्याचे पैसे नगदी द्यावे लागतात. कर्जही घ्यावे लागते.

नागपूर जिल्ह्यातील सगळ्याच विभागात कंत्राटदारांचे सुमारे ६ हजार कोटी रुपयांचे देयक थकले आहे. राज्यातील सगळ्या कंत्राटदारांचा विचार केल्यास हे देयक ८९ हजार कोटी रुपयांवर आहे. हे देयक सरकारने तातडीने न दिल्यास कंत्राटदारही आत्महत्या करण्याची शक्यता नकारता येत नाही. या सरकारला झोपेतून जागे करण्यासाठी आंदोलन करत आहे, असेही ते म्हणाले. आंदोलनात नागपूर जिल्ह्यातील कंत्राटदार मोठ्या संख्येने सहभागी झाले.

आंदोलकांनी सांगितले की हर्षल पाटील यांच्या आत्महत्येला गेंड्याच्या कातडीचे बेडर सरकार, निर्लज्ज राजकारनी व भ्रष्ट अधिकारी जबाबदार आहे. त्यासाठी या सगळ्यांचा निषेध करण्यासाठी नागपूर जिल्हा परिषदेपुढे कंत्राटदार आपली ताकद दाखवत आहे. सरकारने तातडीने कंत्राटदारांची थकीत देयक अदा न केल्यास तिव्र आंदोलन करण्याचा इशारा यावेळी देण्यात आला.

: सिनेरंग :

## बेटर-हाफची लव्हस्टोरी २२ ऑगस्टला होणार प्रदर्शित




हास्याने भरलेली, धमाल प्रसंगांनी नटलेली आणि नात्यांच्या गुंतागुंतीवर भाष्य करणारी एक हटके प्रेमकहाणी लवकरच प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे.

सुशीलकुमार अग्रवाल आणि अल्ट्रा प्रस्तुत बेटर-हाफची लव्हस्टोरी हा चित्रपट एक मजेशीर लव्ह ट्रायंगल घेऊन येत आहे ज्यात नात्यांमधील गैरसमज, गोंधळ त्यातून उगम पावणारे हास्य यांचा सुरेख मिलाप पाहायला मिळेल. या चित्रपटाचे मोशन पोस्टर नुकतेच सोशल मीडियावर प्रदर्शित झाले असून, प्रेक्षकांमध्ये चित्रपटाबद्दल उत्सुकता निर्माण झाली आहे.

चित्रपटात सुबोध भावे, प्रार्थना बेहेरे, रिंकू राजगुरू आणि अनिकेत विश्वासराव यांची कमाल केमिस्ट्री पाहायला मिळणार आहे. येत्या २२ ऑगस्टला प्रदर्शित होणाऱ्या या चित्रपटात एका वेगळ्या आणि मजेशीर लव्ह ट्रायंगलची कहाणी पाहायला मिळेल.

दिग्दर्शक संजय अमर म्हणतात,मराठी प्रेक्षकांसाठी एक हटके संकल्पना असलेला चित्रपट घेऊन येत आहोत. ज्यामध्ये नात्यांमधल्या चढ-उताराची गोष्ट हलक्याफुलक्या पद्धतीने मांडण्यात आली आहे. हा चित्रपट प्रेक्षकांचे नक्कीच मनोरंजन करेल.

लोकरंजन

सुशीलकुमार अग्रवाल आणि अल्ट्रा प्रस्तुत रजत मीडिया एंटरटेनमेंट निर्मित बेटर-हाफची लव्हस्टोरी या चित्रपटाचे लेखन, छायांकन व दिग्दर्शन संजय अमर यांनी केले असून रजत अग्रवाल निर्माते आहेत. या चित्रपटाला साजन पटेल, अमेय नरे यांचे संगीत लाभले आहे.

■ ■ ■

## झी मराठीवर लवकरच नवी मालिका येतेय 'तारिणी'



तारिणी बेलसरे. मुंबईत राहणारी. तारिणीची आई पोलिस खात्यात हेड कॉन्स्टेबल होती. अत्यंत प्रामाणिक...पण तिच्यावर लाच घेण्याचे आरोप केले गेले.. आणि तिने त्या भीतीपोटी आत्महत्या केली असं समोर उभं केलं गेलं..
तारिणीच्या वडिलांनी तेंव्हा मुलीच्या भविष्याचा विचार करत दुसरं लग्न केलं. तारिणीची सावत्र आई मात्र घरात येताक्षणी त्या हेड कॉन्स्टेबल चा उल्लेखही घरात करायचा नाही असं सगळ्यांना सांगितलंय.
पण आपली आई चुकीच कधीच वागू शकत नाही हा विश्वास तारिणीला आहे, म्हणून आपल्या आईच सत्य आणि खऱ्या गुन्हेगाराला तिला जगापुढे आणायचं म्हणून ती पोलिसात भरती भरती झाली..
तिच्या सोबत केदार नावाचा एक मुलगा आहे ज्याचा निशाणा कधीच चुकत नाही.. जशी तारिणी तिच्या आईच्या गुन्हेगाराचा शोध घेते आहे तसा केदार त्याला आणि त्याच्या आईला सोडून गेलेल्या वडिलांचा शोध घेत आहे...

दोघे एकमेकांना आधार आहेत. केदारच्या मनात तारिणी विषयी प्रेमाची भावना आहे पण तो तिला आजवर सांगू शकला नाही.. अशाच वेळी मिडिया टायकून खांडेकरांच्या घरात तारिणी आणि केदार राहू लागतात. काय असं घडलं असेल की त्यांना खांडेकरांच्या घरात प्रवेश करावा लागतो. तारिणीने खांडेकरांच्या घरात शिरण्यामागचे काय असेल कारण? खांडेकरांच्या घरात तारिणीच्या आईच्या गुन्हेगाराचे धागेदोर सापडणार का? ज्यामुळे तारिणी आणि केदार मध्ये दुरावा येईल? अशा प्रश्नासोबत मालिका सुरू राहते..
या मालिकेचं कथा व पटकथा लेखन केलंय प्रल्हाद कुडतरकर यांनी, पूर्णानंद वांढेकर मालिकेचे संवाद लेखक आहेत. मालिकेच दिग्दर्शन करतायत भीमराव मोरे. तर मालिकेचे निर्माते आहेत एरिकॉन टेलिफिल्म्सचे शर्मिष्ठा राऊत आणि तेजस देसाई. 'तारिणी' ११ ऑगस्ट पासून सोम-शुक्र रात्री ९.३० वा. झी मराठीवर प्रसारित होईल.

■ ■

## जॅकी श्रॉफ, सुनील शेट्टी यांनी लाँच केलं हंटर २

अमेझॉन एमएक्स प्लेयर या अमेझॉनच्या मोफत व्हिडिओ स्ट्रीमिंग सेवेने हंटर २ टुटेगा नही तोडेगा या सीरीजचं ऑफिशियल ट्रेलर लाँच केलं. मुंबईत झालेल्या एका धमाकेदार कार्यक्रमात सुनील शेट्टी आणि जॅकी श्रॉफ यांनी या शोचं भव्य पोस्टर फाडत बाहेर एंट्री घेतली. ट्रेलर लाँचच्या या कार्यक्रमात टायगर श्रॉफ यांनीही सरप्राइज एंट्री घेत सर्वांना आश्चर्याचा धक्का दिला.

या ट्रेलरमध्ये सीरीजच्या पुढच्या गोष्टीची झलक पाहायला मिळाली. जबरदस्त ॲक्शन सिक्वेन्स, तीव्र भावना आणि हंटर व सेल्समॅन यांच्यात होणारा फेस ऑफ ट्रेलरमध्ये दिसतो. लाँचप्रसंगी सीरीजमधले इतर कलाकारही उपस्थित होते व त्यात अनुषा दांडेकर, बरखा बिश्ट, अनंग देसाई, प्रमोद पाठक आणि मॅझेल व्यास यांचा समावेश होता. धिमन आणि अलोक बात्रा यांचे दिग्दर्शन व युडली फिल्म्स या सारेगामा इंडियाच्या फिल्म डिव्हिजनची निर्मिती असलेल्या हंटर २ टुटेगा नही तोडेगाचे स्ट्रीमिंग २४ जुलैपासून अमेझॉन एमएक्सप्लेयरवर मोफत होणार आहे.

हंटर- टुटेगा नही तोडेगाच्या दुसऱ्या सीझनविषयी अमेझॉन एमएक्स प्लेयरचे कंटेंट प्रमुख अमोघ दुसाद म्हणाले, हंटर २ टुटेगा नही तोडेगा या सीझनमध्ये आम्ही यातली गोष्ट नव्या पातळीवर नेली आहे. यातल्या व्यक्तीरेखा सखोल भावनिक पातळीवरून ॲक्शन आणि जागतिक पातळीवर जाताना दिसतील. सुनील शेट्टी यांचं पुनरागमन व जॅकी श्रॉफ यांच्या एंट्रीने गोष्ट पूर्णपणे नव्या उंचीवर जाणार असून दोघांचा फेसऑफ खासगी आणि तितकाच शक्तीशाली असेल. अमेझॉन एमएक्स प्लेयरमध्ये आम्ही भावनिक पातळीवर आपल्याशा वाटणाऱ्या आणि अनोखा प्रेक्षणीय अनुभव देणाऱ्या गोष्टी मांडण्याचा प्रयत्न करत असतो.

■ ■ ■



: संकलन व संयोजन :
सुबोध रणशेवरे, ९८३३१४६३५६
subodh.ranshevre @rediffmail.com

दहीहंडी उत्सवात सहभागी दीड लाख गोविंदांना

## १० लाखांपर्यंत विमा संरक्षण

सरकारचा मोठा निर्णय; 9 लाखांपर्यंतचा वैद्यकीय खर्च कव्हर



■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. २४ :
महाराष्ट्र सरकारने येत्या दहीहंडी उत्सवात सहभागी होणाऱ्या दीड लाख गोविंदांना १० लाख रुपयांपर्यंतचे विमा संरक्षण जाहीर केले आहे.

हा निर्णय जन्माष्टमी संबंधित उत्सवाच्या काही आठवड्यांपूर्वीच घेण्यात आला आहे. जन्माष्टमीचा भाग म्हणून साजरा केल्या जाणाऱ्या दहीहंडी मध्ये तरुण पुरुष आणि मुले - गोविंदा - जमिनीपासून उंच हंडी फोडण्यासाठी मानवी पिरॅमिड तयार करतात.

या धाडसी खेळातील जोखीम ओळखून, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील सरकारने १६ ऑगस्ट रोजी होणाऱ्या या महोत्सवा दरम्यान मानवी पिरॅमिड बनवणाऱ्या सर्व नोंदणीकृत 'गोविंदांचा' विमा खर्च उचलण्याचा निर्णय घेतला आहे. बुधवारी जारी केलेल्या सरकारी निर्णयानुसार (जीआर) विमा पॅकेज पिरॅमिड बनवताना होणाऱ्या अपघाती दुखापतींसह मृत्युमुखी पडलेल्यांसाठी विमा संरक्षण प्रदान करेल.

महाराष्ट्र राज्य गोविंदा असोसिएशन, मुंबई यांना गोविंदांचे प्रशिक्षण, वय आणि सहभाग पडताळण्यासाठी आणि त्यांची माहिती पुणे येथील क्रीडा आणि युवा सेवा आयुक्तांना सादर करण्यासाठी नियुक्त करण्यात आले आहे.

जीआरमध्ये अपघातांच्या सहा श्रेणी आणि संबंधित विमा देयकांची रूपरेषा देण्यात आली आहे. दहीहंडीच्या कार्यक्रमादरम्यान मृत्यू झाल्यास, मृत गोविंदाच्या नातेवाईकांना 10 लाख रुपये मिळतील. दोन्ही डोळे किंवा दोन अवयव गमावणे यासारख्या कायमस्वरूपी अपंगत्वाच्या बाबतीतही हीच रक्कम दिली जाईल.

एक डोळा, एक हात किंवा एक पाय गमावलेले गोविंद ५ लाख रुपयांच्या भरपाईसाठी पात्र असतील. आदेशात म्हटले आहे की, विमा कंपनीच्या टक्केवारी-आधारित आंशिक किंवा कायमस्वरूपी अपंगत्वाची भरपाई केली जाईल. याव्यतिरिक्त, विमा योजनेत खेळा दरम्यान झालेल्या दुखापतींसाठी १ लाख रुपयांपर्यंतच्या वैद्यकीय खर्च कव्हर केला जाईल, असे त्यात म्हटले आहे.

## पुणे, सातारा, कोल्हापूर घाट भागात रेड अलर्ट

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २४ :
राज्यात पुढील २४ तासासाठी रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग जिल्ह्यांसह पुणे घाट, सातारा घाट, कोल्हापूर घाट या भागात रेड अलर्ट देण्यात आला आहे. जिल्हा प्रशासनाला सतर्क राहण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत, असे राज्य आपत्कालीन कार्य केंद्राने कळवले आहे.

भारतीय राष्ट्रीय महासागर माहिती सेवा केंद्रामार्फत ठाणे, मुंबई शहर व उपनगर, रायगड, रत्नागिरी, पालघर आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यांच्या किनारपट्टीवर. २६ जुलै रात्रीपर्यंत ४ ते ५ मीटर उंच लाटांचा इशारा देण्यात आला आहे. या कालावधीत लहान होड्यांना समुद्रात न जाण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. तसेच समुद्रातील उंच लाटांचे तडाखे समुद्र किनारी येण्याचा इशारा देण्यात आला असून सर्व जिल्हा प्रशासनाला सतर्क राहण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

मुंबई शहर आणि उपनगर यांना पाणी पुरवठा करणाऱ्या मोडक सागर, मध्य वैतरणा आणि तानसा या धरणातून विसर्ग सुरू आहे. राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दल आणि राज्य आपत्ती प्रतिसाद दल यांनाही सतर्क राहण्याच्या सूचना देण्यात आल्या असल्याचेही राज्य आपत्कालीन कार्य केंद्राकडून कळवण्यात आले आहे. भारतीय हवामान विभागाने मराठवाडा विभागात मध्यम ते मुसळधार पावसाचा इशारा दिला आहे. विदर्भाच्याअनेक जिल्ह्यातही मुसळधार पावसाचा अंदाज आहे.

विनम्र अभिवादन



प्रथम पूण्यस्मरण
रामचंद्र सैनाजी वाठोरे
(शिक्षण उपनिरीक्षक अधिकारी),
संस्थापक अध्यक्ष -डॉ. बाबासाहेब आंबेडकर कनिष्ठ महाविद्यालय हिरडव ता.लोणार जिल्हा बुलढाणा.
अभिवादनकर्ते
अध्यक्षा–श्रीमती मिनाताई रा.वाठोरे कनिष्ठ महाविद्यालय हिरडव,
प्राचार्य कपील रा .वाठोरे ता.लोणार जिल्हा बुलढाणा.व समस्त वाठोरे परिवार